कृषी ▪ आरोग्य ▪ प्रेरणा ▪ स्पर्धा परीक्षा ▪ यशकथा ▪ नोंदी

ऑगस्ट २०१७/पाने ६०/किंमत ₹ १०

# लोकराज्य




## महा कर्जमाफी


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
विद्यार्थ्यांची स्वप्नपूर्ती...
आता शासनाची
शिष्यवृत्ती
राजर्षी छत्रपती शाहू महाराज
मा. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री
श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री
विद्यार्थ्यांना फी मध्ये
५०% पर्यंत सवलत
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीकरिता, सवलत मर्यादा आता
१ लाख रुपयांवरुन ६ लाख रुपये.
उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी विभाग, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग यांचे अभ्यासक्रम शिकणाऱ्या ६ लाख विद्यार्थ्यांना मिळणार १२०० कोटी रुपयांचा लाभ.
ईबीसी व ओबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रक्कम आता शिष्यवृत्तीच्या स्वरुपात, आधार संलग्नित बँकेत विद्यार्थ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा होणार.
सर्व नव्या सवलती डीबीटीद्वारे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून सुरु.
वैद्यकीय शिक्षणासाठी बँक कर्ज घेतल्यास त्यावरील व्याजाची रक्कम शासन भरणार.
अल्प-भूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजुरांच्या मुलांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत अर्थसहाय्य..
अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वतंत्र योजनेतून थेट मदत.
लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना लाभणार आनंदाचे पंख
सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना मिळणार उच्च शिक्षणाची संधी

# अंतरंग



## ५ महाकर्जमाफी

देशातील सर्वात मोठा असा ३४ हजार कोटींच्या कर्जमाफीचा निर्णय महाराष्ट्राने घेतला आहे. कुठलीही अट न ठेवता सरसकट अशी कर्जमाफीची योजना असून त्यामध्ये दीड लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ होणार आहे. यामुळे ३६ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होण्यास मदत होणार आहे.

## १६ जीएसटी : नव्या युगाचा प्रारंभ

जीएसटी लागू झाल्यानंतर किरकोळ विरोध वगळता राज्यातील व्यापारी आणि उद्योगांनी या नव्या कररचनेचे स्वागत केले आहे. करसंरचना व्यापक होत असताना समाजातील विविध स्तरातील लोकांनी त्याचा सहजतेने केलेला स्वीकार हे राज्य शासनाचे यश आहे.

## १८ मांजरा : तेव्हा आणि आता

२०१६च्या मे-जून आणि जुलैमध्ये देखील एक थेंबभरही पाणी नसलेल्या व नदीपात्रात कसलीही हिरवळ नसलेल्या मृतप्राय मांजरा नदीच्या नागझरी बॅरेजमध्ये लातूरच्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने पूर प्रतिसाद आणि शोध व बचावाची रंगीत तालीम घेतली. ज्यामध्ये त्यांनी या बॅरेजमध्ये चक्क बोट चालवली. हे केवळ मांजरा नदीच्या पुनर्जीवीकरणमुळेच घडून आले.



## २० जलदेवता प्रसन्न



पाणी टंचाईचा सामना करताना पाण्यासाठी स्वयंपूर्ण व्हावे यासाठी काकरदरा या गावाने विविध उपाययोजना यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. जलदेवतेचे गाव म्हणून काकरदरा संपूर्ण राज्यात ओळखले जात आहे.


| | |
|---|---|
| महाकर्जमाफी | ५ |
| जीएसटी : नव्या युगाचा प्रारंभ | १६ |
| मांजरा : तेव्हा आणि आता | १८ |
| जलदेवता प्रसन्न | २० |
| माझे पाणी, माझी समृद्धी | २१ |
| स्मार्ट 'किकवारी' | २२ |
| डोंगरावर 'शालू' | २३ |
| आता लक्ष्य १३ कोटींचे.... | २४ |
| आपला भारत, आपली अस्मिता | २६ |
| स्वच्छतेची नवी वाट... | ३० |
| सौर ऊर्जा, शाश्वत ऊर्जा | ३२ |
| कृषी माल पाठवा परदेशात | ३४ |
| लाखमोलाची शेती | ३६ |
| नोंदी | ३८ |
| स्ट्रॉबेरी पंडित | ४६ |
| वाटा प्रगतीच्या... | ४७ |
| असे वापरा ॲप्स | ४८ |
| यशाचा मास्टरस्ट्रोक | ५० |
| वेळेचा सदुपयोग | ५२ |
| सुदृढ आणि सुरक्षित | ५४ |
| खेळत राहा.. | ५६ |
| येथे कर माझे जुळती... | ५८ |


## २२ स्मार्ट 'किकवारी'



बागलाण तालुक्यात बहुसंख्येने आदिवासी असणाऱ्या भागातील किकवारी (खुर्द) गावातील ग्रामस्थांनी गाव कचराकुंडीमुक्त आणि हिरवेगार केले आहे. या गावाने 'स्मार्ट ग्राम' योजनेंतर्गत पारितोषिक मिळवले आहे.

## २६ आपला भारत, आपली अस्मिता

१५ ऑगस्ट २०१७ रोजी भारतीय स्वातंत्र्याला ७० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त भारताने साध्य केलेल्या काही महत्त्वपूर्ण बाबींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे.



## ५२ वेळेचा सदुपयोग

आजच्या युगात व्यवस्थापन क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कुठलेही ध्येय गाठायचे असेल तर आपले वेळेचे व्यवस्थापन अचूक असले पाहिजे.



## ५६ खेळत राहा..

क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी शासन विविध नावीन्यपूर्ण योजना, उपक्रम राबवत असून त्यामाध्यमातून राज्यात क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले जात आहे.



वर्ष ६९ वे | अंक २ | ऑगस्ट २०१७

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

लोकराज्य

**संपादन**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, देवेंद्र भुजबळ, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

**प्रशासन**

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

**मांडणी**

- मुखपृष्ठ — सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

**वितरण आणि वर्गणीदार**

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in



# शेतकऱ्यांना दिलासा

महाराष्ट्र सरकारने ऐतिहासिक कर्जमाफी करून राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. या कर्जमाफीमुळे दीड लाख रुपयांपर्यंतचे कर्ज सरसकट माफ होणार आहे. या निर्णयामध्ये अंतर्भूत इतर बाबींमुळे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार असून, हे शेतकरी आता नव्याने कर्ज मिळण्यासाठी पात्र ठरले आहेत.

महाराष्ट्राच्या अनेक भागात आतापावेतो उत्तम पर्जन्यमान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आनंदात आहेत. या कर्जमाफीमुळे त्यांचा आनंद द्विगुणित होण्यास हरकत नाही. या हंगामात शेतकरी बांधव अधिक ऊर्जा आणि उत्साहाने काम करून आपल्या शेतीतून सोने पिकवेल. यंदा शेतीच्या उत्पादनात आणि शेतकऱ्याच्या उत्पन्नात वृद्धी होईल. महाराष्ट्राच्या समृद्धीत वाढ होईल, अशी आशा करू या.



महाकर्जमाफी

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी 'कर्जमाफीपेक्षा कर्जमुक्ती' यावर शासनाचा भर असून त्यासाठी शाश्वत उत्पन्न देणारी शेती व कृषी मालावर आधारित प्रक्रिया उद्योग या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

कर्जमाफी, कर्जमुक्ती, शेतकऱ्यांचे उत्पन्न आदी संबंधित विषयांवर आधारित 'मी मुख्यमंत्री बोलतोय' हा कार्यक्रम नुकताच विविध वाहिन्या आणि आकाशवाणीवरून प्रसारित झाला. त्याचा विस्तृत वृत्तांत आम्ही या अंकात दिला आहे.

१ जुलैपासून देशात वस्तू आणि सेवा कर कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. महाराष्ट्रातही त्याचे स्वागत झाले. अर्थव्यवस्था सुदृढ करण्यास हा कायदा उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

या महिन्यात आपल्या स्वातंत्र्याला ७० वर्षे पूर्ण होत आहेत. या कालावधीत देशाने विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. या प्रगतीचा आढावा देणारा विशेष लेख हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे.

'जलयुक्त शिवार' योजनेमुळे गावांचा झालेला कायापालट, आता लक्ष्य १३ कोटींचे हे लेख आणि आपले गाव, स्पर्धा परीक्षा, आरोग्य, प्रेरणा, नोंदी ही सदरे वाचकांच्या ज्ञानात भर घालतील. हा अंक आपणास आवडेल, अशी आशा आहे.

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या आपणा सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**


छाया: विजय होकर्णे

# महाकर्जमाफी

**देशातील सर्वात मोठा असा ३४ हजार कोटींच्या कर्जमाफीचा निर्णय महाराष्ट्राने घेतला. यापूर्वी पंजाब राज्याने १० हजार कोटी रुपयांची, आंध्र प्रदेशने १५ हजार कोटी रुपयांची, कर्नाटकने ८ हजार कोटींची तर तेलंगणाने १० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली आहे. या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने केलेली ३४ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी ही देशभरात सर्वाधिक आहे. कुठलीही अट न ठेवता सरसकट अशी कर्जमाफीची योजना असून त्यामध्ये दीड लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ होणार आहे. यामुळे ३६ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होण्यास मदत होणार आहे. अजून पाच लाख शेतकरी असे आहेत की, त्यातील तीन लाख शेतकऱ्यांनी जर १० हजार, २० हजार किंवा ३० हजार रुपयांची रक्कम भरली तर राज्य शासनाचे दीड लाख आणि त्यांनी भरलेली ही रक्कम असे मिळून त्यांचाही सातबारा कोरा होण्यास मदत होणार आहे.**




**माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित 'शेतकरी कर्जमाफी' या विषयावरील 'मी मुख्यमंत्री बोलतोय' या कार्यक्रमाचे सह्याद्री, झी २४ तास, झी मराठी, साम टीव्हीवरून प्रसारण आणि आकाशवाणीच्या विविध वाहिन्यांवरून प्रक्षेपण करण्यात आले. 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या' माध्यमातून ऐतिहासिक कर्जमाफी कुठलीही अट न ठेवता सरसकट करण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात सांगितले. त्या वेळी झालेल्या चर्चेचा हा संपादित भाग...**

पीक कर्जासोबतच शेती संलग्न पुनर्गठित कर्जाचादेखील या योजनेत समावेश आहे. राज्य शासनाने वास्तवाच्या आधारावर कर्जमाफीचे गणित केले आहे आणि ते बरोबर आहे. खऱ्या शेतकऱ्यांनाच लाभ मिळावा यासाठी कर्जमाफी देताना शेतकऱ्याचा आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न करून खात्यांची पडताळणी करण्यात येईल. कर्जमाफी हा अंतिम उपाय नाही. शेतकऱ्याला सुखी करण्यासाठी शेतीत गुंतवणूक वाढवून हे क्षेत्र शाश्वत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी या कार्यक्रमात दिली.

राज्यभरातून २० हजार जणांनी मोबाइल संदेश, ई-मेलच्या माध्यमातून यासंदर्भात प्रश्न विचारले. त्यातील निवडक प्रातिनिधिक प्रश्नांना मुख्यमंत्र्यांनी उत्तरे दिली.

**ऐतिहासिक कर्जमाफीचा निर्णय घेऊन आपण शेतकऱ्यांच्या दुःखाचा भार हलका करण्याचा प्रयत्न केलात त्याबद्दल निश्चित आनंद आहे. पण ज्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्जाची परतफेड केली, संस्था टिकवून सहकार जगवला त्यांच्यावर अन्याय होत आहे, असे वाटते. तरी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण काय करणार आहात? – विजय जाधव, बीड (एसएमएस)**

**मुख्यमंत्री–** नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. कारण आपली जी व्यवस्था आहे ती निश्चितपणे अशा शेतकऱ्यांमुळेच तग धरून आहे. हीच बाब लक्षात घेऊन या शेतकऱ्यांनाही मदत करण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात आला आहे. काही जणांना ही मदत कमी वाटू शकते, त्या अनुषंगाने मदत म्हणून देण्यात येणारा निधी वाढवण्यात यावा अशी मागणी होत आहे. ही मागणी काही चुकीची नाही. पण हे असे निर्णय घेताना आपल्या अर्थव्यवस्थेवर किती ओझे आपण टाकू शकतो याचादेखील विचार करावा लागतो. हा विचार न करता अधिकचा भार आपण अर्थव्यवस्थेवर टाकला आणि शेतीच्या क्षेत्रातील गुंतवणूक बंद झाली तर परत एकदा नव्याने मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जबाजारी होण्याची मोठीच शक्यता निर्माण होते. म्हणूनच आम्ही नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना २५००० किंवा पीक कर्जाच्या २५ टक्के आणि किमान १५००० एवढी मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. पण भविष्यात मात्र नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना कृषीविषयक योजनांच्या माध्यमातून अधिकाधिक लाभ देता यावा, यासाठी सरकार निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. बीडसारख्या जिल्ह्यातदेखील अधिकाधिक गुंतवणूक करण्यात येऊन शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येऊ नये, यासाठी देखील सरकार प्रयत्न करणार आहेत.

**सुकाणू समितीबरोबर झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याची घोषणा सरकारकडून करण्यात आली होती. असे**



**असतानाही नंतर दीड लाखांची मर्यादा का घालण्यात आली? सुकाणू समितीला देण्यात आलेले आश्वासन का पाळण्यात आले नाही? ही शेतकऱ्यांची फसवणूक नाही का? – अतुल वसेकर, सोलापूर (एसएमएस)**

**साहेब, आपण जाहीर केलेली कर्जमाफी ही संपूर्ण विचारांतीच घेतलेली आहे याची कल्पना आहे, पण तरीसुद्धा सरसकट कर्जमाफी देण्यात यावी अशी माझी विनंती आहे. – प्रदीप हरबक, कापडगाव, जि. जालना (दूरध्वनी)**

**मुख्यमंत्री–** मुळात सरसकट कर्जमाफीची घोषणा करण्यात आली. त्यावेळी सरसकट म्हणजे काय याचा अर्थ देखील समजावून सांगण्यात आला होता. शासनाने प्रथम अशी भूमिका घेतली की, अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी पण नंतर हे लक्षात आले की, राज्यात अनेक शेतकरी असे आहेत जे अल्पभूधारक नाहीत पण त्यांच्यावर कर्ज आहे आणि ते थकीत आहे. त्यामुळे ही जी जमिनीच्या होल्डिंगची अट आहे ती रद्द केली पाहिजे. इतर राज्यांच्या बाबतीत बघितले तर आपल्या लक्षात येईल की, पंजाबमध्ये जमिनीच्या होल्डिंगची अट ५ एकरपर्यंत आहे. तेलंगणामध्ये अल्पभूधारक शेतकरी तर आंध्र प्रदेशमध्ये २ हेक्टरपर्यंत जमिनीच्या होल्डिंगची अट आहे. कर्नाटकमध्ये तर फक्त जिल्हा बँकेतून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले आहे. महाराष्ट्र हे असे एकमेव राज्य आहे ज्याने या अशा सर्व प्रकारच्या अटी रद्द केल्या आहेत. त्याअर्थी ही सरसकट अशी कर्जमाफी


छाया: समीर मण्यार

**कर्जमाफी दिल्यावर पुन्हा त्या शेतकऱ्यावर कर्ज होऊ नये यासाठी सरकारने काही उपाययोजना केल्या आहेत का? कर्जमाफी देण्यापेक्षा आतापर्यंत शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव दिला असता किंवा खत, बी-बियाणे, शेतीची औजारे शेतकऱ्याला परवडणाऱ्या किमतीत दिले गेले असते तर शेतकरी कर्जबाजारी झाला नसता असे आपल्याला वाटते का? – निलेश पवार, चाफळ, सातारा (ई-मेल)**

**मुख्यमंत्री –** आपले म्हणणे खरे आहे. पण दुसरा मुद्दा असा की, आपल्याला शेतीतील उत्पादकता वाढवावी लागेल. आज हमीभाव आपल्याला का परवडत नाही तर आपली शेतीतील उत्पादकता कमी आहे. हमीभाव तर संपूर्ण देशात सारखा असतो. स्वामिनाथन यांनी सांगितलेल्या पद्धतीनेच हमीभाव निघतो. पण तो हमीभाव आपल्याला परवडत नाही. कारण त्यात वेटेड ॲव्हरेज असे म्हटलेले आहे. ते वेटेड ॲव्हरेज करताना ५० टक्क्यांचा फायदा हा जो काही विषय आहे तो प्रत्येक राज्याला वेगळा पडतो. कारण प्रत्येक राज्याचा उत्पादन खर्च वेगवेगळा आहे. त्यामुळे सर्वप्रथम आपली उत्पादकता



कशी वाढवता येईल, शेतीतला खर्च कसा कमी करता येईल यासाठी आपल्याला प्रयत्न करावा लागेल. त्याकरिता शेती क्षेत्रातील गुंतवणूक वाढवावी लागेल आणि आता सध्या सरकारचा हाच प्रयत्न आहे. यांत्रिकीचा वापर शेतीत मोठ्या प्रमाणात व्हावा असा आपला प्रयत्न आहे. पण प्रत्येक व्यक्ती प्रत्येक गोष्ट विकत घेऊ शकत नाही. त्यामुळे आपण जर शेतकरी उत्पादक कंपन्यांना मोठ्या प्रमाणात सगळ्या प्रकारची यांत्रिकी दिली; तर त्या त्या गावामध्ये त्या त्या यांत्रिकीचा वापर शेतकऱ्यांना किरायाने करता येईल. शेतीमध्ये यांत्रिकीचा वापर न केल्यामुळे, शेतकऱ्याच्या उत्पादकतेत होणारे नुकसान टाळून उत्पादकता वाढवता येईल. त्यासाठीची योजनादेखील राज्य सरकारने तयार केली आहे. मोठ्या प्रमाणात शेतीची उत्पादकता वाढवून त्याचे क्लस्टर तयार करून त्यांना क्लस्टरला सर्व प्रकारच्या यांत्रिकीकरणाकरिता सवलत द्यायची आणि त्या माध्यमातून गावातल्या छोट्यातल्या छोट्या शेतकऱ्याला आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यायचे, हा आमचा प्रयत्न आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातल्या जवळजवळ १५ जिल्ह्यांमधील गावांमध्ये राबवण्यासाठी आम्ही जागतिक बँकेच्या साहाय्याने एक योजना तयार केली आहे. या माध्यमातून शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी ४००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे.

आहे. आता कुणी जर असे म्हणत असेल की चालू ही कर्ज माफ करा आणि थकीतही कर्ज माफ करा, तर मला सांगावेसे वाटते की, राज्याने जवळपास १ लाख ४० हजार कोटींच्या कर्जाचे वाटप केलेले आहे आणि तेवढे तर राज्याचे उत्पन्नदेखील नाही. जर ही कर्जमाफी करायची ठरवली तर आपले नियोजनच ढासळेल. शिवाय दुसरी बाब अशी की अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत केलीच पाहिजे. पण जे स्वतःच्या कर्तृत्वाने उभे आहेत, त्यांनाही जर आपण अशा प्रकारची सवय लावली तर यानंतर पूर्ण बँका उद्ध्वस्त होतील, सोसायट्या उद्ध्वस्त होतील, कधीच कुणी कर्ज भरणार नाही. आज बघा शेतकरी आत्महत्येचा प्रश्न कुठल्या जिल्ह्यात आहे? आपल्या लक्षात येईल की, ज्या जिल्ह्यातील बँका संपल्या तिथल्या शेकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. ज्या जिल्ह्यात बँका आहेत तेथे आत्महत्यांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे या जिल्हा बँका टिकल्या पाहिजेत, संस्था टिकल्या पाहिजेत, आणि शेतकऱ्यांना मदतही झाली पाहिजे. सर्वाधिक गरजूंना अधिक मदत करण्याचे हेच तत्त्व आम्ही या कर्जमाफीसाठी वापरले आहे. तरीदेखील इतर राज्यांच्या तुलनेत किंवा महाराष्ट्रात यापूर्वी करण्यात आलेल्या ६ हजार ९०० कोटींच्या कर्जमाफीच्या तुलनेत आता करण्यात आलेली कर्जमाफी ही प्रचंड मोठी आहे.

**आपण जाहीर केलेल्या योजनेनुसार ८९ लाख शेतकऱ्यांना फायदा होईल, पण बाकी शेतकऱ्यांचे काय? जाहीर करण्यात आलेली मदत शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यावर कधी व कशाप्रकारे जमा होणार आहे? – अनिल लवटे, नाशिक ( ई-मेल)**

**मुख्यमंत्री –** महाराष्ट्रामध्ये एकूण १ कोटी ३४ लाख खातेदार शेतकरी आहेत. यांपैकी ९० लाख शेतकरी असे आहेत की ज्यांनी कधी ना कधी शेतीसाठी कर्ज घेतलेले आहे. त्यापैकी ८९ लाख शेतकरी हे या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. थकीत कर्जधारक शेतकरी आणि चालू कर्जधारक शेतकरी यांच्या आता उपलब्ध असणाऱ्या खात्याची जी संख्या आहे तीच ८९ लाख इतकी आहे. ती सर्व या योजनेत आहेत. या सर्व शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने कर्ज उपलब्ध होणारच आहे. थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये ही कर्जाची रक्कम जमा करण्यात येणार आहे. त्याची आर्थिक तरतूद राज्य सरकारमार्फत करण्यात येणार आहे. त्यामुळे बँकांनी शेतकऱ्यांना अडवून ठेवण्याचे काहीच कारण नाही.

**कर्जमाफी देऊन सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिलेय; परंतु कर्जमाफी होताच तेच शेतकरी परत माफीइतक्या रकमेचे कर्ज बँकेकडून घेणार असल्याने सातबारा कोरा कसा होईल? – गजानन काटकर, वडोद बाजार, फुलंब्री**

**४० लाख शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केला असे आपण जाहीर केलेय, हा आकडा कुठून आला. – सर्जेराव पाटील, कोल्हापूर (थेट स्टुडिओतून )**

**मुख्यमंत्री–** आपल्याकडे जी पद्धत आहे, त्यानुसार राज्यस्तरीय बँकिंग समिती असते. (एसएलबीसी) ही सर्व बँकांची मिळून एकत्रित



**आडसाली उसाची जी लागवड असते त्यात १८ महिन्यांचा कालावधी असतो. २०१० साली ज्यांनी कर्ज घेतलेले आहे त्याचे कर्ज २०१२ साली थकलेले असते. २०१२-१३ हा दुष्काळाचा कालावधी होता, आणि आपली जी कर्जमाफीची अंतिम तारीख आहे ती १ एप्रिल २०१२ आहे , ती निश्चितच अन्यायकारक आहे असे मला वाटते. – मच्छिंद्र घोलप, अहमदनगर (थेट स्टुडिओतून)**

**मुख्यमंत्री –** आपण जे सांगत आहात ते अनेकांनी आमच्या लक्षात आणून दिलेय. तसेच माझ्याही लक्षात आले की अंतिम तारीख वाढवल्याने त्याचा आमच्यावरचा भारदेखील फार जास्त वाढत नाहीये. हा तांत्रिक मुद्दा आहे. त्यामुळेच मी सांगितल्याप्रमाणे राज्यसरकार जरूर २००९नंतरच्या थकीत कर्जाचा विचार करेल.

समिती असते. 'बँक ऑफ महाराष्ट्र' ही महाराष्ट्रातील आघाडीची बँक. याच बँकेचे अध्यक्ष हे या समितीचे अध्यक्ष असतात. शिवाय इतर बँकांचे प्रमुख हे या समितीचे सदस्य असतात. प्रत्येक वर्षी केल्या जाणाऱ्या कर्जवाटपाचे नियोजन ही समिती तयार करते. कृषी क्षेत्रात कुठे नि किती कर्जाचे वितरण व्हायला पाहिजे याचं नियोजन याच समितीमार्फत केले जाते. ठरलेल्या नियोजनाप्रमाणे या समितीमार्फत कर्जाचे वितरण केले जाते. त्याचा हिशेबदेखील ही समितीच ठेवते. त्यामुळे ही जी थकीत कर्जधारकांची यादी आहे ती या समितीमार्फतच सरकारकडे आलेली आहे. समितीने या यादीची वैधता तपासलेली आहे. त्या यादीप्रमाणे ३६ लाखांपेक्षा अधिक शेतकरी असे आहेत की, ज्यांच्याकडे असलेले कर्ज हे दीड लाखांपेक्षा कमी आहे. त्यामुळे हे शेतकरी या कर्जमाफीच्या योजनेसाठी पात्र ठरतात. त्यामुळे हा जो काही ४० लाखांचा आकडा आहे तो काही मी आणलेला आकडा नाही, हा आकडा राज्यस्तरीय बँकिंग समितीने तयार केलेल्या कागदपत्रांच्या आधारे देण्यात आला आहे.

सातबारा कोरा करणे, याचा अर्थ असा की ज्या शेतकऱ्यांकडे कर्ज थकीत आहे, ज्यांच्यावर आधीच कर्जाचे ओझे असल्याने ज्यांना नव्याने कर्ज मिळू शकत नाही अशा कर्जधारक शेतकऱ्यांचे आधीचे कर्ज फेडून; नव्याने कर्ज घेता येईल अशा प्रकारची व्यवस्था उभी करून द्यायची. त्यामुळे जर कुणाला असे वाटत असेल की, एकदा सातबारा कोरा झाला की पुन्हा कर्जच घ्यायचे नाही, तर हे असे वाटणे चुकीचे आहे. याकरिता सातबारा कोरा करायचा नाहीये तर शेतकऱ्यांना कर्ज मिळालेच पाहिजे. पण ते सावकाराऐवजी संस्थेकडून घेता आले पाहिजे.

**३४ हजार कोटींचा मेळ कसा घातला हे मला समजलेले नाहीये. जर समजा ९० लाख शेतकऱ्यांना प्रत्येकी दीड लाख याप्रमाणे कर्जमाफी केली तर एकूण कर्जमाफीचा आकडा १३ हजार ५०० कोटी इतका येतो , मग राहिलेले कर्ज कुणाचे माफ होणार आहे? – रविंद्र भागात, वाकोद, जळगाव (एसएमएस)**

**मुख्यमंत्री–** रविंद्रजी, आपले गणित चुकलेय. मी हे गणित थोडे सोपे करून सांगतो. खरे तर ९० लाख शेतकऱ्यांना दीड लाख रुपये कर्ज माफ केले तर ते १ लाख ३५ हजार कोटी इतके होतात. १३ हजार ५०० कोटी होत नाहीत. सुदैवाने ९० लाख शेतकऱ्यांचे दीड लाख माफ करायचे नाहीयेत. एकूण थकीत शेतकऱ्यांची संख्या ही साधारणतः ४२ ते ४३ लाख आहे. त्यातले ही ३६ लाख शेतकरी हे दीड लाखांच्या आतले आहेत . साधारणतः ३१ लाख शेतकरी हे एक लाखांपेक्षा कमी कर्ज असणारे आहेत. त्यामुळे हे जे गणित सरकारमार्फत सांगण्यात येतेय ते पद्धतशीरपणे हिशेब करून वास्तविकतेच्या आधारे सांगण्यात येतेय. माझी सर्वांना विनंती आहे की, उगाच समाजमाध्यमातून पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर कुणीही विश्वास ठेऊ नये. सरकारला काहीच लपवता येत नाही. माहितीचा अधिकार आहे. शासन निर्णय असतात, ते सर्वांसाठी खुले असतात. अंदाजे हिशेबाचे आकडे देऊन सरकारमध्ये काम करता नाही येत. जो खरा हिशेब आहे तोच द्यावा लागतो.

**कर्जमाफी झालीच आहे, पण अनेक करदात्यांना आणि इतरांनाही या कर्जमाफीचा त्रास होऊ नये. पुन्हा मोठ्या प्रमाणात बँकांना लुबाडू नये. चुकीच्या व गरज नसणारांच्या हाती हा पैसा जाऊ नये म्हणून आपण काय करणार आहात? – सुरेश दिवाण, लातूर (एसएमएस)**

**मुख्यमंत्री –** ही गोष्ट खरी आहे की, २००८ सालची कर्जमाफी छोटी होती. तरीदेखील त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे आढळून आले. त्यामुळे अशाप्रकारे कर्जमाफीच्या योजनेचा दुरुपयोग करता येऊ नये यासाठी सरकार पूर्णपणे सजग आहे. कर्जधारक शेतकऱ्यांच्या बँक खात्याची वैधता तपासण्याचे काम सुरू आहे. कर्जमाफीचा लाभ देताना प्रत्येक शेतकऱ्याचा आधार क्रमांक घेतला जाणार आहे. तो आधार क्रमांक शेतकऱ्याच्या बँक खात्याशी जोडून त्या आधारे संबंधित



शेतकऱ्याच्या इतर बँक खात्याची वैधता तपासण्यात येणार आहे त्यामुळे. लाभार्थी हा खरा शेतकरी असला पाहिजे, शेतीसाठीच त्याने कर्ज घेतले असले पाहिजे. शेतीसंलग्न व्यवसायासाठी घेण्यात आलेल्या कर्जाचादेखील या योजनेत समावेश आहे, परंतु याव्यतिरिक्त इतर कुठल्याही कारणासाठी जर हा पैसा वापरण्यात आला असेल तर मात्र कर्जमाफी देण्याची आवश्यकता नाही. यावरही सरकारचे लक्ष असणार

आहे. त्यामुळे या योजनेचा गैरवापर होऊ नये हे मोठेच आव्हान सरकार समोर असणार आहे. यात काही घोटाळा होऊ नये याची योग्य ती दक्षता घेण्यात येत आहे.

**कर्जमाफी करून शेतकरी सुखी होईल, असे मला वाटत नाही. २४ तास वीज, चांगले रस्ते, हमीभाव, उत्कृष्ट बी-बियाणे ही शेतकऱ्यांची खरी गरज आहे. तेव्हा कर्जमाफीचा पैसा जर या सर्व कामांवर खर्च झाला तर कधीच कर्जमाफीची गरज पडणार नाही. याबद्दल आपल्याला काय वाटते..?– प्रशांत सुखदेव निकम (एसएमएस)**

**मुख्यमंत्री–** आपले म्हणणे अगदी योग्य आहे. कर्जमाफी हा काही अंतिम उपाय नाही, हे मी आधीपासूनच सांगतोय. शेती क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे हाच यावरचा उपाय आहे. पण आजघडीला कर्जमाफी देखील यासाठी महत्त्वाची होती कारण गेल्या ४ वर्षात शेतकऱ्यांना मोठ्या दुष्काळाचा सामना करावा लागलेला आहे. त्यांना जर कर्ज नाही मिळाले तर ते पुन्हा सावकारी पाशात अडकतील आणि त्यातून आपली जमीनदेखील गमावून बसतील. अशा शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ही कर्जमाफी आहे. शेतकऱ्यांना वीज देण्यासाठी आता सरकारमार्फत 'सोलर फिडर'ची योजना नव्याने आणण्यात येत आहे. त्यामुळे त्या फिडरवरच्या सर्व पंपांना दिवसा १२ तास चांगली वीज उपलब्ध होणार आहे. त्यासोबतच एनर्जी इफिशियंट पंपदेखील आणण्यात येत आहेत. आज शेतकरी जो ५ एच.पी.चा पंप वापरतो, तो पंप ७ एच.पी.ची वीज वापरतो आणि ३ एच.पी.च्या क्षमतेने पाणी फेकतो. परंतु एनर्जी इफिशियंट पंप जर ५ एच.पी.चा लावला तर तो वीज ३ एच.पी.ची वापरतो आणि पाणी ७ एच.पी.च्या क्षमतेने फेकतो. त्यामुळे ही योजना मोठ्या प्रमाणात राबवण्यात येणार आहे. ड्रिप इरिगेशनची योजनासुद्धा आणण्यात येत आहे. 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' या नवीन योजनेच्या माध्यमातून ४४ हजार तलावांमधील गाळ काढून पुन्हा त्यामध्ये पाणी संचय होईल. अशा प्रकारे गुंतवणुकीची योजना सरकारने तयार केली आहे. बी-बियाणांचा व्यवस्थित पुरवठा व्हावा, यासाठी देखील गुंतवणूक करण्यात येणार आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांना सुखी करण्यासाठी शेती क्षेत्रातील गुंतवणुकीवर राज्य सरकार मोठ्या प्रमाणात भर देत आहे.

**आम्ही ३० जून रोजी बँक थकीतदार झालो आहोत, आम्हाला कर्जमाफीचा लाभ मिळेल का? नाहीतर मग कोणते व किती अनुदान मिळणार? जर आम्ही कर्ज भरले तर आम्हाला पुन्हा पेरणीसाठी कर्ज मिळेल का? – माणिक चाफेकर, नागपूर (एसएमएस)**

**मागील अनेक वर्षांपासून कर्जबाजारी असलेल्या अनेक शेतकऱ्यांना पुनर्गठनाच्या नावाखाली चालू बाकीदार केले. आता ३० जून २०१७ पर्यंतच सरकारने कर्जमाफी दिल्यामुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिलेत. तेव्हा २०१७ पर्यंतच्या सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे. – शशिकांत माळोदे , हदगाव. (एसएमएस)**

**मुख्यमंत्री –** दुर्दैवाने ज्या लोकांनी २०१६ या दुष्काळाच्या वर्षात देखील कर्ज भरले त्यांनी आपल्यालाही कर्जमाफीचा लाभ मिळेल म्हणून २०१७ सालचे कर्ज भरलेले नाही. कधीही कर्जमाफी करताना त्यासाठी निकष म्हणून दुष्काळी वर्षाचा विचार केला जातो. म्हणून या वेळीदेखील कर्जमाफीसाठी ३० जून २०१७ ही तारीख ठरली, पण आता नवीन घोषणेनुसार यात एक महिन्याची वाढ करण्यात आलेली असून ती ३० जुलै करण्यात आली आहे. त्यामुळे ३० जुलै पर्यंत शेतकरी कर्ज भरू शकतात. त्यानंतर त्यांना घोषित केल्याप्रमाणे २५००० रुपयांचे

**शेतमालाला चांगला हमीभाव मिळवून देण्यासाठी आणि त्या माध्यमातून शेतकऱ्याला कर्जमुक्तीकडे नेण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात? – पांडुरंग आव्हाड, कळंब (थेट स्टुडिओतून)**

**मुख्यमंत्री –** शेतमालाला हमीभाव मिळवून देण्यासाठी माल तारण योजना सरकारने सुरू केली आहे. जवळपास ४३ खासगी बाजार सुरू करण्यात आले आहेत. फळे आणि भाजीपाला नियमनमुक्त करण्यात आलेला आहे. मध्यंतरी धान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले त्यालाही प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यामुळे कडधान्य नियमनमुक्तीत आणावीत असा विचार सरकार करत आहे. त्याचबरोबर खासगी परवाने देण्यात आलेले आहेत. या माध्यमातून थेट खरेदी करता येईल. जोपर्यंत शेतकऱ्याला बाजार खुला करून दिला जाणार नाही, तोपर्यंत त्याच्या मालाला भाव मिळू शकणार नाही, त्यामुळेच बाजार खुला करण्याची व्यवस्था करण्यासाठी कायद्यामध्ये वेगवेगळे बदल करण्यात आलेले आहेत. ४५ निर्यात सुविधा केंद्रांची सुरुवात करण्यात आली आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांचे ७२ आठवडी बाजार मोठ्या शहरांमध्ये सुरू करण्यात आलेले आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या अनुदानाच्या माध्यमातून बाजार साखळी तयार करण्यात येत आहे. या सगळ्यांचा लाभ शेतकऱ्यांना निश्चितपणे मिळेल.



अनुदान निश्चितपणे मिळेल. नियमित कर्जदार म्हणून त्यांना अनुदानाचा लाभ तर मिळेलच पण योजनांचा लाभदेखील मिळेल. तेव्हा माझी विनंती आहे की, जे शेतकरी आपल्यालाही कर्जमाफी मिळेल अशी आशा ठेवून बसले होते त्यांनी ३० जुलैपर्यंत कर्ज भरावे. त्यांच्याच भरवशावर बँका आणि संस्था टिकून आहेत. त्यामुळे १ महिन्याच्या मिळालेल्या वाढीव मुदतीत आपले कर्ज भरा. ३० जून २०१६ ही कर्जमाफीसाठीची अंतिम तारीख कुठल्याही परिस्थितीत बदलली जाणार नाही. रिझर्व्ह बँकसुद्धा त्याला परवानगी देईल असे देखील मला वाटत नाही.

**सर, आम्हाला पुन्हा पीक कर्ज केव्हापासून मिळेल? ते प्रतिएकर किती हजार मिळेल? – सतीश गीते (ई–मेल)**

**पाच वर्ष नियमित कर्ज भरणाऱ्यांना बिनव्याजी कर्ज मिळावे.**

**– सोनजी खोरणे, मेहकर (एसएमएस)**

**मुख्यमंत्री –** डीफॉल्ट यादीतून बाहेर आल्यानंतर शेतकऱ्यांना नियमित पीक कर्ज मिळू शकेल. वेगवेगळ्या पिकानुसार जे नियम आहेत त्याप्रमाणे ते कर्ज मिळू शकेल. एक लाखांपर्यंत ० टक्क्याने तर एक ते तीन लाखांपर्यंत २ टक्के दराने शेतकऱ्यांना हे कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल पण शक्य झाल्यास अजून यात काही सवलत देता येईल का या दृष्टीने विचार सुरू आहे.



छाया: अश्पाक किल्लेदार

**विदर्भातील बहुतेक शेतकरी पीक कर्जापासून वंचित आहेत, त्यांची एकूण संख्या किती? त्या शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सरकारकडे कोणती योजना आहे? नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय झालाय असे वाटत नाही का? – धनंजय भोसले, औसा (थेट स्टुडिओतून)**

**मुख्यमंत्री –** विदर्भातील थकीत शेतकऱ्यांची संख्या वेगवेगळ्या जिल्ह्यात वेगवेगळी आहे. बुलडाणा जिल्ह्यात २ लाख ४३ हजार शेतकऱ्यांना पीक कर्ज नव्याने उपलब्ध होईल. यवतमाळ जिल्ह्यात २ लाख १४ हजार शेतकरी तर मराठवाड्यातील बीड जिल्ह्यामध्ये २ लाख १० हजार शेतकरी आहेत. नगरमध्ये २ लाख शेतकरी, नाशिकमध्ये १ लाख ६० हजार शेतकरी आहेत. चालू कर्जाच्या संदर्भात मला पुन्हा एकदा असे सांगावसे वाटते की, चालू कर्जाच्या माफीसाठी कुठल्याही राज्याने कुठलीही योजना तयार केलेली नाही. तरीही महाराष्ट्र हे असे पहिले राज्य आहे जिथे चालू शेतकऱ्यांसाठी योजना देण्यात आली आहे. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना योजनांच्या माध्यमातून लाभ देण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

महाकर्जमाफी

**ज्या शेतकऱ्यांनी २०१० नंतर कर्ज घेतले आणि २०१६ पर्यंत ते भरू शकले नाहीत आणि त्यांनी ओटीएसचा लाभ घेतला असेल तर ते शेतकरी सध्या काळ्या यादीत आहे. अशा शेतकऱ्यांना काळ्या यादीतून वगळण्यात यावे म्हणजे त्यांनाही कर्ज मिळू शकेल. नाशिक जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना सध्या ॲक्सिस बँकेच्या नोटीस येत आहेत आणि एक्सिस बँकेचे ज्युरिसडीक्शन (न्यायालयीन कार्यकक्षा )कोलकाता ठेवण्यात आले आहे. तेव्हा हे ज्युरिसडीक्शन ज्या ठिकाणी कर्ज घेण्यात आले आहे ते ठेवण्यात यावं अशी विनंती करतो – धनंजय जाधव, पुणतांबा (थेट स्टुडिओतून)**

**मुख्यमंत्री –** धनंजय जाधव यांच्याशी माझा नुकताच परिचय झाला. परिचय होण्याचे कारण असे की, मूळ जे पुणतांब्याचे आंदोलन सुरू झाले त्यातील एक आंदोलक ते होते. सर्वप्रथम जी चर्चा आम्ही केली ती त्यांच्याशीच केली. त्यावेळी अतिशय सकारात्मक भूमिका त्यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने ताकदीने मांडली होती.

आताचा जो ओटीएस करण्यात येतोय तो एकरकमी परतफेड (ओटीएस) केल्यानंतर शेतकऱ्याला कर्ज मिळू शकेल. शेतकरी कर्जाकरिता काळ्या यादीत टाकला जाणार नाही. जुन्या कुठल्या ओटीएसमुळे जर कुणी काळ्या यादीत टाकला गेला असेल तर त्या शेतकऱ्याला पीक कर्ज मिळू शकेल ही व्यवस्था आम्ही नक्की करू. ॲक्सिस बँकेच्या संदर्भात आपण जे सांगितले ते मी तत्काळ राज्यस्तरीय बँकिंग समितीच्या अध्यक्षांना कळवतो. ॲक्सिस बँकेचे ज्युरिसडीक्शन (न्यायालयीन कार्यकक्षा) कोलकाता असण्याचे काहीच कारण नाही. त्यामुळे ते मुंबई किंवा नाशिक करण्यात यावे, असा प्रयत्न आम्ही नक्कीच करू.

**शेतकऱ्यांना कर्जमाफी देताना वैयक्तिक शौचालयांची अट असावी, एका महिन्यात महाराष्ट्र हागणदारीमुक्त होईल – राजेश्वर ठाकरे, बेनोडा शहीद (एसएमएस)**

**मुख्यमंत्री –** महाराष्ट्रातील सामान्य माणसाने हागणदारीमुक्तीसाठी अतिशय चांगला प्रयत्न केला आहे. गेल्या २ वर्षांमध्ये ४० लाख शौचालये महाराष्ट्रात बांधली गेली आहेत. राज्यातील ११ जिल्हे आणि १५५ तालुके तसेच १६,००० ग्रामपंचायती व २४,००० गावे हागणदारीमुक्त झाले आहेत. ऑक्टोबर २०१८ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र हागणदारीमुक्त करण्याचा आमचा संकल्प आहे. तरी सूचना योग्य आहे, काही लोकांशी चर्चा करून आम्ही यावर विचार करू.

**संकलन व शब्दांकन : अजय जाधव,** विभागीय संपर्क अधिकारी आणि **अजित बायस**

# ऐतिहासिक निर्णय !

## कर्जमाफी झाली...



## छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना

### देशातील आजवरची सर्वात मोठी कर्जमाफी

राज्यात एकूण १३६ लाख शेतकरी आहेत. हे शेतकरी पीक कर्ज व अन्य शेती कर्जासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व व्यापारी बँकांवर अवलंबून असतात. या बँकांमार्फत दिल्या जाणाऱ्या पीक कर्जासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांना व्याज सवलतीच्या योजना राबवण्यात येतात. त्यामुळे या शेतकऱ्यांना पीक कर्ज शून्य टक्के किंवा सवलतीच्या दराने उपलब्ध होऊन त्याची मुदतीत परतफेड करण्यास मदत होते. २०१२-१३ ते २०१५-१६ या सलग चार वर्षात राज्यातील विविध भागात अपुरा पाऊस झाल्यामुळे खरीप / रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारी जाहीर करण्यात आली होती. सन २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षात राज्याच्या काही भागात अवेळी पाऊस व गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यामुळे बरेच शेतकरी पीक कर्जाची / शेती कर्जाची मुदतीत परतफेड करु शकले नाहीत. परिणामी हे शेतकरी थकबाकीदार राहिल्यामुळे या शेतकऱ्यांना बँकांकडून नव्याने पीक कर्ज घेण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मार्च २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अशा शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याबाबत राज्य शासनाची भूमिका सकारात्मक आहे असे, मुख्यमंत्री यांनी विधानसभेत निवेदन केले होते.

मुख्यमंत्री यांनी विधिमंडळात केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कर्जमाफीच्या संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी शासनाने मा.मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन व सार्वजनिक बांधकाम यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णयाद्वारे कर्जमाफी निकष निर्धारण समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीने विविध शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांबरोबर केलेल्या चर्चेअंती काही निकषाच्या अधीन राहून राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

#### शासन निर्णय

उपरोक्त पार्श्वभूमीवर २४ जून २०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

(I) **योजनेचा तपशील:** १) सदर योजनेचे नाव छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ असेल. २) या योजनेंतर्गत कर्जमाफीसाठी पात्रता ठरविताना थकबाकीदार शेतकऱ्यांचे अल्प / अत्यल्प भूधारक याप्रमाणे जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता दि.१.४.२००९ रोजी व त्यानंतर पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या व अशा कर्जापैकी दि.३०.६.२०१६ रोजी थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांना काही निकषाच्या अधीन राहून खालीलप्रमाणे सरसकट कर्जमाफी व प्रोत्साहनपर इतर लाभ देण्यात यावेत. ■ दिनांक ३०.६.२०१६ रोजी थकीत असलेले मुद्दल व व्याजासह रु.१.५ लाख मर्यादेपर्यंतचे कर्ज माफ करण्यात यावे. ■ मुद्दल व व्याजासह रु.१.५ लाखपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता योजना (One Time Settlement) म्हणून दि.३०.६.२०१६ रोजी थकबाकी कर्जापैकी शासनातर्फे रु.१.५ लाख रकमेचा लाभ देण्यात यावा. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची संपूर्ण रक्कम बँकेत जमा केल्यावर शासनातर्फे रु.१.५ लाख लाभाची रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यात यावी. ■ २०१५-१६ या वर्षात घेतलेल्या पीक कर्जाची दि.३०.६.२०१६ पर्यंत पूर्णत : परतफेड केल्यास शेतकऱ्यांनी सन २०१६-१७ वर्षात घेतलेल्या कर्जाची रक्कम दि.३१.७.२०१७ पर्यंत पूर्णत : परतफेड केल्यास त्यांना सन २०१५-१६ या वर्षामधील पूर्णत : परतफेड केलेल्या पीक कर्जाच्या २५ % किंवा रु.२५,०००/- पर्यंत जी कमी असेल ती रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येईल. मात्र ही रक्कम किमान रु.१५,०००/- असेल. तथापि, शेतकऱ्यांनी परतफेड केलेली रक्कम रु.१५,०००/- पेक्षा कमी असल्यास अशी संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना शासनामार्फत देण्यात येईल. ■ २००९-१० ते २०१५-१६ या वर्षात कर्जाचे पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांपैकी जे शेतकरी दि.३०.६.२०१६ रोजी थकबाकीदार असतील त्यांना वरील योजनेचा लाभ देण्यात येईल. तथापि, जे थकीत नाहीत त्यांना रु.२५,०००/- रक्कम शासनामार्फत अदा करण्यात येईल.

विविध प्रकारच्या कर्जमाफीचा / प्रोत्साहनपर रकमेचा राज्यातील सुमारे ८९ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार असून त्यासाठी एकूण अंदाजे रु.३४,०२२ कोटी खर्चाची तरतूद करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

(II) **सदर कर्जमाफी योजनेसाठी खालीलप्रमाणे निकष निश्चित**



# कर्जमाफी योजनेच्या व्याप्तीत वाढ

राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या ऐतिहासिक योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेतला असून २००९ नंतरच्या कर्जमाफीनंतरच्या कालावधीत कर्ज घेतलेल्या परंतु ३० जून २०१६ पर्यंत थकीत राहिलेल्या शेतकऱ्यांचाही आता छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत समावेश करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

त्याचप्रमाणे नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्यासाठीची मुदत एक महिन्याने वाढवून ती ३१ जुलै २०१७ पर्यंत करण्याचाही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दीड लाखापेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या शेतकऱ्यांना एकरकमी परतफेड योजनेंतर्गत (ओटीएस) दीड लाखावरील रक्कम भरण्याचा निश्चित कालावधी शासन निर्णयात नमूद करण्यात आलेला नव्हता. त्यांना पैशाची उपलब्धता करण्यास पुरेसा वेळ मिळावा म्हणून अशा शेतकऱ्यांना दीड लाखावरील रक्कम भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येणार आहे.

शासनाने २८ जून २०१७ च्या शासन निर्णयानुसार जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना १ एप्रिल २०१२ नंतर पीक कर्ज किंवा मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या व ३० जून २०१६ रोजी थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, १ एप्रिल २०१२ पूर्वी कर्ज घेतलेले अनेक थकित शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहत होते. त्यामुळे १ एप्रिल २०१२ हा निकष काढून त्यात २००९ नंतरच्या थकबाकीदार शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२०१६-१७ या वर्षात पीक कर्ज घेतलेल्या व या कर्जाची ३० जून २०१७ पर्यंत नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेंतर्गत परतफेड केलेल्या कर्जाच्या २५ टक्के अथवा कमाल २५ हजार आणि किमान १५ हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, या संदर्भातील २८ जून २०१७ च्या शासन निर्णयातील ३० जून २०१७ च्या मर्यादेमुळे अशा शेतकऱ्यांना २०१६-१७ मधील कर्जाची परतफेड करण्यासाठी पुरेसा अवधी मिळणे आवश्यक असल्याने या वर्षातील पीक कर्जाची परतफेड करण्यासाठी ३१ जुलै २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतला आहे.

**करण्यात येत आहेत.**

■ या योजनेंतर्गत कर्जमाफी व इतर प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी शेतकरी कुटुंब' हा निकष विचारात घेण्यात येईल. कुटुंब या व्याख्येत पती, पत्नी व १८ वर्षाखालील मुलांचा समावेश असेल. ■ पात्र शेतकरी कुटुंबातील कर्जमाफीच्या अनुज्ञेय रकमेत कुटुंबातील कर्जदार शेतकरी महिला असल्यास त्यांच्या कर्जाच्या रकमेचा या योजनेखाली प्राधान्याने विचार करण्यात येईल. ■ या योजनेसाठी केवळ राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवती सहकारी बँका. ■ दि.१४.६.२०१७ व दि.२०.६.२०१७ च्या शासन निर्णयास अनुसरून थकबाकीदार शेतकऱ्यांना बँकामार्फत खरीप २०१७ या हंगामासाठी शासन हमीवर देण्यात येणाऱ्या रु.१०,००० मर्यादेपर्यंत पीक कर्जाची रक्कम शेतकऱ्यास मिळणाऱ्या कर्जमाफीच्या रकमेतून समायोजित करण्यात येईल. योजनेखाली कर्जमाफीसाठी कुटुंब हा निकष असल्याने एका कुटुंबामध्ये एकापेक्षा जास्त खातेदाराने घेतलेल्या कर्जाची संपूर्ण रक्कम त्या कुटुंबास मिळणाऱ्या कर्जमाफीच्या रकमेतून समायोजन करण्यात येईल. (कुटुंबाची व्याख्या (II) १ मध्ये वरीलप्रमाणेच असेल.)

(III) **सदर कर्जमाफी योजनेचा लाभ मिळण्यास खालील व्यक्ती पात्र असणार नाहीत.**

■ महाराष्ट्र राज्यातील आजी/माजी मंत्री/राज्यमंत्री, आजी/माजी खासदार / राज्यसभा सदस्य, आजी/माजी विधानसभा / विधान परिषद सदस्य. ■ जिल्हा परिषद सदस्य, महानगरपालिका यांचे सदस्य. ■ केंद्र व राज्य शासनाचे सर्व अधिकारी /कर्मचारी, निमशासकीय संस्थांचे सर्व अधिकारी / कर्मचारी व केंद्र अथवा राज्य शासन अनुदानित संस्थांचे सर्व अधिकारी / कर्मचारी (चतुर्थ श्रेणी कर्मचारी वगळून) ■ शेतीबाह्य उत्पन्नातून आयकर भरणाऱ्या व्यक्ती. ■ निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन रुपये पंधरा हजारापेक्षा जास्त आहे. (माजी सैनिक वगळून) ■ कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी साखर कारखाना, सहकारी सुतगिरणी, नागरी सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सहकारी दूध संघ यांचे अधिकारी व पदाधिकारी (अध्यक्ष व उपाध्यक्ष) आणि मजूर सहकारी संस्थेचे अधक्ष. ■ रुपये ३ लाखापेक्षा जास्त ढोबळ उत्पन्न असलेली सेवा कर भरण्यासाठी नोंदणीकृत व्यक्ती. ■ जी व्यक्ती मूल्यवर्धित कर वा सेवा कर कायद्यांगर्तत नोंदणीकृत आहे व ज्याची २०१६-१७ मधील वार्षिक उलाढाल रु.१०.०० लक्ष किंवा अधिक आहे.

(IV) **या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वित्त विभागाच्या सहमतीने मार्गदर्शक तत्त्वे, निकष व सविस्तर निर्देश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. तसेच या योजनेसाठी आवश्यकतेप्रमाणे तांत्रिक सेवापुरवठादार यांची सेवा घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

(V) **योजनेच्या अंमलबजावणीसाठी काही अडचणी उद्‌भवल्यास अथवा त्यामध्ये काही प्रासंगिक आवश्यक बदल करावयाचे असल्यास मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात येईल. ही उपसमिती पुढील ६ महिने कार्यरत असेल.**

(सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
परिपत्रक दि. २८ जून २०१७, ५ जुलै २०१७ आणि २० जुलै २०१७) ■■



# कर्जमाफी दिल्याबद्दल शेतकऱ्यांनी व्यक्त केली कृतज्ञता

शेतकऱ्यांना दिलासा देणारी कर्जमाफी जाहीर केल्याबद्दल राज्यातील शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यांतून आलेल्या सुमारे सत्तर शेतकऱ्यांनी वर्षा या निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी जालना जिल्ह्यातील केशव मदन या शेतकऱ्याने २० वर्षांत पहिल्यांदा शेतमालाला योग्य भाव मिळाला आहे, असे सांगितले. या ऐतिहासिक निर्णयाचा तरुण शेतकऱ्यांना विशेष फायदा होईल, असे औरंगाबाद येथील कैलास निकम म्हणाले तर हिंगोली येथील एकनाथ जगताप या ज्येष्ठ शेतकऱ्याने गावात फटाके फोडून आनंद साजरा केला असे सांगितले. याशिवाय बीड येथील दत्ता जाधव, नांदेड येथील आत्माराम पाटील, लातूर येथील मारुती घोणसे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. जिंतूर तालुक्यातील वयोवृद्ध शेतकरी अश्रुबा सांगळे यांनी मुख्यमंत्र्यांना खास शेतकऱ्यासारखा पटका बांधला.

या वेळी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, खासदार रावसाहेब दानवे, आमदार सर्वश्री सुरजितसिंह ठाकूर, प्रशांत बंब, नारायण कुचे, तानाजी मुटकुळे, यांच्यासह शिरीष बोराळकर, दिलीप थोरात, विकास कुलकर्णी यांच्यासह इतर शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या पाठीशी राहाल ही अपेक्षा!

या भेटीच्या वेळी उपस्थित शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री यांना शेतकऱ्यांच्या श्रमाची साथीदार असलेली बैलगाडीची प्रतिकृती भेट दिली. तसेच मुख्यमंत्र्यांना भावपूर्ण पत्र आठवण म्हणून भेट दिले. या पत्रात त्यांनी लिहिले आहे की, 'तुम्ही नुसती कर्जमाफी जाहीर केली नाही, ती योग्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचली पाहिजे याची काळजी घेतली. आजपर्यंत कर्जमाफी देताना जिल्हावार शेतकऱ्यांची आकडेवारी जाहीर करणारे पहिले मुख्यमंत्री पाहिले आम्ही. ३६ लाख दहा हजार २१६ शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार आहे असे नेमके सांगण्यासाठी पारदर्शकता लागते. ती तुमच्यात आहे हे तुम्ही दाखवून दिले.

तुमचे असे शेतकरी हिताचे निर्णय पाहून असे वाटते की, तुमच्या विश्वासावर आम्ही शेतीत आणखी धाडसाने नवे प्रयोग करू शकतो. इथून पुढेही असेच शेतकऱ्यांच्या पाठीशी राहाल, ही अपेक्षा आहे'.

## कर्जमाफी तर सुरुवात; कर्जमुक्ती हेच खरे उद्दिष्ट

'महाराष्ट्र शासन शिवछत्रपतींच्या विचारांवर चालणारे शेतकऱ्यांचे सरकार आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे, गरीबांचे कल्याण हेच सरकारचे अंतिम ध्येय आहे. कर्जमाफी ही सुरुवात असून, राज्यातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती हेच शासनाचे खरे उद्दिष्ट आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.' ते म्हणतात, 'मागील काही वर्षात राज्यात दुष्काळाचे सावट होते. मात्र गेल्या वर्षापासून राज्यात समाधानकारक पाऊस झाला आहे. राज्यातील ५० टक्के जनता शेतीवर



‘छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजने’च्या माध्यमातून एक लाख ३२ हजारांच्या कर्जमाफीचे लाभार्थी असलेले शेतकरी श्रीमंत आऊबा हेगडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बैलगाडीची प्रतिमा देऊन सत्कार केला व शेतकऱ्यांच्या वतीने त्यांचे आभार मानले.

अवलंबून असताना राज्याच्या सकल उत्पन्नात शेतीचा वाटा केवळ १० टक्के आहे. त्यासाठी राज्यातील शेतकऱ्याला सक्षम करून शेतीतील गुंतवणुक वाढवण्याची आवश्यकता आहे. गेल्या दोन वर्षात जलयुक्त शिवारच्या माध्यमातून झालेल्या कामातून राज्यातील १२ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी ‘उन्नत शेती, समृद्ध शेतकरी’ अभियान राबवण्यात आले आहे.

शेती व ग्रामविकासावर भर देऊन महाराष्ट्र बदलण्याचे शासनाचे नियोजन आहे. शेतकऱ्याला सक्षम करण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. सातत्याच्या दुष्काळाने पिचलेल्या शेतकऱ्यांसाठी देशातील सर्वात मोठी कर्जमाफी महाराष्ट्र शासनाने केली आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रती कुटुंब कर्जाची रक्कम तुलनेने कमी आहे. तरीही शासनाने सरसकट प्रत्येकी दीड लाख रुपये कर्जमाफी दिली आहे. शेतीला २४ तास अखंडित वीज पुरवठा होण्यासाठी सोलर फिडरची नवीन योजना शासनाने आणली आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देण्यासाठी फळप्रक्रिया उद्योगांना चालना देण्यात येत आहे. बाजारपेठ आणि शेतकऱ्यांमधील दलालांची साखळी तोडण्यासाठी नवे उपक्रम राबवण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.’


## मुख्यमंत्री शेतकरी साहाय्यता निधी



महाकर्जमाफी

राज्य शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यात आपलेही योगदान असावे या भावनेने विविध व्यक्ती आणि संस्था पुढे येत आहेत. त्या दृष्टीने कर्जमाफीसाठी देण्यात येणाऱ्या विशेष आर्थिक देणग्या स्वीकारण्यासाठी मुख्यमंत्री साहाय्यता कक्षांतर्गत एक स्वतंत्र बँक खाते सुरू करण्यात आले आहे. संस्था आणि व्यक्ती यांनी दिलेली देणगी या खात्यामध्ये जमा केली जाणार आहे. या खात्यातील जमा रक्कम शेतकरी कर्जमाफीच्या योजनेसाठीच उपयोगात आणण्यात येणार आहे. मुख्यमंत्री साहाय्यता कक्षाकडून भारतीय स्टेट बँकेच्या फोर्ट येथील मुंबई मुख्य शाखेमध्ये ‘मुख्यमंत्री शेतकरी साहाय्यता निधी’ या नावाने ३६९७७०४४०८७ क्रमांकाचे बचत खाते उघडण्यात आले आहे. या शाखेचा कोड ००३० आणि आयएफएससी कोड SBIN०००0३०० असा आहे. या खात्यावर इच्छूक देणगीदारांना एनईएफटी अथवा धनादेशाच्या माध्यमातून पैसे जमा करता येतील.

शेतकरी कर्जमुक्त व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्य शासनाने शेतकरी कर्जमाफीचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाचे सर्वसामान्य जनतेबरोबरच विविध शेतकरी संघटना, सामाजिक तसेच खासगी संस्थांनी स्वागत केले असून या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आपलेही सहकार्य देऊ केले आहे. शासनाच्या कर्जमाफी योजनेस मदत म्हणून मुंबईतील हरमन फिनोकेम या संस्थेने नुकताच मुख्यमंत्री साहाय्यता निधीस २५ लाख रुपयांचा धनादेश दिला आहे. मंत्री आणि आमदारांनीही एक महिन्याचे मानधन कर्जमाफीसाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. कृषी कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान योजनेसाठी आर्थिक साहाय्यता निधी कक्षाकडून अर्थसाहाय्य देण्याचा ठराव मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष न्यासाने मंजूर केला आहे. राज्यातील जास्तीत जास्त लोकांनी शासनाच्या या प्रयत्नांना बळ देण्यासाठी मुख्यमंत्री साहाय्यता कक्षाकडे मदत द्यावी, असे आवाहन कक्षातर्फे करण्यात आले आहे.




# जीएसटी : नव्या युगाचा प्रारंभ

**जीएसटी लागू झाल्यानंतर किरकोळ विरोध वगळता राज्यातील व्यापारी आणि उद्योगांनी या नव्या कररचनेचे स्वागत केले. करसंरचना व्यापक होत असताना समाजातील विविध स्तरातील लोकांनी त्याचा सहजतेने केलेला स्वीकार हे राज्य शासनाचे यश आहे. त्यासोबतच करप्रणाली योग्यरीतीने राबवण्यासाठी करवसुली अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण ते व्यापार-उद्योग क्षेत्रातील विविध संघटनांशी सातत्याने संवादाचा हा परिणाम आहे. त्यामुळे ३० जूनच्या मध्यरात्री राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जीएसटी लागू झाल्याची घोषणा करताच राज्यातही या ऐतिहासिक घटनेचे स्वागत झाले.**

देशात १ जुलैपासून वस्तू व सेवा कर अर्थात गुड्स ॲण्ड सर्व्हिस टॅक्सची (जीएसटी) अंमलबजावणी सुरू झाल्याने एक देश, एक कर आणि एक मार्केट संकल्पना प्रत्यक्षात आली आहे. स्वांतत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या करप्रणालीत आमूलाग्र बदल घडवणाऱ्या या करसंरचनेसाठी केंद्राप्रमाणे राज्यांनाही मोठी तयारी करावी लागली आहे. महाराष्ट्राने विशेष अधिवेशन बोलवून जीएसटी विधेयक आणि त्याअनुषंगाने इतर दोन विधेयके विधिमंडळात मंजूर करून कायदेशीर मार्ग मोकळा केला होता. त्यासोबतच अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणासारखे कार्यक्रम राबवून जीएसटी राबविण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण केल्याने करप्रणालीतील हा बदलता ट्रॅक राज्यासाठी अवघड बनला नाही.

देशात वस्तू आणि सेवा कर आवश्यक आहे, याची चर्चा सुमारे चौदा वर्षांपूर्वी सुरू झाली होती. अप्रत्यक्ष कर सुधारणांचा भाग म्हणून केळकर समितीने २००३ मध्ये अशा कराची शिफारस केली होती. त्यामुळे संपूर्ण देशाला एकाच कराच्या छताखाली आणले तर व्यापार सुरळीत होईल आणि युरोपीयन युनियनपेक्षा मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल हा त्यामागचा हेतू होता. परंतु एक देश, एक कर या रचनेविषयी काही राज्यांच्या मनात शंका-कुशंका होत्या. विशेषतः निर्मिती क्षेत्रात जी राज्ये पुढारलेली होती, त्यांच्या काही करांवर गंडातर येणार हे निश्चित असल्याने महसुलातील तूट कशी भरून येणार हा प्रश्न होता. त्यामुळे महाराष्ट्रासह तमिळनाडू, गुजरातसारख्या राज्यांना यामध्ये भरपाई हवी होती.

जीएसटी कौन्सिल अर्थात वस्तू व सेवा कर परिषदेत सर्व राज्याचे अर्थमंत्री आपापल्या राज्याचे प्रतिनिधत्व करीत होते. महाराष्ट्राच्या महसूल तुटीचा प्रश्न अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार



**राज्यात सेवा आणि उत्पादन या दोन्ही क्षेत्रात उल्लेखनीय काम होत आहे. या दोन्ही क्षेत्रातील प्रगतीसाठी ही करप्रणाली साहाय्यभूत ठरणार आहे. जो कर तुटवडा राज्याला सोसावा लागणार आहे आणि ज्याची भरपाई केंद्र शासनाकडून केली जाणार आहे, ती भरपाई दोन वर्षांपेक्षा जास्त काळ महाराष्ट्राला घ्यावी लागणार नाही, दोन वर्षात राज्य स्वयंपूर्ण होईल. विकसित देशांनी उद्योग व्यवसायासाठी लागणारे धोरण हे सुटसुटीत ठेवले आहे. इतर देशात असलेली सोपी कर पद्धती ही त्या देशाच्या विकासासाठी महत्त्वाची ठरली आहे. आपल्या देशात असलेल्या मुबलक मनुष्यबळाला काम उपलब्ध व्हावे, यासाठी मोठ्या प्रमाणात उद्योग येथे येणे गरजेचे आहे. मेक इन इंडिया, इज आफ डुईंग बिजनेस नंतर आता या करप्रणालीमुळे रोजगार निर्मिती होणार आहे. वस्तू व सेवा करामुळे देशाच्या एकूण सकल उत्पादनात सुमारे ४ टक्के एवढी वाढ होऊ शकेल.**

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

**राज्यात जीएसटी लागू झाल्यानंतर पाच वर्षांत ५ लाख कोटी रुपयांचा महसूल जमा होऊन राज्याची आर्थिक स्थिती भक्कम राहणार आहे. त्यामुळे राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्यास सक्षम असेल. त्याबरोबरच राज्याचा विकासदर दीड ते दोन टक्क्यांनी वाढेल.**

**– सुधीर मुनगंटीवार, वित्त मंत्री**



यांनी ताकदीने मांडला. नवीन करप्रणाली अस्तित्वात आल्यानंतर महसुलातील तुटीची भरपाई केंद्र सरकारने करून द्यावी अशी त्यांची मागणी होती. केंद्र सरकारने त्यांची ही मागणी केवळ आश्वासितच केली नाही तर कायदेशीर पाठबळ देऊन, ज्या राज्यांचे नव्या करप्रणालीमुळे नुकसान होणार आहे त्यांना भरपाई करण्याचे दायित्व स्वीकारले. केवळ नुकसान भरपाईच नाही तर त्यातील दरवर्षीची वाढ लक्षात घेऊन १४ टक्के वाढीसह ही भरपाई मिळणार आहे. अर्थात ही भरपाई पुढील पाच वर्षांसाठीच मिळणार असल्याने तोपर्यंत राज्याला आपल्या उत्पन्न वाढीचे स्रोत मजबूत करावे लागतीलच. शिवाय नवे स्रोत शोधावे लागणार आहेत.

वाढते नागरिकीकरण, दरडोई उत्पन्नात राज्य अग्रेसर असल्याने या ग्राहककेंद्री कराचाही राज्याला लाभ होणार असून; आगामी दोन वर्षातच राज्याचे उत्पन्न निर्धारित कर महसुलापेक्षा वाढेल, असा विश्वास अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जीएसटीसंदर्भात बोलवलेल्या विशेष अधिवेशनात उत्तर देताना सांगितले आहे.

वस्तू व सेवा करामुळे राज्याच्या करमहसुलात जशी तूट येणार आहे तशीच तूट महानगरपालिकांच्या उत्पन्नाबाबतही आहे. राज्याने एलबीटी अंशतः जरी रद्द केली असली तरी जीएसीटीमुळे इंधन, मद्यासाख्या जीएसटीतून वगळलेल्या वस्तूंशिवाय सर्व वस्तूंवरील एलबीटी रद्द होणार असल्याने महापालिकेच्या उत्पन्नाचे स्रोत आटणार आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) विधेयक, २०१७ विधिमंडळात मंजूर करून घेतले. त्यानुसार महापालिकांच्या उत्पनाला संरक्षण दिले आहे. ज्याप्रमाणे राज्यांच्या नुकसानीची भरपाई करण्याचे दायित्व केंद्र शासनाने घेतले आहे. त्याप्रमाणे जकात व स्थानिक संस्था कर नाहीसे झाल्याने स्थानिक प्राधिकरणांना शाश्वत आणि निरंतरपणे नुकसान भरपाई देण्याचे राज्य शासनाने कायदा करून निश्चित केले आहे. त्यामुळे सर्व महापालिकांना त्यांच्या हक्काचा निधी कायद्याच्या संरक्षणात मिळेल, त्यात कोणताही भेदभाव होणार नाही. कोणत्याही महानगरपालिका आयुक्तांना किंवा महापौरांना हा निधी मिळविण्यासाठी मंत्रालयात यावे लागणार नाही. स्थानिक संस्थांना त्यांचा निधी शाश्वत स्वरुपात देण्याचे बंधन या अधिनियमान्वये राज्य सरकारने स्वत:वर लावून घेतले आहे.

मुंबई महापालिकेचा १० वर्षाचा वृद्धी दर सरासरी चार टक्के आहे. स्थानिक प्राधिकरणांना नुकसान भरपाईची रक्कम देताना त्याच्या दुप्पट म्हणजे आठ टक्क्यांचा वृद्धी दर गृहीत धरण्यात आला आहे. त्यामुळे वस्तू आणि सेवा कर प्रणाली लागू झाल्यानंतर महापालिका आर्थिक अडचणीत येणार नाहीत. वस्तू आणि सेवा कर प्रणालीमुळे कोणत्याही महापालिकेची स्वायत्तता धोक्यात येणार नाही.

जीएसटीबाबत व्यापाऱ्यांच्या मनात असणाऱ्या शंका मिटवण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला. राज्यातील विविध व्यापार, उद्योग क्षेत्रातील संघटनांना सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत निमंत्रित केले होते. या बैठकीला केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली उपस्थित होते. व्यापाऱ्यांच्या मनातील अनेक प्रश्नांना श्री.जेटली यांनी उत्तर दिले.

## सर्वसामान्यांना दिलासा

वस्तू व सेवा कर परिषदेने कर ठरवतानाही सर्वसामान्यांचा सर्वात पहिला विचार केला आहे. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंवर शून्य टक्के कर लावताना आरामदायी वस्तूंवर २८ टक्के कर लावून राज्य आणि केंद्राचे उत्पन्न सुरक्षित केले आहे.

## वस्तू व सेवाकर आयुक्तालय

'जीएसटी'अंतर्गत केंद्रीय उत्पादन शुल्क, सेवाकर व सीमा शुल्क विभागाचे 'वस्तू व सेवाकर आयुक्तालयात' रूपांतर करण्यात आले आहे.

## विक्रीकर नव्हे ; वस्तू– सेवाकर विभाग

'जीएसटी' लागू करण्यासंदर्भात निर्णय घेतल्यानंतर आता विक्रीकर विभागाचे व या विभागातील कामाचे स्वरूप बदलले आहे. विक्रीकर विभाग आता 'वस्तू व सेवाकर विभाग' म्हणून ओळखला जाणार आहे. राज्यातील 'विक्रीकर भवन' या कार्यालयांचे नामांतर होऊन आता ही कार्यालये 'वस्तू व सेवाकर भवन' या नावाने ओळखली जातील.



**– प्रसाद इनामदार**

२०१६च्या मे-जून आणि जुलैमध्ये देखील एक थेंबभर पाणी नसलेल्या व नदीपात्रात कसलीही हिरवळ नसलेल्या मृतप्राय मांजरा नदीच्या नागझरी बॅरेजमध्ये लातूरच्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने पूर प्रतिसाद आणि शोध व बचावाची रंगीत तालीम घेतली. ज्यामध्ये त्यांनी या बॅरेजमध्ये चक्क बोट चालवली. हे केवळ मांजरा नदीच्या पुनर्जीवीकरणमुळेच घडून आले.


जून २०१६



# मांजरा : तेव्हा आणि आता

लातूर जिल्ह्यात २०१४-१५ या वर्षी अतिशय कमी पर्जन्यमान झाल्यामुळे गतवर्षी म्हणजेच २०१६ या वर्षी अभूतपूर्व / न भूतो न भविष्यती असा दुष्काळ निर्माण झाला होता. ज्यामुळे भीषण पाणी टंचाई निर्माण झाली याची जास्तीची झळ ग्रामीण भागापेक्षा लातूर शहरास बसली. या टंचाईची प्रचीती यावरूनच लक्षात येते की, लातूर शहरास मिरज (जिल्हा सांगलीहून) गतवर्षी पहिल्यांदाच रेल्वे वॅगनद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता. तत्कालीन जिल्हाधिकारी पांडुरंग पोले यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या उपाययोजना करण्यात आल्या. भविष्यात असे भीषण संकट उद्‌भवू नये म्हणून वेळीच नावीन्यपूर्ण दृष्टीकोन ठेऊन योग्य उपाययोजना करण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रमाण पांडुरंग पोले यांच्या कार्यशैलीतून दिसून आले.

बदलते हवामान आणि ऋतुचक्र यातून निर्माण होत असलेली जलजन्य दुष्काळ याची आता सवय करून घेऊन त्याप्रमाणे नियोजन आखणे आवश्यक आहे. गतवर्षामध्ये नागझरी बॅरेज कोरडे होते. परंतु यंदा २०१७ च्या मे-जून महिन्यात देखील २.५ मी. इतके पाणी पातळी नागझरी बॅरेज येथे उपलब्ध आहे.

## जलयुक्त लातूर

दुष्काळ आणि पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी वेगवेगळया उपाययोजनांपैकी कायमस्वरूपी उपाययोजनामध्ये नाला-नदी पुनरुज्जीवनचा समावेश होतो. त्यासाठी सामान्यत: पूर्ण नदीपात्र किमान १० ते १५ कि. मी. रुंद व खोल करून साठवण क्षमता वाढविली जाते. लातूर जिल्ह्यातील रेणा, बामणी, तेरणा इत्यादी नद्याप्रमाणेच लातूर शहराची पाण्याची गरज भागवणाऱ्या मांजरा नदीचे रुंदीकरण करण्यासाठी लातूर शहरातील सुजाण नागरिकांनी जलयुक्त समिती स्थापन करून साई बॅरेज येथे प्रत्यक्ष कामाची सुरुवात केली.

## मुख्यमंत्री सहायता निधीतून खोलीकरण आणि रुंदीकरण

जलयुक्त लातूरच्या संकल्पनेपूर्वीच शासनास साई बॅरेज ते नागझरी बॅरेज ५ कि.मी. खोलीकरण व रुंदीकरणाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. जलयुक्त लातूर समितीचे काम साई बॅरेजपासून नागझरी बॅरेजकडील दिशेने होत होते.

लातूरमधील दुष्काळ निवारण कामासाठी सहकार विभागाने ५० लाख रुपये मुख्यमंत्री सहायता निधी उपलब्ध करून देण्यात आले. या निधीतून खोल CCT, गाळ काढणे या सोबतच नदी-नाला रुंदीकरण ही कामे करण्यात आली. मांजरा नदीच्या ५ कि.मी. अंतराच्या कामासाठी ५९५ लाख रुपयांपैकी मुख्यमंत्री सहायता निधीतून अधिकचे ३ कोटी रुपये उपलब्ध करून कामाचे संचलन, संनियंत्रण करण्यात आले. हे काम वेगळ्या जागेत करण्यात येणे अपेक्षित होते. नागझरी बंधाऱ्यांचे वरचे टोक - कारसा पोहरेगावकडून टाकळीच्या दिशेने करण्याचे निश्चित झाले. ज्यामुळे नागझारी बंधाऱ्यांची साठवण क्षमता वाढली व लातूर शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या पूरक स्रोताची साठवण क्षमतेमध्ये वाढ झाली.




## लोकसहभाग

सार्वजनिक कामात लोकसहभागास अतिशय महत्त्व आहे. कारण यामुळेच खऱ्या अर्थाने लोकचळवळ निर्माण होते. ही लोकचळवळ जनसमृद्धीसाठी पोषक मानली जाते. जलयुक्त लातूर ही एक लोकचळवळ निर्माण होऊन जिल्ह्यातील सर्वच स्तरावरील घटकांना यात योगदान मिळाले. ज्यामध्ये लोकप्रतिनिधी, प्रशासकीय यंत्रणा, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, सेवाभावी संस्था, उद्योजक, नागरिक, विद्यार्थी आणि सर्व जाती-जमातीचे लोकांचा समावेश होता. लोकसहभागाच्या माध्यमातून या कामासाठी जवळपास ८ कोटी ३० लक्ष इतका निधी संकलित झाला. या कामास जिल्हा प्रशासन, जलसंपदा विभाग, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचेमार्फत तांत्रिक सहाय्य करण्यात आले.

## नदीचे सविस्तर व अचूक सर्वेक्षण

कारसा पोहरेगाव ते टाकळी पुल यादरम्यानचे मांजरा नदीचे सविस्तर व अचूक सर्वेक्षण इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन मशीन वापरून करण्यात आले. नदीपात्राच्या प्रती ३० मी. अंतरावर पातळी घेऊन कामाची निश्चिती करण्यात आली.

२०१६चा पावसाळा जवळ आल्यामुळे कामाच्या गतीनुसार मान्यता देण्यात आली. खाजगी मशिनने काम सुरू करण्यापूर्वी यांत्रिकी विभागाच्या मशिनने प्रथमत: काम सुरू करण्यात आले. कारसा पोहरेगाव बॅरेजच्या खालचा पहिला सुमारे ७०० मीटरचा भाग यांत्रिकी विभागाच्या मशिनरीने व उर्वरित सुमारे २२०० मीटरचा भाग खासगी मशिनरीने करण्यात आला.



## त्रयस्थ संस्थेकडून तपासणी

पुरणमल लाहोटी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर या त्रयस्थ संस्थेमार्फत कामाचे परिमाण व गुणवत्ता तपासून प्रमाणित करण्यात आले आहे. काम सुरू होण्यापूर्वी, काम सुरू असताना व काम झाल्यानंतरचे अशा तीनही टप्प्यांमधील जी.पी.एस. टॅग केलेली छायाचित्रे घेण्यात आले आहेत. शासकीय नियमानूसार कामाच्या ठिकाणी माहितीस्तव कामाचे फलक लावण्यात आलेले आहेत.

## प्रकल्पाची फलनिष्पत्ती

मांजरा नदीच्या पुनर्जीवीकरण कामाच्या माध्यमातून या नदी पात्रातील (साई ते नागझरी व नागझरी वरच्या टोकापासून कारसा पोहरेगावकडून टाकळीच्या दिशेने) असे एकूण २,०४,७६६ घ.मी. गाळ काढण्यात आला. हा गाळ परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतासाठी देण्यात आला. यामुळे शेजारच्या एकूण २० गावातील शेतकऱ्यांची जमीन सुपीक झाली. या कामामुळे शिवारातील एकूण ५०० हे. जमीन क्षेत्र सिंचनाखाली आला. ज्याचा फायदा २० गावातील शेतकऱ्यांना झाला. नदी पात्रात सुमारे २०४ टी.सी.एम. एव्हढा जास्तीचा पाणीसाठा झाला आहे. ज्यामुळे लातूर शहरास पाणीपुरवठा योजनेच्या पूरक स्रोतामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. सततचे अवर्षण आणि त्यामुळे निर्माण होणारा भीषण दुष्काळाचा सामना करण्यासाठी संरचनात्मक उपाय शासकीय व लोकसहभागाच्या माध्यमातून योजण्यात आले. मागील दोन वर्षात पर्याप्त पाणी नसलेल्या मात्र चालू वर्षी नदीपात्रात उपलब्ध असलेल्या २.५ मी. पाणी उपलब्ध आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन लातूरच्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने पूर प्रतिसाद आणि शोध व बचावाची रंगीत तालीम घेतली. ज्या नदीने दुष्काळ पाहिला त्या नदीअंतर्गत येणाऱ्या नागझरी बॅरेजमध्ये चक्क बोट चालवली. हे आश्चर्य घडले ते मांजरा नदीच्या पुनर्जीवनामुळे याची प्रचिती लातूरकरांना आली.

## मान्यवरांच्या भेटी

काम चालू असताना कामास वेगवेगळ्या मान्यवरांनी भेटी देऊन कामाची पाहणी केली. लोकप्रतिनिधी, आमदार, प्रशासकीय अधिकारी, त्रयस्थ संस्थेचे अभियंता इत्यादींनी कामाची पाहणी केली आहे. मुख्य अभियंता, जलसंपदा यांनी क्षेत्रीय दौऱ्याच्या मांजरा नदी भेटीदरम्यान शासकीय निधीतून चालू असलेल्या कामाबाबत आवश्यक ते निर्देश दिले. तसेच कामाच्या दर्जाबाबत समाधान व्यक्त केले.

**- साकेब अ. हकीम उस्मानी**
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, लातूर



# जलदेवता प्रसन्न

**पाणी टंचाईचा सातत्याने सामना करताना आपले गाव पाण्यासाठी स्वयंपूर्ण व्हावे यासाठी 'सत्यमेव जयते' कार्यक्रमांतर्गत वॉटरकप स्पर्धेमध्ये सहभागी होऊन संपूर्ण गाव जलयुक्त करण्याचा अभिनव उपक्रम वर्धा जिल्ह्यातील अतिदुर्गम अशा संपूर्ण आदिवासीबहूल काकरदरा या गावाने यशस्वीपणे राबवला आहे. यासोबतच आर्वी तालुक्यातील २२ गावांनीही वॉटरकप स्पर्धेत सहभागी होऊन पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. जलदेवतेचे गाव म्हणून काकरदरा हे गाव संपूर्ण राज्यात ओळखले जात आहे.**



सुमित वानखेडे

'सत्यमेव जयते' या कार्यक्रमांतर्गत वॉटरकप स्पर्धा जाहीर झाल्यानंतर नागपूर विभागात केवळ आर्वी तालुक्याने पुढाकार घेवून काकरदरासह २२ गावांनी स्पर्धेत सहभागी होण्याचा निर्धार केला होता. यासाठी आर्वीचे सुमित वानखेडे तसेच त्यांच्या युवा सहकाऱ्यांनी केलेल्या दीड महिन्याच्या अथक प्रयत्नानंतर २२ गावात जलसंधारणाची विविध कामे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. यासाठी गावातील सरपंच व ग्रामस्थांचा सहभाग मिळाल्यामुळे लोकसहभागातून करावयाच्या विविध कामांना चांगला प्रतिसाद मिळाला. या संपूर्ण उपक्रमाची प्रेरणा ठरली ते गाव म्हणजे काकरदरा.

गावात पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब अडवून ग्रामस्थांनी श्रमदानाने उभ्या केलेल्या जलसंधारणाच्या उपचारामुळे पहिल्याच पावसात हे गाव पाणीदार ठरले आहे. ग्रामदेवता म्हणून जलदेवतेची प्रतिस्थापना ही या गावाचे वैशिष्ट्य ठरले आहे. वॉटरकप स्पर्धेच्या अंतिम निवडीमध्ये आपले गाव निश्चित आघाडीवर राहील हा आत्मविश्वास येथील ग्रामस्थांना आहे.

काकरदरा या गावच्या जलसंधारणाच्या विविध उपक्रमामुळे या गावात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा निर्माण

होणार आहे. यामध्ये सलग समतलचर (सीसीटी) बांधकामामुळे ७५.८४ घनमीटर, कंटुर बांधकामामुळे २ हजार ९३८.६४ घनमीटर तसेच अनघड दगडी बांधामुळे ९१९.०६ घनमीटर कामामुळे मोठ्या प्रमाणात जलसाठा निर्माण होणार आहे. ही संपूर्ण कामे ग्रामस्थांनी श्रमदानाने पूर्ण केली आहेत. श्रमदानाबरोबरच लोकसभागातून मशीनद्वारे खोल, समतल, पातळीचर, शेतीबांध बंदिस्ती, कम्पार्मेंट बंडींग, कंटुर बांध, शेततळे, लहान माती बंधारा, माती नाला बांध, नाला खोलीकरण व रुंदीकरणाची सरासरी ५६ हजार ६६५.८९ घनमीटरची कामे पूर्ण झाली आहेत.



जलयुक्त शिवारासोबतच गाव स्वच्छ व पर्यावरणयुक्त राहावे यासाठी प्रत्येक घरातून वाहणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ७० शोष खड्डे खोदण्यात आली. तसेच विहीर पुनर्भरण व रचनांच्या दुरुस्तीची तीन कामे पूर्ण करतानाच गावात वृक्षारोपण करण्यासाठी चारशे खड्डे खोदून तेथे वृक्षारोपणही करण्यात आले. या काकरदरासोबतच पिंपळगाव (भोसले), नेरी (मिर्झापूर), बोथली (नटाळा) या गावानेही काकरदराचा आदर्श पुढे नेऊन नाला खोलीकरण, रुंदीकरण, शेततळे, कम्पार्मेंट बंडींग, लहान माती बंधारा, दगडी बांध अशी प्रत्येक गावात सरासरी ६० हजार ते ६५ हजार घनमीटरची कामे पूर्ण केली आहे.

### ६२ हजार ५९९ घ.मी. जलसाठा

पिण्याच्या पाण्यासाठी स्वयंपूर्णतेकडे जाताना आदिवासीबहुल असलेल्या काकरदरा या गावाने लोकसहभागातून तसेच स्व: परिश्रमातून गावात ६२ हजार ५९९.०७ घनमीटर जलसाठा निर्माण होईल ऐवढी कामे केली आहेत. या कामाची दखल सत्यमेव जयतेच्या वॉटरकपच्या चमूने घेतली आहे. या गावासोबतच पिंपळगाव (भोसले) येथे ५६ हजार ५८४.९२ घनमीटर, नेरी (मिर्झापूर) एकूण ७० हजार ९६४.१६ घनमीटर तर बोथली (नटाळा) या गावातही राबवलेल्या विविध उपचारांमुळे ७५ हजार ६२१.९८ घनमीटर जलसाठा निर्माण होणार आहे. पहिल्याच पावसात या गावांमध्ये राबवलेल्या विविध उपक्रमात जलसाठा निर्माण झाल्यामुळे गावकरी आनंदीत झाले आहेत.

या गावाचा आदर्श घेत तालुक्यातील सावंगी (पोड), पिंपळखुटा, माडेगाव (टेका), बोथली (किन्हाळगाव), सावद, विरुळ, रसुलाबाद, दिघी, रोहणा, बेढोणा, बेल्लारा, वाढोणा, दहेगाव (मुस्तफा), तळेगाव (रघुजी), पानवाडी, बोरगाव (हातला), उमरी (सुकडी) या गावातही जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात पूर्ण झाली आहेत. विशेष म्हणजे वॉटरकप स्पर्धेच्या निमित्ताने 'जल है तो कल है' हा एकच ध्यास घेवून पाण्यासाठी पुढच्या पिढीला त्रास होऊ नये यासाठी जलयुक्त शिवारसाठी हजारो हात एकत्र आले आहेत.

**– अनिल गडेकर**
जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

## माझे पाणी, माझी समृद्धी



**पुष्पा दिलीपराव खुबाळकर**

पारंपरिक पद्धतीची शेती न करता त्यासोबत दैनंदिन आवश्यक असलेला भाजीपाला व फळ उत्पादनाची जोड देऊन शेतीचे अर्थकारण बदलवू शकते हा आत्मविश्वास खुबाळ गावच्या श्रीमती पुष्पाताई दिलीप खुबाळकर यांनी गावातील सर्व शेतकरी बांधवांमध्ये निर्माण केला आहे. खुबाळा हे गाव भाजीपाला व फळ उत्पादनाचे नागपूर जिल्ह्यातील प्रमुख केंद्र म्हणून विकसित होत आहे. नागपूरसह संपूर्ण जिल्ह्यात दररोज सकाळी भाजीपाला पाठवण्याची सुविधा या गावात निर्माण झाली आहे.

शेती परवडत नाही म्हणून इतर व्यवसाय करण्याचा पुष्पाताईंचा विचार असतांनाच सहा एकर शेतीपैकी ठिंबक सिंचन अनुदान योजनेंतर्गत कृषी विभागाने एक एकरासाठी अनुदान दिल्यामुळे पहिल्याच वर्षी मिरचीसोबत आंतरपीक म्हणून अद्रक घेतले असता एका एकरात सुमारे तीन लाख रुपयाचे मिरचीचे उत्पादन झाले. त्यासोबत चाळीस क्विंटल अद्रकचे उत्पादन घेतले. अद्रकाला शंभर ते एकशे पंचवीस रुपये किलो भाव मिळाल्यामुळे संपूर्ण रकमेतून चार एकरासाठी ठिंबक सिंचनाची व्यवस्था केली. विहिरीला पूर्वी पाणी अपुरे पडत होते, परंतु ठिंबक सिंचनामुळे संपूर्ण शेती आवश्यकतेनुसार ओलिताखाली आणणे सहज शक्य झाले. बारमाही पीक पद्धती अधिक फायदेशीर ठरू शकते असे तालुका कृषी अधिकारी व कृषी सहायकांनी प्रत्यक्ष शेतीवर येऊन प्रात्यक्षक करून दाखवल्यामुळे दोन एकरामध्ये पोपट, चवळी, वाल, भेंडी, टमाटर, काकडी आदी पिके घ्यायला सुरुवात केली. यावर्षी मिरचीपासून एक लक्ष पंचवीस हजार रुपयांचा नफा झाला. त्यासोबत संत्रा, मोसंबी, आदी फळ पिकेसुद्धा घ्यायला सुरुवात केली. किफायतशीर शेतीचे तंत्रज्ञान केवळ आपल्याच शेतात न राहता सर्वांनीच ठिंबक सिंचनाचा वापर करावा यासाठी पुष्पाताईंनी संपूर्ण गावभर प्रचार केला. त्यांनी केलेल्या या उपक्रमाची दखल घेऊन शासनाने त्यांना उद्यानपंडित पुरस्कार देऊन गौरवले आहे.



# स्मार्ट ‘किकवारी’

**बागलाण तालुक्यात बहुसंख्येने आदिवासी असणाऱ्या भागातील किकवारी (खुर्द) गावातील ग्रामस्थांनी सातत्यपूर्ण प्रयत्नांनी गाव कचराकुंडीमुक्त आणि हिरवेगार केले आहे. निसर्गाशी खऱ्या अर्थाने नाते जोडलेल्या ‘स्मार्ट ग्राम’ योजनेंतर्गत पारितोषिक मिळवले आहे.**

सटाणापासून २० किलोमीटर अंतरावर असलेल्या तेराशे लोकसंख्येच्या किकवारी गावात हजारो झाडे लावण्यात आली आहेत. गावात प्रवेश करताच वनराईतील भटकंती करीत असल्याचा अनुभव मिळतो. अनेक पक्ष्यांचे आवाज आपले स्वागत करतात. पारंपरिक वाड्यांचे सौंदर्य पाहावयास मिळते. वैयक्तिक घर असो वा सार्वजनिक इमारत, प्रत्येक ठिकाणी किमान एकतरी झाड लावलेले दिसते.

लोकसंख्येच्या कितीतरी पट झाडे गावाने जगवली आहेत. त्यात सीताफळ, डाळिंब, आंबा, आवळा, चिंच, साग, लिंब, नारळ आदी विविध झाडांचा समावेश आहे. आतापर्यंत १२५ हेक्टर पडीक जमिनीचे बागायत रुपांतर झाले आहे. गावात कुऱ्हाड आणि वनचराईबंदी अंमलात आणली आहे. झाडांना पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन आणि टँकरचा उपयोग करण्यात येतो. गावाने ‘निर्मल ग्राम योजनेत’ यशस्वीपणे सहभाग नोंदवला. इथल्या प्रत्येक घरात शौचालय उभारण्यात आले आहे. गावात उकिरडा किंवा कचराकुंडी शोधून दिसणार नाही. गावातील रस्ते अगदी स्वच्छ दिसतात. प्रत्येक घरातून निघालेला आणि गावात तयार करण्यात आलेला कचरा नॅडेप पद्धतीच्या कचरा डेपोत टाकण्यात येतो. डेपो भरल्यावर ट्रॅक्टरद्वारे गावाबाहेर तयार करण्यात आलेल्या खतनिर्मिती डेपोत टाकण्यात येतो. पावसाळ्यात त्यात पाणी मुरून त्याचे खतात रूपांतर होते. हे खत शेती आणि झाडांसाठी उपलब्ध करून दिले जाते.

गावात स्मशान परिसरात फुलझाडे व इतर वृक्षांची लागवड करून जागेचे पावित्र्य जपण्याचा चांगला प्रयत्न करण्यात आला आहे. ग्रामस्थांना केवळ हजार-दोनहजार रुपयात लग्नासाठी हिरवागार परिसर असलेला हॉल आणि भोजनगृह उपलब्ध करून देण्यात येते. प्लास्टिक निर्मूलन,

बायोगॅसचा वापर, घरासमोरील परसबागा, गुटखा विक्री बंदी, दारुबंदी अशा उपक्रमाद्वारे गावाने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. गावात आदिवासी बांधवांना शेळ्यापालनासाठी स्वतंत्र व्यवस्था करून देण्यात आली आहे. शेळ्या घराजवळ बांधल्या जात नसल्याने आरोग्याच्या समस्या कमी झाल्या आहेत. अल्पभूधारकांना ग्रामपंचायतीकडील जमीन कराराने शेतीसाठी दिली जाते. त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होण्याबरोबर ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात भर पडली आहे. शाळेचा परिसरही हिरवागार आहे. अशा परिसराद्वारे जणू विद्यार्थ्यांवर निसर्ग संवर्धनाचे संस्कार केले जातात. निसर्गाच्या सान्निध्यात ई-लर्निंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत.

गावाने भूमिगत बंधारे, माती नालाबांध, बंधारा दुरुस्ती, वनराई बंधारे, वनतळी आदींच्या माध्यमातून जलसंधारणाचे अनेक उपक्रम राबवले आहे. गावात पाणी शुद्धीकरणासाठी उपसरपंच केदाबापू काकुळते यांच्या मार्गदर्शनाखाली स्वत:ची यंत्रणा उभी केल्याने श्रम आणि खर्चात बचत झाली आहे. इस्राईल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रत्येक घरात समान पाणीपुरवठा करण्यात येतो. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यास ग्रामस्थ उत्सुक असतात.

कल्पकता, जाणिवा आणि परिश्रमाच्या बळावर गावात परिवर्तन घडवता येते हे किकवारी खुर्दच्या ग्रामस्थांनी दाखवून दिले आहे. एखाद्या पर्यटनस्थळाला लाजवेल अशा निसर्गरम्य परिसरात नव्या युगातील जाणिवा घेऊन, इथले नागरिक आपले गाव अधिक 'स्मार्ट' करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**– डॉ. किरण मोघे**
जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक

## डोंगरावर 'शालू'



वन विभागाची नोकरी सोडलेल्या मोतीराम गावीत यांनी गावात आलेल्या साधूंचा उपदेश प्रमाण मानून डोंगरावर झाडे लावण्यास सुरुवात केली. वयाची पंच्च्याहत्तरी पार केलेल्या गावीत यांनी सरपंच असताना केमचा डोंगरावर वृक्षारोपण करण्याचा ठराव केला. याच डोंगरावरून गिरणा, कादवा, उनंद या पूर्ववाहिनी आणि नार-पार, आमटी, वाझडी या पश्चिमवाहिनी नद्यांचा उगम झाला आहे. अवघी २२०० लोकसंख्या असलेल्या गावाने डोंगरावर १० हजार झाडे लावली.

आपला परिसर सुंदर आणि पर्यटनासाठी आदर्श करण्याचा ध्यास ग्रामस्थांनी घेतला आणि वृक्ष संवर्धनाचे कार्य सुरू झाले. गतवर्षी गावाने तब्बल २५ हजार झाडे लावली. रोजगार हमी योजनेतून खड्डे खोदण्याचे काम करण्यात आले.

एका बाजूला समुद्र सपाटीपासून १९०० फूट असलेल्या केम शिखराचे सौंदर्य आणि दुसऱ्या बाजूस चमचा आणि रोकोडा डोंगरामुळे तयार झालेली 'यू' आकाराची रचना आणि मधोमध दरीतील अप्रतिम दृश्य असा हा भाग असल्याने पर्यटन विकासाला येथे संधी आहे.

डोंगरावर लावलेल्या रोपांपैकी ९० टक्के रोपे जगली आहेत. काही रोपे तीन ते दहा फुटापर्यंत वाढली असल्याने परिसराच्या सौंदर्यात भर पडली आहे. केमचा डोंगराच्या १७० हेक्टर क्षेत्रात वृक्षारोपण झाल्यानंतर आता रोकोडाच्या ७० हेक्टर क्षेत्रात वृक्षारोपण सुरू आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीने ४५ हजार रुपये खर्च करून गुजरातमधून आंबा, जांभूळ, आवळा, पेरू, गुलमोहोर, मोगरा, काजू, सिसव, काशिद, आदी रोपे आणली आहेत. झाडे जगवण्यासाठी डोंगरावर पाईपलाईन नेण्यात आली असून यावर्षी तळे तयार करून ठिबक सिंचनाचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे. डोंगरावर सुविधेसाठी पेसांतर्गत रस्ते तयार करण्यात आले आहेत. वृक्षारोपणासाठी पेसामधून २ लाख ७८ हजार खर्च करण्यात आला आहे. यावर्षी डोंगरावरच नर्सरी तयार करण्यात येणार आहे.

डोंगरावर अर्जून साताडा, निरगुडी आदी वनौषधींची रोपेदेखील लावण्यात आली आहेत. पडीक जमिनीचा योग्य वापर करण्याबरोबर पर्यावरण रक्षण, पर्यटन आणि रोजगार निर्मितीचा दूरगामी विचार करून या आदिवासी गावाने केम शिखराचा परिसर नयनरम्य करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या वर्षी गाव हागणदारीमुक्त करण्याचा संकल्पदेखील केला आहे. एक लघु पाटबंधारे प्रकल्प आणि २३ पाझर तलावाच्या ठिकाणी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' उपक्रम राबवण्यात आला आहे. ग्रामस्थांचे प्रयत्न आणि या भागात होणारी स्ट्रॉबेरीची शेती लक्षात घेता काही वर्षात हा भाग पर्यटकांना निश्चितपणे आकर्षित करेल.





# आता लक्ष्य १३ कोटींचे....

**राज्यातील भौगोलिक क्षेत्राचा विचार करता सध्या महाराष्ट्राचे जवळपास २० टक्के क्षेत्र हिरवेगार आहे. हे प्रमाण ३३ टक्क्यांपर्यंत असणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ सद्य:स्थितीतील वनाच्छादनाचा विचार न करता पृथ्वीवरील भौगोलिक क्षेत्राचे वनाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत वाढवणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने ५० कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम तीन वर्षात राबवण्याचे ठरवले आहे. या वर्षी ४ कोटी वृक्षारोपणाचा निर्धार पूर्ण केला आहे. यामुळे राज्याचे वनाच्छादित क्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यास मदत होणार आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वित्त, नियोजन व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात राज्याला पूर्णत: हिरवेगार करण्याचे महावृक्षलागवडीचे अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १ जूलै, २०१६ रोजी एकाच दिवशी २.८६ कोटी रोपे लावण्यात आली होती. या वर्षी १ ते ७ जुलै २०१७ या सात दिवसात ५.४३ कोटी रोपे लावण्यात आली. त्याचप्रमाणे पुढील वर्षी म्हणजेच २०१८ मध्ये १ ते १५ जुलै या कालावधीमध्ये १३ कोटी रोपांची लागवड करण्यात येणार आहे. २०१९ या वर्षी ३३ कोटी रोपांची लागवड करण्यात येणार आहे.

या अभियानामध्ये महाराष्ट्र वन विभागाची मुख्य भूमिका असून इतर शासकीय विभाग, स्थानिक संस्था, नागरी संस्था, शैक्षणिक संस्था, खासगी संस्था, खासगी कंपन्या, सामान्य नागरिकांचे सहकार्य लाभत आहे. लावलेली रोपे जगण्याची जबाबदारीदेखील वन विभागाने स्वीकारली आहे.

### वृक्षलागवडीचा आदर्श नमुना

लावण्यात येणाऱ्या रोपांच्या संरक्षण व देखभालीची जबाबदारी संबंधीत मजुरांपासून ते त्यांच्यावरील संबंधित अधिकारी यांची आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोहगार हमी योजनेंतर्गत सरळ रेषेतील वृक्षलागवड व विखुरलेली वृक्षलागवड करण्यात येते. त्यानंतर लगेच २०० रोपांचा एक घटक निश्चित केला जातो. तो एका मजूराकडे सुपुर्द करण्यात येतो. या २०० रोपांचे संरक्षण व देखभाल करणे ही त्या मजुराची जबाबदारी असते. प्रत्येक घटकामध्ये २०० लीटर पाण्याचे २ ड्रम ठेवले जातात. प्रत्येक रोपांच्या जवळ एक लीटर मिनरल वॉटरची वापरलेली बॉटल बसवून तिला खालच्या बाजुस छिद्र केले जाते. त्यामध्ये एक सुतळी किंवा जुने सुती कापड लावून त्या बॉटलला रोपट्यापासून थोड्या दूर अंतरावर जमिनीमध्ये पुरले जाते. अशा प्रकारे ठिबक पद्धतीद्वारे रोपट्यास पाणी देण्यासाठी प्रत्येक तिसऱ्या दिवशी एक लीटर पाणी या बाटलीत भरले जाते. वृक्षलागवडीच्या या नमुन्यामध्ये टँकर किंवा बैलगाडीद्वारे घटकामध्ये ठेवण्यात आलेले २०० लीटरचे ड्रम पाण्याने भरले जातात.

### मजुरीपूर्वी देखभालीची खात्री

रोपांना पाणी देण्याचे काम हे ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होते. ते मेपर्यंत चालते. रोपांना पाणी देण्यासोबतच वेळोवेळी रोपांना खत देण्याची तरतूदसुद्धा वृक्षलागवडीच्या या नमुन्यात करण्यात आली आहे. वृक्षलागवडीचा हा नमुना सद्य:स्थितीत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राबवण्यात येत आहे. तथापि १०० दिवस झाल्यानंतर मजुरांना बदलण्यात येते. ग्रामसभेच्या माध्यमातून मजुरांच्या कुटुंबांची निवड केली जाते. २०० घटकाकरिता चार कुटुंबे निश्चित

केली जातात. त्या कुटुंबांना १०० दिवस कामावर ठेवण्यात येते. जर काही मजूर १०० दिवसांपेक्षा जास्त काम करण्यास इच्छुक असल्यास त्यांची मजुरीची रक्कम ग्रामीण रोजगार योजनेमधून अदा केली जाते. मजुरीची रक्कम अदा करतेवेळी २०० रोपांचे काही नुकसान तर झाले नाही ना याची खात्री केली जाते.

### यशस्वी वाटचाल

ग्रामीण भागातील ग्रामस्थांच्या जबाबदारीसोबतच ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध करण्यामध्ये वृक्षलागवडीची ही पद्धत अतिशय यशस्वी झाली आहे. या योजनेनुसार समाजातील दुर्बल घटक जसे विधवा महिला, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक यांनासुद्धा रोजगार उपलब्ध होत आहे. वृक्षलागवडीच्या या पद्धतीमुळे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेच्या सर्व उद्देशांची पूर्तता होत आहे. या योजनेनुसार जिवंत रोपांची टक्केवारी ७५ टक्क्यांपेक्षा कमी असल्यास मजुरीची रक्कम अर्धी अदा केली जाते व ६० टक्क्यांपेक्षा टक्केवारी कमी असल्यास मजुरीची कोणतीही रक्कम अदा केल्या जात नाही.

वन विभागाने याच पद्धतीने गट रोपवनासाठी १००० रोपांचे घटक हा नमुना तयार केला आहे. या नमुन्यास महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. वृक्षलागवडीच्या या पद्धतीस 'सहभाग रोपवन नमुना' म्हणूनसुद्धा संबोधता येईल. या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना रोजगार उपलब्ध होतो व जनजागृती मोठ्या प्रमाणावर होते.

राज्य हिरवेगार करण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींमध्ये रोपवने लावण्यात येतील. माहिती तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून लावण्यात येणाऱ्या प्रत्येक रोपाचे संनियंत्रण करण्यासाठी वन विभागाद्वारे कसोशीने प्रयत्न होत आहे. महाराष्ट्राला हिरवेगार करण्याच्या या अभियानात, सर्व नागरिकांना या कामामध्ये सामावून घेण्याचा वन विभागाचा प्रयत्न आहे. अशा नागरिकांना या कार्यक्रमात 'ग्रीन आर्मी' म्हणून संबोधले जाते. वनविभागाद्वारे कॉल सेंटरची निर्मिती करण्यात आली असून त्याद्वारे सर्वसाधारण नागरिकांना माहिती दिली जाते.

**– डॉ. दिलीप सिंह**
भा.व.से, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर

## 'मिस कॉल'वर मोफत घरपोच वृक्ष

प्रचंड लोकसहभागामुळे राज्य शासनाच्या ४ कोटी वृक्षलागवडीचा निर्धार पूर्ण झाला. याला साथ मिळाली ती विविध उपक्रमांची. पनवेलमध्ये राबवण्यात आलेला उपक्रमही तेवढाच नावीन्यपूर्ण ठरला. आ. प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने मिस कॉल सेवा सुरू करण्यात आली होती. ९९२०७६५७६५ या क्रमांकावर मिस कॉल दिल्यानंतर मिस कॉल करणाऱ्यांना पत्ता विचारला जात होता. अल्पावधीतच वृक्षारोपणासाठी घरपोच झाड उपलब्ध होत होते. एकूण ५३२८ जणांनी या मिस कॉल सेवेचा लाभ घेत मोफत झाड मिळवले व वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला. त्यासोबतच स्थानिक पातळीवर घेतलेल्या सेल्फी स्पर्धेलादेखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## इको टास्क फोर्स

'वृक्षवल्ली आम्हा सोयरेवनचरे', असे संत तुकारामांनी आपल्याला वृक्षाचे महत्त्व सांगितले आहे. मराठवाड्यातील वनक्षेत्राचा विचार केला तर ते अवघे ४.८२ टक्के. त्यामुळे मराठवाड्यातही जोमाने वृक्षलागवड मोहीम राबवण्यात आली. यामध्ये सर्वजण उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. यंदाचे ठरवलेले वृक्षलागवडीचे उद्दिष्ट एक दिवस अगोदरच पूर्ण झाले. हरित महाराष्ट्रासाठी आता १४८ जवान असलेल्या इको टास्क फोर्स बटालियनची स्थापना करण्यात



इको टास्क फोर्स बटालियनसोबत वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

आली आहे. या बटालियनच्या माध्यमातून औरंगाबाद वन विभागातील 'अब्दी मंडी'च्या ६० हेक्टरवर तर मिटमिटा, जटवाडा, जोगवाडा, माळीवाडा, मावसाळा, रसुलपुरा, शंकरपूरवाडी, खिर्डीतील अशा एकूण १६५५.९५ हेक्टर वनक्षेत्रावर वनीकरण होणार आहे. येथे कडुनिंब, सिसू, करंज, वड, पिंपळ, आवळा, बेहडा, अर्जुन, जांभूळ, चिंच, बांबू, खैर, वनौषधी प्रजातींची लागवड करण्यात येणार आहे. या झाडांचे संगोपन करण्यासाठी बटालियन सज्ज आहे. या प्रयोगामुळे मराठवाडा हिरवागार होण्यास मदत होईल.

मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी वृक्षारोपण, संवर्धन महत्त्वाचे आहे. अतिशय अवघड अशा ठिकाणी देशामध्ये उत्तराखंड, जम्मू काश्मिर, दिल्ली, राजस्थान, आसाम व हिमाचल प्रदेश याठिकाणी भारतीय जवानांच्या मदतीने वृक्षारोपण, वनसंवर्धन करण्यात येते आहे. अगदी त्याच प्रकारे राज्यात पहिल्यांदाच मराठवाड्यातही इको टास्क फोर्स बटालियनच्या मदतीने वृक्षसंवर्धन, लागवड निवृत्त भारतीय जवान करणार आहेत. टप्प्याटप्प्याने आणि अनुभवांनी निवृत्त माजी सैनिकांच्या 'इको- टास्क फोर्स बटालियन' ची संख्या वाढवण्यासाठी शासनाने निर्धार केलेला आहे.

**– श्याम टरके**
माहिती साहाय्यक, माहिती केंद्र, औरंगाबाद



# आपला भारत, आपली अस्मिता

**सुमारे दीडशे वर्षांहून अधिक काळ भारतावर राज्य करणारे इंग्रज १५ ऑगस्ट १९४७ला भारत सोडून गेले आणि एका नव्या स्वतंत्र राष्ट्राचा जन्म झाला. हजारो वर्षांची परंपरा असलेला देश गुलामगिरीच्या विळख्यात पिळून गेला होता. पायाभूत सुविधांबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, वैज्ञानिक प्रगतीचे मोठे आव्हान देशासमोर होते. परंतु ज्या उमेदीने स्वातंत्र्यलढ्यात भारतीयांनी झोकून दिले होते त्याच उमेदीने आणि निष्ठेने भारतीयांनी नवराष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान दिले. त्याच्याच परिणामस्वरूप गरिबी, निरक्षरतासारख्या असंख्य समस्यांना तोंड देत भारतीय समाज जगभरात एक सृजनशील, बुद्धिमान आणि कष्टाळू म्हणून ओळखला जाऊ लागला. १५ ऑगस्ट २०१७ रोजी भारतीय स्वातंत्र्याला ७० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त भारताने साध्य केलेल्या काही महत्त्वपूर्ण बाबींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे.**

भारतीय शास्त्रज्ञांनी आपल्या ज्ञानाची मोहर जागतिक पातळीवर उमटवली आहेच पण आपल्या साहित्यिकांनी, अर्थशास्त्रज्ञांनी, खेळाडूंनीही आपली वेगळी ओळख करून दिली आहे. एक अविकसित देश ते विकसनशील आणि आता विकासाच्या कळसाकडे वेगाने धावणारा देश अशी बदललेली भारताची ओळख याचाच प्रत्यय देत आहे. अणुस्फोटानंतर जगाने लादलेल्या बंधनातून मार्ग काढणारा आणि सुपर कॉम्प्युटरचे तंत्र नाकारल्यानंतर तो जिद्दीने भारतात बनवणारा भारत हा केवळ मळलेल्या वाटेने जाणारा नाही तर नव्या वाटा तयार करणारा जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा देश बनला आहे.

- १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला तरी भारतातील संस्थानांचा प्रश्न न सोडवताच इंग्रज निघून गेले होते. सुमारे ५६२ संस्थानिकांनी भारतात विलीनीकरणास मान्यता दिली होती परंतु जुनागढ, हैदराबाद, जम्मू-काश्मीरसारख्या सारख्या संस्थानिकांनी वेगळा सूर लावला होता. भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मुत्सदीपणामुळे ही संस्थाने भारतात विलीन.
- १९४८ ला लंडन येथे झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेमध्ये स्वतंत्र भारताला हॉकीमध्ये सुवर्णपदक.
- स्वातंत्र्याच्या लढ्यात पुरुषांच्या बरोबरीने लढणाऱ्या स्त्रियांनी नवभारत

घडवण्यासाठी प्रशासकीय वाट धरण्यास १९४९ मध्येच सुरुवात केली. १९४९ मध्ये भारतीय प्रशासकीय परीक्षा पास होणारी पहिली महिला ठरली मुथप्पा बेलियप्पा.

- २६ जानेवारी १९५० ला भारत हा प्रजासत्ताक देश बनला.
- १९५१ मध्ये भारताने पहिल्यांदा आशियायी खेळांचे यजमानपद स्वीकारले.
- १९५२ मध्ये खाशाबा जाधव यांनी हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये फ्री स्टाईल कुस्तीतील कांस्यपदक मिळवले. ते स्वातंत्र्योत्तर काळातील पहिले वैयक्तिक पदक होते.
- १९५२ ला स्वातंत्र्यानंतर देशात पहिल्यांदा निवडणुका झाल्या, ज्यामध्ये सतरा कोटीहून अधिक लोकांनी मतदान केले.
- १९५३ ला इंडियन एअरलाईन्सची स्थापना करून भारताने हवाई क्षेत्रात मोठी झेप घेतली.
- १९५४ ला ट्रॉम्बे इथे पहिल्यांदा आण्विक ऊर्जा कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.
- १९५५ ला भारताने पहिल्यांदा आपला एचइसी २एम हा संगणक बनवला.
- १९५६ आशियातील पहिली अणुभट्टी अप्सराची स्थापना. भारतात आजघडीला सात अणुऊर्जा प्रकल्पात २१ अणुभट्ट्या कार्यान्वित.
- १९५६ला पुन्हा एकदा भारतीय पुरुष हॉकी संघाने मेलबर्न ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले.
- १९५८ मध्ये भारतामध्ये आयआयटीची स्थापना. भारतीय शिक्षण क्षेत्रात एक नवीन क्रांती झाली.
- १९५९ ला आरती सहा ही इंग्लिश खाडी पोहणारी पहिली आशियायी महिला ठरली.
- १९५९ आपुर संसार या सत्यजीत रे यांच्या चित्रपटामुळे भारतीय चित्रपटाचा पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय स्तरावरून गौरव.
- १९६० ला टोकियो इथे झालेल्या ऑलिंपिकमध्ये धावपटू मिल्खा



ब्रम्होस






सुखोई-३० एमकेआय



अग्नि ४

सिंह हे आतापर्यंतचे सारे रेकॉर्ड मोडणारे पहिले धावपटू ठरले.

- १९६१ अलिप्तवादी चळवळीचे नेतृत्व भारताकडे.
- १९६२ ला आशियायी खेळांमध्ये भारतीय फुटबॉलपटूंनी सुवर्णपदक जिंकून सगळ्यात जास्त रँक मिळवली.
- १९६३ ला भाक्रा-नांगल प्रकल्प देशाला समर्पित.
- १९६४ ला भारताचे पहिले जेट ट्रेनर एचजेटी १६ हवेत झेपावले.
- १९६५ मध्ये अन्नधान्याबाबतीत स्वयंपूर्णता प्राप्त करण्याच्या हेतूने हरितक्रांतीला सुरुवात केली.
- १९६६ ला रीता फारिया जागतिक सुंदरीचा पुरस्कार मिळवणारी पहिली भारतीयच नव्हे तर पहिली आशियायी महिला ठरली.
- १९६७ मध्ये पंडित रवी शंकर यांनी भारताला पहिल्यांदा ग्रॅमी पुरस्कार मिळवून दिला.
- १९६८ डॉ. प्रफुल्ल सेन हे हृदय प्रत्यारोपण करणारे जगातले तिसरे आणि आशियातले पहिले डॉक्टर ठरले. आज वैद्यकीय पर्यटनासाठी भारत जगभरातील रुग्णांचे आवडते ठिकाण बनत आहे. कमी खर्चात योग्य आणि दर्जेदार उपचार ही भारताची नवी ओळख बनली आहे.
- १९६९ ला भारतीय अंतराळ संस्था अर्थात इस्रोची स्थापना करण्यात आली. आज जगभरातील संशोधक इस्रोच्या कामगिरीवर विशेष लक्ष ठेवून असतात.

- १९७१ ला भारताने बांगलादेशाला स्वतंत्र होण्यासाठी सैन्याच्या माध्यमातून मदत केली. मानवी हक्काच्या लढ्यात भारत केवळ बघ्याची भूमिका घेत नाही तर प्रसंगी आपली सर्व शक्ती मानवी हक्क संरक्षणासाठी लावू शकतो याचे उदाहरण भारताने स्पष्ट केले.
- १९७३ भारतातील वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने प्रोजेक्ट टायगरची सुरुवात. जगभरात नामशेष होत चाललेल्या वाघाचे संरक्षण करण्यात भारताला मोठे यश. आज जगातील सर्वात अधिक वाघ भारतात आहेत.
- १९७४ मध्ये भारताने पहिल्यांदा शांततापूर्ण वातावरणात यशस्वी अणुचाचणी केली. भारताचा अणुकार्यक्रम शांततेसाठी आहे हे भारताकडून स्पष्ट. त्यासोबतच भारत हल्ल्यासाठी पहिल्यांदा अणुबॉम्ब टाकणार नाही हेही स्पष्ट.
- १९७५ भारताने आर्यभट्ट या पहिल्या उपग्रहाचे अंतराळात प्रक्षेपण करून अंतराळ संशोधनात भारताची मोठी उडी.
- १९७६ सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा या दृष्टीकोनातून कायद्याने वेठबिगारी बंद
- १९७८ मध्ये वैद्यकशास्त्रात भारताचा मैलाचा दगड. भारतातल्या पहिली टेस्ट ट्यूब बेबी 'दुर्गा' हिचा जन्म झाला.
- १९७९ भारतात सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिका सादर करण्यास परवानगी देण्यात आली. जगाच्या दृष्टिकोनातून हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो.
- १९८०मध्ये देवी रोगापासून लोकांना मुक्त करण्यासाठी भारताने सर्वात मोठा लसीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला.
- १९८१ला सोळा वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर भारतीय वैज्ञानिकांनी पहिल्यांदा ट्रोमैरेल हे औषध तयार केले. हे संशोधन औषध निर्माणशास्त्राच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वपूर्ण ठरले.
- १९८२ला भारताने नवी दिल्ली या ठिकाणी आशियायी खेळांचे यजमानपद भूषवले.
- १९८३ हे वर्ष भारताच्या क्रिकेट विश्वासाठी महत्त्वपूर्ण ठरले. यावर्षी कपिल देव यांच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाने विश्वकप जिंकला.
- १९८४ला अंतराळात जाणारे पहिले भारतीय


मंगळयान


पीएसएलव्ही A

अंतराळवीर म्हणून राकेश शर्मा यांचा सन्मान करण्यात आला. सारे जहाँ से अच्छा हिदोस्ताँ हमारा.. राकेश शर्मा यांचे अंतराळातून उद्गार.

- १९८५ला फास्ट ब्रीडर न्यूक्लिअर ॲक्टर मिळवणारा भारत हा आठवा देश ठरला.
- १९८६ ला आशियायी खेळांमध्ये पी.टी. उषाने ऐतिहासिक कामगिरी करत एक नवा विक्रम रचला
- १९८७ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये सुनील गावस्कर यांचा विश्वविक्रम. १० हजार धावा काढणारे पहिले फलंदाज.
- १९८८ भारताच्या सी-डॅकने पहिला स्वदेशी महासंगणक परम बनवला. संगणक तंत्रज्ञानात भारताची नवी मोहर.
- १९८८ ला इस्रोने आशिया खंडातला पहिला रिमोट सेन्सिंग उपग्रह IRS-1A अंतराळात सोडला.
- १९८९ ला केरळ राज्यातील कोट्टायम हा भारतातील पहिला पूर्ण साक्षर जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. भारत निरक्षरतेच्या गर्तेतून साक्षरतेच्या महामार्गावर वेगाने जात असल्याचे ते पहिले सुचिन्ह होते.
- १९९० मध्ये कुवेत आणि इराकमधून १ लाख १० हजार भारतीयांना बाहेर काढण्यात आले. जगभरातील भारतीयांसाठी ही खूप मोठी सुखावह बाब होती. विशेष म्हणजे आजही भारतीय परराष्ट्रमंत्री साध्या ट्विटची दखल घेत परदेशातील भारतीयांच्या मदतीला तत्पर असतात. जगाच्या पाठीवर कुठेही असलो तरी देश आपल्या पाठीशी आहे ही भावना परदेशी भारतीयांमध्ये दृढ.
- १९९१ ला आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताने सुधारणा कार्यक्रमाची घोषणा केली.
- १९९३ मध्ये आंतरराष्ट्रीय मुद्राकोषने भारत ही जगातील आठव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था असल्याचे घोषित केले.
- १९९४ ला भारताच्या सुष्मिता सेन आणि ऐश्वर्या राय यांना विश्वसुंदरी आणि जगत् सुंदरीचा मान मिळवला.
- १९९४ बावीस वर्षीय हरिता कौर देओल 'व्रो एचएस ७४८' हे विमान घेऊन आकाशात झेपावली. साहाय्यकाशिवाय विमान चालवणारी हरिता पहिली भारतीय महिला ठरली.
- १९९५ मध्ये भारतात पहिल्यांदा इंटरनेटने प्रवेश



**२010 साली दिल्ली येथील कॉमनवेल्थ गेममध्ये १०१ पदक जिंकणारे भारतीय खेळाडू.**

केला.

- १९९६ मध्ये अटलांटा येथे झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत २३ वर्षाच्या लिएंडर पेसने कांस्य पदक जिंकले. ४४ वर्षाच्या काळातले हे पहिले पदक होतो.
- १९९७ मध्ये अरूधंती रॉय यांना 'दि गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या पुस्तकासाठी बुकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला तो १९९८ मध्ये अमर्त्य सेन यांना मिळालेल्या अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराने. हा सन्मान मिळवणारे ते सहावे भारतीय होते.
- १९९९ मध्ये न्यूयॉर्क आणि नास्डैकमध्ये शाखा खोलणारी इन्फोसिस ही पहिली भारतीय कंपनी ठरली.
- बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदने २००० ला आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा जिंकली. विश्वनाथन आनंदने पुढे दशकभर बुद्धिबळपटावर आपले साम्राज्य टिकवले.
- २००१ ला भारतीय बनावटीचे फाइटर जेट 'तेजस' ने बंगलोर या ठिकाणी आपले पहिले उड्डाण केले.
- २००३ मध्ये सानिया मिर्जाने विंबल्डनची दुहेरी स्पर्धा जिंकली. ही स्पर्धा जिंकणारी ती पहिली भारतीय ठरली.
- २००४ मध्ये राज्यवर्धन राठोडने ऑलिंपिक स्पर्धेत शूटिंग प्रकारामध्ये रौप्य पदक पटकावले.
- २००५ मध्ये भारतात सर्वत्र माहितीचा अधिकार कायदा लागू झाला. भारतीय लोकशाही आणखी बळकट करणाऱ्या या कायद्याचे देशभरातून स्वागत.
- २००६ मध्ये परिमर्जन नेगी हा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत ग्रँडमास्टर होणारा सर्वात तरुण आशियायी ठरला.
- २००७ मध्ये प्रतिभा पाटील या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती बनल्या.
- २००८ मध्ये अभिनव बिंद्राने शूटिंग प्रकारात बीजिंग ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकले. अभिनव बिंद्रा हा या खेळात सुवर्णपदक जिंकणारा पहिला भारतीय ठरला.
- २००८ साल महत्त्वपूर्ण ठरले ते यशस्वी चांद्रमोहिमेमुळे. भारताच्या या यशस्वी चांद्र मोहीम १ ने साऱ्या जगाला चकित करून सोडले.
- २००९ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने समलैगिंकतेला गुन्ह्याच्या श्रेणीतून बाहेर काढले.
- २०१० ला शिक्षणाचा अधिकाराला संविधानिक अधिकार म्हणून घोषित करण्यात आले.
- २०११ मध्ये एम.एस धोनीच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने विश्वचषक जिंकला.
- २०१२ ला लंडन ऑलिंपिक स्पर्धेत भारताने सहा पदके जिंकली.
- २०१२ बांगलादेशाविरूद्ध खेळताना सचिन तेंडुलकरचे १०० वे शतक. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० शतके ठोकण्याचा बहुमान पटकाविणारा पहिला भारतीय.
- २०१४ मध्ये भारताने यशस्वी मंगळ मोहिम राबवली. या मोहिमेसाठी भारताला आलेला खर्च तुलनेत खूपच कमी.
- २०१४ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याचे घोषित केले.
- जून २०१६मध्ये देशात पहिल्या महिला वैमानिकांच्या तुकडीला प्रशिक्षण देण्यात आले.
- २०१७ चार हजार किलो वजनाचे उपग्रह वाहून नेण्याची क्षमता असलेल्या यानाचे यशस्वी उड्डाण.
- १ जुलै २०१७ पासून देशभरात वस्तू व सेवा कर लागू. एक देश एक कर लागू.

आज जगातील विकसनशील देशापैकी सर्वात महत्त्वाचा देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. प्रत्येक राज्याची वेगळी संस्कृती आणि भौगोलिक वैशिष्ट्ये असलेल्या या आपल्या देशात स्वातंत्र्यदिनाचा उत्सव मात्र, सगळीकडे सारखाच असतो.

**– वर्षा कुलकर्णी**

# स्वच्छतेची नवी वाट...

**शहरी भागातील दैनंदिन कचऱ्याची स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली आहे. पुणे, मुंबईसारख्या शहरामध्ये या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. विटा शहरही त्यास अपवाद नव्हते. शहरातून दैनंदिन १७ टन कचरा निर्माण होत होता. मात्र, विटा नगरपालिकेने स्वच्छतेची सप्तपदी अनुसरत स्वच्छ भारत अभियानात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.**

विटा शहरातील ओला आणि सुका कचरा एकत्र असणे ही खरी समस्या होती. कचऱ्याचे विलगीकरण केल्यास त्यापासून नगरपरिषदेस उत्पन्न मिळवण्याचे विविध मार्ग आहेत, हे ओळखून कचरा हे नगरपालिकेसाठी एक उत्पन्नाचे साधन ठरू शकते, ही बाब संबंधितांच्या लक्षात आली.

## कचरा विलगीकरण

जागेवरती कचऱ्याचे ओला कचरा, सुका कचरा, प्लास्टिक, काच व धातू अशा चार प्रकारामध्ये विलगीकरण करण्याचे आरोग्य विभागाने ठरवले. घरातूनच कचऱ्याचे विलगीकरण होण्यासाठी महिलांना ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवण्यासाठी जवळपास ७००० कुटुंबांना १४००० कचराकुंड्या देण्यात आल्या. त्याची सचित्र माहिती देणाऱ्या १० हजार पत्रकांचे वाटप करण्यात आले, व हे पत्रक घराच्या दारावरती चिकटवण्यात आले. महिलांकडून कचराकुंडीच्या वापराबाबत लेखी बंधपत्र घेण्यात आले.

नागरिकांना कचरा देण्यासाठी दिवसातून २ वेळा घंटा गाडी उपलब्ध करून देण्यात आली. नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व बिंबवण्यासाठी गेली ३ वर्षे दररोज सकाळी शहरामध्ये घंटागाडीवर ध्वनीक्षेपणाद्वारे जाहिरात प्रसारित करण्यात येत आहे.

जनजागृतीसाठी नगरपरिषदेने शहरातील विविध भागांमध्ये फ्लेक्स बोर्ड, मुख्य चौकामध्ये चित्रमय रंगीत बोलक्या भिंती, प्रभागस्तरीय नगरसेवक यांच्या बैठकी, आरोग्य विभाग तक्रार केंद्र व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप व विटा नगरपरिषदेच्या फेसबुक व ट्विटर हॅन्डलच्या माध्यमातून विविध फोटो, व्हिडिओद्वारे प्रयत्न केले. विटा नगरपरिषदेच्या फेसबुक ग्रुपवर शहरातील ४१०० नागरिक नगरपरिषदेच्या कायम संपर्कात आहेत. याचा फायदा शहर स्वच्छ व कचरामुक्त ठेवण्यासाठी होत आहे

कचरामुक्त शहरासाठी नागरिकांच्या जनजागृतीबरोबरच घंटागाडीवरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी प्रत्येक घंटागाडीवर चालकाबरोबर २ साहाय्यक स्वच्छतादूत याप्रमाणे शहरातील ८ घंटागाड्यांमध्ये २४ कर्मचारी उपलब्ध करून दिले.

**कचरा विलगीकरणाची चतुःसूत्री**

- ओला कचरा
- सुका कचरा
- प्लास्टिक कचरा
- काच व धातू

## घनकचरा व्यवस्थापन आराखडा

कचरा विलगीकरण न केल्यामुळे पर्यावरणाच्या समस्या वाढतात. त्या लक्षात घेऊन वर्गीकृत केलेल्या ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी व कचऱ्याचे संकलन करण्यासाठी नगरपरिषदेने ५ कोटी रकमेचा घनकचरा व्यवस्थापन आराखडा तयार करून शासनास सादर केला. नगरविकास विभागाने या आराखड्यास प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून दिला. या आराखड्यानुसार कचरा संकलन व कचरा प्रक्रिया यावर नगरपरिषदेने काम सुरू केले आहे. यामधून कचरा संकलनासाठी चार घंटागाड्या, गटर स्वच्छतेसाठी मशीन, गार्बेज कॉम्पॅक्टर खरेदी केला आहे.



**नागरिकांना कचराकुंड्यांचे वाटप करताना विटा नगरपरिषदेचे अधिकारी.**

## हरित महाकंपोस्ट ब्रँड

२०१५ साली इकोमॅन कंपनीचे मेकॅनिकल कंपोस्ट यंत्रणा खरेदी केली असून त्याद्वारे ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. त्याच्या जोडीला प्रत्येकी २.५ टन क्षमतेचे १२ गांडूळ खत संयंत्रे उभारले आहेत. प्रत्येकी २ टन क्षमतेचे ५ गांडूळ खत संयंत्रे नगरपरिषद उभारत आहे. त्यातून तयार झालेले सेंद्रिय खत ४ रुपये प्रतिकिलो दराने विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. खतासाठी नगरपरिषदेचा स्वतःचा ब्रँड आहेच, पण भविष्यात महाराष्ट्र शासनाचा सेंद्रीय खतासाठी

असणारा 'हरित महा कंपोस्ट' ब्रँड नगरपरिषदेस प्राप्त होणार आहे. त्याद्वारे नगरपरिषदेस सेंद्रिय खतासाठी प्रतिटन १५००/- रुपये इतके वाढीव अनुदान शासनाकडून मिळणार आहे.

सुक्या कचऱ्यामध्ये प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण अंदाजे ३० टक्के आहे. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी नगरपरिषदेने यंत्रणा बसवली आहे. त्याद्वारे तयार झालेल्या कच्च्या मालास गुणवत्तेनुसार बाजारपेठेत १०/- रुपये प्रतिकिलो ते २५/- रुपये प्रतिकिलो इतका दर मिळत आहे. त्यामुळे नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडत आहे. जैविक सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करून कांडी कोळसा तयार करण्यासाठीचे मशीन विटा नगरपरिषद खरेदी करत आहेत. काही दिवसातच ते बसवले जाणार आहे. भविष्यात वाढीव ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाईल. त्याद्वारे मिथेन वायू तयार करून त्याद्वारे वीज तयार करण्यासाठीचा बायोगॅस प्रकल्प करण्यासाठी नगरपरिषदेची पूर्ण तयारी झाली आहे.




यांव्यतिरिक्त अविघटनशील कचरा, बांधकामातील कचरा व इतर कचरा याची विल्हेवाट लावण्यासाठी नगरपरिषद पर्याय शोधत आहे. जुन्या कचऱ्याच्या ढिगाचे वर्गीकरण करून घनकचरा टाकण्यात येणारी जागा स्वच्छ करत आहे. यामुळे कचरा डेपो या नावाऐवजी या जागेची ओळख 'घनकचरा व्यवस्थापन भूमी' म्हणून कायम होईल. हे ठिकाण नागरिकांना फिरण्याचे, विरंगुळ्याचे, अभ्यास केंद्र म्हणून नावारूपास येईल. त्याचीच सुरुवात म्हणून नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापन भूमीमध्ये उंच, घनदाट सावलीची झाडे चारही बाजूस २ वर्षापूर्वी लावलेली आहेत. कर्मचाऱ्यांच्या आरामासाठी हिरवळीची निर्मिती केली आहे.

### कचरा प्रक्रियेतून उत्पन्न

- सेंद्रिय खत - ४ रुपये प्रतिकिलो महिन्याला १० टन निर्मिती
- प्लास्टिक - प्लास्टिकसाठी कच्चा माल १५ ते २५ रुपये प्रतिकिलो
- कांडी कोळसा - ६ रुपये प्रतिकिलो दिवसाला १०० किलो
- प्लास्टिक व काच - भंगारवाल्यास विक्री करून उत्पन्न
- कपडे व चप्पला - भंगारवाले तसेच गरजूंना मोफत उपलब्ध


### स्क्रॅप बँक

कचरामुक्त स्वच्छ शहर या चळवळीला काही कारणास्तव खीळ बसू नये, यासाठी 'स्क्रॅप बँक' नावाचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या १८ शाळांमध्ये हा उपक्रम राबवण्यात येत आहे. यामध्ये सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना 'स्क्रॅप बँक' पासबूक उपलब्ध करून दिले आहे. प्रत्येक शाळानिहाय 'स्क्रॅप बँक' समितीची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये आठवड्यातील प्रत्येक २ दिवस घरातील, परिसरातील सुका कचरा व प्लास्टिक कचरा कुंडीत, रस्त्यावर न टाकता आपापल्या शाळांमध्ये वर्गशिक्षकाकडे जमा करणार आहेत. वर्गशिक्षक कचऱ्याचा प्रकार, स्वरूप इ. लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना मूल्यांकन अथवा मार्क देणार आहेत. दर ३ महिन्याला या योजनेचा आढावा घेण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना 'स्क्रॅप बँक' पासबुकमधील मूल्यांकनानुसार शालोपयोगी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल. या योजनेचा निव्वळ उद्देश सुका कचरा गोळा करणे नसून, त्यामधून विद्यार्थ्यांच्या मनावर स्वच्छतेचे महत्त्व बिंबवले जावे, लहान वयातच त्यांच्या मनावर स्वच्छतेचा संस्कार घडावा हा आहे. शहरामधून मोठ्या प्रमाणामध्ये कचरा निर्माण करणाऱ्या हॉटेल, मटण व्यावसायिक आणि चिकन व्यावसायिक यांच्यासाठी स्वतंत्र घंटागाडीच्या माध्यमातून कचरा संकलन होत आहे. विटा शहर हद्दीमध्ये १४ मंगल कार्यालये आहेत. मंगल कार्यालयाकडून घनकचरा व्यवस्थापन शुल्क आकारून त्यांच्यासाठी स्वतंत्र घंटागाडीची सोय करण्यात आली आहे. रिसायकल न होणाऱ्या प्लास्टिकचे तुकडे केले जातील. डांबरीकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या डांबरामध्ये ते टाकून प्लास्टिकयुक्त डांबरी रस्ते बनवले जातील.

अशा रीतीने विटा शहरामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण रिसायकेबल (कचऱ्यावर पुन्हा प्रक्रिया करणे), रियुझेबल (कचरा त्याच स्वरूपात वापर करणे), बायोडिग्रेडेबल (कचरा विघटन करून सेंद्रिय खत निर्मिती), प्रक्रिया न करता येणारा कचरा असे करून अवर्गीकृत कचऱ्याची समस्या दूर करण्यात येत आहे.

ऑक्टोबर २०१५ पासून स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत स्वच्छतेची सप्तपदी हा उपक्रम विटा शहरात राबवण्यात येत आहे. मुख्य अधिकारी महेश रोकडे व प्रशासनाच्या गेल्या २-३ वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे तसेच लोकप्रतिनिधींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विटा नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापनामध्ये यशस्वी वाटचाल करू शकली आहे.

**- संप्रदा द. बीडकर**
जिल्हा माहिती अधिकारी, सांगली



**गतिमान विकासाच्या ध्यासाने मानवाकडून कधी नव्हे निसर्गचक्राची एवढी हानी झाली आहे. आपण नैसर्गिक स्रोतांचा जेवढा अतोनात वापर करतो तेवढा त्याच्या संवर्धन, वृद्धीबाबत विचार करतो का? नाही करत. शासन पातळीवर यासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. परंतु आपला त्यात सहभाग असणे आवश्यक आहे. त्यासाठी अक्षय ऊर्जा दिनाचे औचित्य साधून सौर ऊर्जेची कास धरायला हवी. केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयांतर्गत सोलर रूफटॉपविषयी विशेष योजना राबवली जात आहे. त्याअंतर्गत आपण आपल्या गरजेपुरती वीज सौर ऊर्जेवर तयार करू शकतो.**

# सौर ऊर्जा, शाश्वत ऊर्जा

अक्षय ऊर्जा ही आता काळाची गरज बनली आहे. तिचा अवलंब सर्वांनी करायला हवा. शिवाय ती आपल्या खिशाला परवडणारीदेखील आहे. 'ग्रिड कनेक्टेड सोलर रूफटॉप' योजना त्यापैकीच एक आहे. आपल्या घरावर, सोसायटीच्या छतावर सोलर रूफटॉप बसवून आपल्याला आवश्यक तेवढी वीज निर्मिती करता येते. तीही नैसर्गिक स्रोतापासून. सूर्य दिवसेंदिवस आग ओकत आहे. आपण या योजनेपुरता विचार केला तर सौरऊर्जेपासून वीज निर्मितीची संधी आपणास आहे.

सौरऊर्जेपासून मिळणारी वीज स्वच्छ आणि पर्यावरणपूरक असते. रूफटॉप सोलर पॅनलच्या माध्यमातून देशभरात शाळा, महाविद्यालये, खासगी व सरकारी इमारती, रेल्वे स्टेशन्सवर आदी ठिकाणी सौरऊर्जेपासून वीज निर्मिती केली जात आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यावर हा रामबाण उपाय आहे, म्हंटल्यास तर वावगे ठरणार नाही.

## ३० ते ७० टक्के अनुदान

आपल्याला आवश्यक तेवढी वीज निर्मिती करण्याच्या दृष्टीने सोलर पॅनलला अधिक जागा लागत नाही. समजा १ किलोव्हॅट क्षमतेचे सोलर पॅनल बसवायचो असेल तर त्याला १० वर्गमीटर एवढी जागा लागते. यासाठी साधारणत: ६०-७० हजार रुपये एवढा खर्च येतो. मात्र हा खर्च दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या विजबिलाचा विचार केला तर अधिक नाही. एकदा हे पॅनल बसवल्यानंतर वर्षानुवर्षे मोफत वीज पुरवठ्याची एकप्रकारे हमी आपल्याला मिळते. हे सोलर पॅनल बसवल्यानंतर साधारणत: २० ते २५ वर्षे ते प्रभावीपणे वीज निर्मिती करते. शिवाय याच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च जास्त नसतो. यासाठी केंद्र सरकारद्वारे महाराष्ट्रासारख्या राज्याला ३० टक्के अनुदान दिले जाते. हे अनुदान खासगी जोडणीसोबतच सामाजिक व गृहनिर्माण संस्था आदींनाही वितरित केले जाते. काही सरकारी बँकांमधून यासाठी कमी व्याजदराने कर्जपुरवठा केला जातो.

## विद्युत वाहक यंत्रणा बदलण्याची गरज नाही

सौर ऊर्जा निर्मितीचा प्रकल्प घरावर बसवल्यानंतर येथे निर्माण होणारी वीज वापरात आणण्यासाठी वेगळ्या वायरिंगची गरज पडत नाही. आहे त्या यंत्रणेलाच ही वीज जोडता येते. त्यामुळे नव्याने वायरिंग करण्याचा खर्च वाचतो.

## सोलर रूफटॉप कॅल्क्युलेटरची मदत घ्या

आपल्या छतावर किती जागा आहे, त्याप्रमाणे आपण कुठल्या आकाराचा व क्षमतेचा सोलर रूफटॉप बसवू शकतो, त्यासाठी साधारणत: किती खर्च येईल यासंबंधीची माहिती ऊर्जा व ऊर्जा नवीकरणीय मंत्रालयाच्या www.solarrooftop.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या संकेतस्थळावर सोलर रूफटॉप कॅल्क्युलेटरची व्यवस्थादेखील आहे. या माध्यमातून आपण बसवू इच्छित असलेल्या क्षमतेच्या रुफटॉपसाठी नेमका किती खर्च येईल याची सविस्तर माहिती मिळेल.


## ठरेल वाटाड्या 'अरुण' मोबाइल ॲप

या योजनेबाबत ऊर्जा मंत्रालयाने ARUN हे मोबाइल ॲपदेखील उपलब्ध करून दिले आहे. या माध्यमातून सोलर रूफटॉप बसवण्यासंबंधीची सर्व माहिती आपल्याला मोबाइलवर उपलब्ध होईल.

हे ॲप वापरणे खूप सोपे आहे. गुगल प्ले स्टोअरवरून हे ॲप डाउनलोड करता येईल.

### उत्पन्नाचे साधन

घर, गृहनिर्माण संस्था, सामाजिक सभागृह, मंगलकार्यालये आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर हे सोलर पॅनल बसवल्यास यातून मोठ्या प्रमाणावर वीज निर्माण करता येणे शक्य होईल. त्यामुळे आपल्या गरजेपुरती वीज घरीच तयार होईल. शिवाय ज्या वेळी सूर्यप्रकाश अधिक असतो त्या वेळी मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होते. अशी अतिरिक्त वीज ही वितरण कंपनीला पुरवता येते. आपल्या घरावरील ऊर्जा प्रकल्पात तयार झालेली डीसी (डायरेक्ट करंट) ऊर्जा 'पावर कन्डिशनिंग युनीट'च्या माध्यमातून एसी (अल्टरनेटीव्ह करंट) विद्युत प्रकारात रूपांतरित करून विद्युत वाहिनीला (Grid) पुरवली जाते. ही वीज नेट मिटरींगच्या माध्यमातून मोजून विद्युत वितरण कंपनीच्या देयकात ती समायोजित (ॲडजस्ट) करता येते. शिवाय ज्या वेळी ढगाळ वातावरणामुळे सूर्यप्रकाश कमी असेल तेव्हा विद्युत भाराचा समतोल राखला जाईल व वीज वितरण कंपनीची वीज आपल्याला स्वयंचलितरीत्या मिळेल. त्यामुळे अखंड वीजेची हमी आपल्याला मिळते. आपण वीज वितरण कंपनीची वापरलेली वीज आणि ऊर्जा प्रकल्पातून त्यांना पुरवलेली वीज याचा ताळमेळ करून देयकाची आकारणी केली जाते.




## हेल्पलाइन

सौर ऊर्जेसंबंधीच्या कुठल्याही वापरासंबंधीची मदत व माहिती १८००२३३४४७७ या हेल्पलाइनवर (वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते ६.३०, शनिवारी ९.३० ते १२.३०) प्राप्त करून दिली जाते.

## दृष्टिक्षेपात

- १० स्क्वेअर मीटर एवढ्या आकाराचे सोलर रूफटॉप १ किलोव्हॅट (kw) एवढी वीज निर्माण करू शकते. म्हणजेच महिन्याला १५० युनीट्स.
- १ किलोव्हॅट क्षमतेच्या प्लांटपासून वर्षाला रुपये ९००० एवढी बचत होऊ शकते.
- घरगुती, गृहनिर्माण सोसायटी, संस्था आणि सामाजिक क्षेत्रासाठी सोलर रूफटॉपकरिता ३० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रासाठी अनुदान लागू नाही.
- प्राधान्यक्रमाने कर्जाची सुविधा. होम लोन किंवा इम्प्रूव्हमेंट लोन या शीर्षकाखालीदेखील लोन दिले जाते.
- सोलर रूफटॉपविषयी अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : www.solarrooftop.gov.in तसेच सौर ऊर्जेसंबंधी सविस्तर माहितीसाठी संकेतस्थळ : www.nmre.gov.in
- अक्षय ऊर्जेबाबात 'महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) राज्याची नोडल एजन्सी म्हणून काम पाहते. संकेतस्थळ : www.mahaurja.com
- वरील संकेतस्थळावर रूफटॉप बसवून देणाऱ्या अधिकृत वितरकांची यादी उपलब्ध.
- रूफटॉप बसवून देणे, अनुदान व कर्ज यासाठीही वितरकांचे साहाय्य मिळते.

### असे बसवा सोलर रूफटॉप

सौर ऊर्जेची उपकरणे आता सहज उपलब्ध होऊ लागली आहेत. अधिकृत निर्मात्यांकडून गुणवत्तापूर्ण सोलर पॅनलची निर्मिती केली जाते. त्याहीपेक्षा सोपे म्हणजे 'अरुण' ॲप किंवा 'सोलर रूफटॉप' या संकेतस्थळाच्या माध्यमातून आधी सोलर कॅल्क्युलेरद्वारे आपण कुठल्या क्षमतेचे रूफटॉप बसवू शकता हे निश्चित करा. त्यानंतर संकेतस्थळावरील सोलर रूफटॉप इन्स्टॉलेशन इंटरेस्ट अर्ज भरा. यामध्ये तुम्ही कुठल्या क्षमतेचे रूफटॉप बसवण्यास इच्छुक आहात हे नमुद करावे लागेल. त्यानंतर तुमची विनंती स्वयंचलित (टोमॅटिकली) ज्या राज्यात आपण राहत आहात त्या राज्याला नोडल एजन्सी व चॅनेल पार्टनर्स यांना पाठवली जाईल. चॅनल पार्टनर्स (रूफटॉप बसवणारी संस्था/एजन्सी) तुमच्याशी संपर्क साधतील. तुम्हाला प्रस्ताव सादर करण्यास सांगतील. हे रूफटॉप बसवण्यासंबंधीचे सर्व तांत्रिक काम ती संस्था पार पाडेल. शिवाय त्यासबंधीचा तांत्रिकदृष्ट्या सविस्तर प्रस्तावही तयार करेल. ग्राहक आपली कुवत व आवडीनुसार रूफटॉप निवडू शकतात. त्यानंतर हे सौर ऊर्जानिर्मिती करणारे रूफटॉप बसवून दिले जाईल. ते बसवल्यासंबंधीचे प्रमाणपत्रही या संस्थेकडून दिले जाईल.

**– डॉ. सचिन खरात**



# कृषी माल पाठवा परदेशात

**महाराष्ट्र राज्य हे देशाचे फ्रूट बाऊल म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये भाजीपाल्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. द्राक्ष, आंबा, डाळिंब, संत्री, मोसंबी, आवळा, चिकू, पेरु, पपई, सिताफळ, चिंच, बोरं, कांदा, टोमॅटो, वांगी, भेंडी, कोबी, वाटाणा, हिरवी मिरची, शेवगा इ.फळे आणि भाजीपाल्याच्या उत्पादनात आणि निर्यातीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. त्यामुळे निर्यात क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी तरुणांना खुणावत आहेत. त्यासाठी शासनाने प्रशिक्षणाची सोयदेखील करून दिली आहे.**

जागतिकीकरण आणि जागतिक व्यापार संघटनेतील तरतुदींमुळे कृषी मालाच्या विक्रीसाठी जागतिक बाजारपेठ खुली झाली असून कृषी मालाच्या आयात-निर्यातीच्या संधी वाढलेल्या आहेत. देशातील सुमारे ७२.१६ लाख हेक्टर क्षेत्रफळ लागवडीखाली आहे. यामधून सुमारे ८८९.७७ लाख टन फळांचे उत्पादन होते. देशातील सुमारे ९३.९६ लाख हेक्टर क्षेत्र भाजीपाला लागवडीखाली असून देशाचे भाजीपाल्याचे उत्पादन १६२८.९६ लाख मे.टन इतके आहे. महाराष्ट्र राज्य हे देशाचे 'फ्रूट बाऊल' म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये भाजीपाल्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

## उत्पादन व निर्यातीत अव्वल

राज्याला व्यापारासाठी बॉम्बे पोर्ट आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) यासारखे दोन आंतरराष्ट्रीय दर्जाचे समुद्री पोर्ट उपलब्ध असून मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर यासारखे आंतरराष्ट्रीय विमानतळ उपलब्ध आहेत. या उपलब्ध साधनसामग्रीचा आणि उपलब्ध सोयीसुविधांचा विचार करता महाराष्ट्रातून कृषी मालाच्या निर्यातीस मोठा वाव आहे. महाराष्ट्र हे द्राक्ष, आंबा, डाळिंब, संत्री, मोसंबी, आवळा, चिकू, पेरु, पपई, सिताफळ, चिंच, बोरं, कांदा, टोमॅटो, वांगी, भेंडी, कोबी, वाटाणा, हिरवी मिरची, शेवगा इ.फळे आणि भाजीपाल्याच्या उत्पादनात आणि निर्यातीत अग्रेसर आहे. महाराष्ट्र राज्य कृषी मालाच्या निर्यातीत देशात अव्वल स्थानावर असून २०१६-१७ या वर्षामध्ये महाराष्ट्रातून फळे-भाजीपाल इतर शेतमाल आणि प्रक्रिया पदार्थ यांची निर्यात २०५ लाख मे.टन झाली होती. तर या निर्यातीतून रु.१ लाख कोटींचे परकीय चलन प्राप्त झाले.

राज्यामध्ये भविष्यात फळे आणि भाजीपाल्याच्या उत्पन्नामध्ये सातत्याने वाढ होत राहणार आहे. तथापि, कृषी मालाची निर्यात ही प्रामुख्याने मुंबई शहरामध्ये केंद्रित असून निर्यातदारांमध्ये थेट शेतकरी अथवा ग्रामीण भागातून व्यक्तींचा समावेश नगण्य स्वरूपामध्ये आहे. अद्यापही शेतकरी मंडळी ही कृषी मालाच्या उत्पादनामध्ये व्यस्त असून या मालाची विक्री व्यवस्था तसेच निर्यात या गोष्टी तांत्रिक आणि किचकट समजून ग्रामीण भागातील लोकांनी निर्यातीमध्ये लक्ष घातलेले दिसून येत नाही. त्यामुळे कृषी मालाची निर्यात ही संपूर्णत: उत्पादकांव्यतिरिक्त इतर व्यक्तींच्या अथवा साखळीच्या हातात आहे.

## निर्यातीचा फायदा थेट उत्पादकाला

कृषी मालाची निर्यात ही उत्पादकांकडून होणे गरजेचे आहे कारण त्याशिवाय निर्यातीतून मिळणारा खरा फायदा हा शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, ग्रामीण भागातील युवक, उद्योजक यांना मिळणे अशक्यप्राय वाटते. ग्रामीण भागामध्ये निर्यातीबाबत मोठ्या प्रमाणात कुतूहल आहे. तथापि, योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे अद्यापही निर्यातीकरिता ग्रामीण युवक पुढे आलेले दिसून येत नाहीत. निर्यातीबाबतचे तांत्रिक ज्ञान ग्रामीण युवकांना प्राप्त झाल्यास निर्यातीकरिता कोणत्या शेतमालाचे प्रमाणीकरण कसे असावे, प्रतवारी कशी करावी, पॅकिंग, साठवणूक, वाहतूक इ. विविध बाबी कळाल्यामुळे ग्रामीण भागातून किमान





निर्यातदारांना थेट शेतमालाचा पुरवठा मागणीनुसार करणे शक्य होईल. तसेच यातूनच भविष्यात निर्यातदारही निर्माण होतील, अशी अपेक्षा आहे.

### जबाबदारी योग्य मार्गदर्शनाची

कृषी पणन मंडळाने गेल्या दीड वर्षापासून हे प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने चालवले असून आतापर्यंत सुमारे ३५० व्यक्तींनी या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे. कृषी मालाची निर्यात हा विषय कठीण नाही. तो शेतकऱ्यांनी हाताळू नये अशी परिस्थिती अजिबात नसून, ग्रामीण भागातील युवक अधिक कार्यक्षमतेने आणि जबाबदारीने निर्यातीमध्ये उतरू शकतो. त्याकरिता योग्य मार्गदर्शन देण्याची जबाबदारी कृषी पणन मंडळाने घेतलेली आहे. यातूनच ग्रामीण भागातून नवनवीन निर्यातदार निर्माण व्हावेत, अशी अपेक्षा आहे. निर्यातीसाठीच्या या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी समन्वयक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, प्लॉट क्र.आर-७, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे-४११०३७, ई-मेल: export@msamb.com यांच्याशी संपर्क साधावा. प्रशिक्षणाला येण्यापूर्वी प्रशिक्षणासाठी नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**– डॉ. भास्कर पाटील**
सहा. सरव्यवस्थापक (ज.सं.व.प्र) तथा संपादक (कृषी पणन मित्र)



आपली शेती

## फळनिर्यात प्रशिक्षण

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने राज्यातील शेतकरी, शेतकऱ्यांचे गट, शेतकरी उत्पादन कंपन्या, सहकारी संस्था यांना कृषी मालाचे निर्यातदार करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स (फळनिर्यात प्रशिक्षण अभ्यासक्रम) तयार केला आहे. पणन मंडळातर्फे दर महिन्याला एक आठवड्याकरिता या पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कृषी पणन मंडळाने निर्यातीला चालना देण्यासाठी सुमारे २० ते २५ वर्षापासून प्रयत्न करत आहे. निर्यातीसाठी आवश्यक ४५ निर्यात सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. यामध्ये विकीरीकरण प्रक्रिया, व्हेपर हिट ट्रिटमेंट, हॉट वॉटर ट्रीटमेंट यासारख्या प्रक्रिया करण्याच्या सुविधांचा समावेश आहे. याचबरोबर संस्थात्मक पद्धतीने निर्यात व्हावी याकरिता कृषी पणन मंडळाने महाग्रेप्स, महाअनार सारख्या स्वतंत्र भागीदारी संस्था स्थापन करून त्यांना प्रोत्साहन दिले आहे. विविध प्रकारच्या कृषी मालाचे नमूने परदेशात पाठवून तसेच विविध कृषी मालाच्या निर्यातीसाठीचे प्रोटोकॉल निश्चित करण्यासाठी कृषी पणन मंडळाने सातत्याने प्रयत्न केले आहेत.

हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्समध्ये कृषी मालाच्या निर्यातीसाठी आवश्यक आयात निर्यात परवाने काढण्यापासून ते केंद्र शासनाच्या अखत्यारीमधील अपेडा, नॅशनल प्लँट प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन, एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन इ. संस्थांच्या माहितीबरोबर या संस्थांच्या अधिकाऱ्यांशी प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थींचा सुसंवाद साधण्यात येतो. त्याचबरोबर निर्यातदारांशी चर्चा, अपेडा अधिकाऱ्यांबरोबर चर्चा आणि कृषी पणन मंडळाने वाशी येथे उभारलेल्या विविध सुविधांना भेटी, निर्यातीसाठी आवश्यक नोंदण्या, जसे फायटोसॅनेटरी प्रमाणपत्रासाठी कृषी विभाग, सर्टिफिकेट ऑफ ओरिजिनसाठी चेंबर ऑफ कॉमर्स, निर्यातीच्या पत विम्यासाठी एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन ऑफ इंडिया, कस्टम विभागांतर्गत निर्यात करावयाच्या प्रस्तावित पोर्टवर नोंदणी, कस्टम हाऊस एजन्सीची निवड, क्लिअरिंग अँण्ड फॉरवर्डिंगसाठी आवश्यक कागदपत्रे, आयातदार पत, विमान आणि समुद्रमार्गे विमा इ. विविध बाबींवर तज्ज्ञ व्यक्तींमार्फत मार्गदर्शन करण्यात येते. प्रशिक्षणासाठी प्रत्येक बॅचमध्ये सुमारे २० व्यक्तींना प्रवेश देण्यात येत असून निवासाच्या व्यवस्थेसह प्रशिक्षण शुल्क रु.८,६००/- एवढे निश्चित करण्यात आले आहे. प्रशिक्षण शुल्कामध्ये निवास, चहा, नाष्टा, जेवण व सेवाकर इ. चा समावेश आहे. महिलांसाठी प्रशिक्षण शुल्कामध्ये ४० टक्के सवलत असून प्रत्येक बॅचमध्ये जागा राखून ठेवण्यात येतात.

# लाखमोलाची शेती

**'कांदा- मुळा- भाजी, अवघी विठाई माझी' या पंक्ती शेतीत अवतरल्या तर काय होऊ शकते हे कोपरगाव तालुक्यातील जेऊरकुंभारी येथील दिलीप दत्तात्रय शिंदे यांनी प्रत्यक्षात आणून दाखवलेय. कांदा, गहू, हरभरा, लसूण, चिकू आणि इतर पिकांच्या शेतीतून त्यांनी वर्षाकाठी लाखो रूपयांचे उत्पन्न मिळवले आहे. शासनाच्या सेंद्रीय शेती योजनेसह कृषी विभागाचे मार्गदर्शन घेत त्यांनी शेतीत केलेली प्रगती कौतुकास्पद आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी शिंदे यांची शेतीतील प्रगती, एक दीपस्तंभ ठरावा अशी आहे.**



जेऊरकुंभारी हे कोपरगाव तालुक्यातील गाव. गावातील बहुतांश कुटुंबाचा शेती हाच मुख्य व्यवसाय. नगर – मनमाड महामार्गालगत गावचे शिवार आहे. याच गावात दिलीप शिंदे नावीन्यपूर्ण प्रयोगासह शेती करतात. ते बी.कॉम. आहेत, मात्र नोकरी न करता त्यांनी वडिलोपार्जित १८ एकर शेती कसण्याचा निर्णय घेतला. महामार्गानजीक शिंदे यांची शेती आहे. पूर्वी पाणी मुबलक होते. त्या वेळी ऊसाची शेती केली जात होती, मात्र कमी पाण्यात नियोजन करून शेती करण्याचा निर्णय दिलीप यांचे वडील स्व. दत्तात्रय शिंदे यांनी घेतला व दोन हेक्टर क्षेत्रावर चिकूची लागवड केली.

## सेंद्रिय शेतीची सुरुवात

जेऊरकुंभारी शिवारात रब्बी कांदा लागवड केली जाते, शिंदे कांदा लागवड करत, मात्र रासायनिक खतांचा वापर व फवारणीसह होणारा इतर खर्च वाढत होता. शेतीत होणारा बदल दिसत होता. उत्पादन वाढले तरी उत्पादन खर्चही वाढत होता. खर्च कमी करण्यासाठी श्री. शिंदे यांचा प्रयत्न होता. या हेतूने कृषी प्रदर्शने व शेतकरी मेळाव्यांच्या माध्यमातून नवे काही करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

यादरम्यान जेऊरकुंभारी गावात कृषी सहायक म्हणून निर्मलाताई सोनवणे रुजू झाल्या. सेंद्रीय शेतीसंदर्भात त्यांचा अभ्यास पाहून निर्मलाताईंच्या मार्गदर्शनात सेंद्रीय शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांनी सेंद्रीय पद्धतीने कांदा लागवड करण्याचा निर्णय घेतला. शेतीची नांगरणी करून घेत, बायोडायनामिक पद्धतीने बनविलेले कंपोस्ट खत टाकले. एकरी दोन डेपो इतके प्रमाण ठेवण्यात आले. नंतर शेती सपाट करून व गादी वाफ्यावर रोपे तयार करून कांदा लागवड केली. मजुरांच्या मदतीने खुरपणी करून घेतली. तुषार संचाद्वारे १६ दिवसांतून एकदा ६ तास पाणी देण्यात आले. कांद्याची रोपवाटिका तयार करताना त्यावर कोणत्याही रासायनिक औषधांची फवारणी केली नाही. वाफ्यामध्ये पाण्याच्या सरीने जीवामृत देण्यात आले. नंतर खुरपणीमुळे रोपांची चांगली वाढ झाली असून ४५ दिवसांनी रोपे तयार झाली आहेत.

शेतीत नवनवे प्रयोग करताना संपूर्ण शिंदे परिवाराचा सहभाग असतो. बायोडायनामिक डेपो लावणे, दशपर्णीसाठी वनस्पती गोळा करणे, जीवामृत तयार करणे व रोपांवर प्रक्रिया करणे या सर्व कामांमध्ये कुटुंबातील सदस्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो.

## फवारणी आणि त्याचा परिणाम

फुलकिडीसाठी दशपर्णी अर्क व निमार्कची फवारणी केली. १२५ दिवसाच्या कालावधीत ५ ते ६ वेळा तुषार संचाने पाणी दिले व इतर कोणताही खर्च केला नाही. कांद्याची १२५ दिवसांनी काढणी केली, दरवर्षीच्या तुलनेत कांद्याची वाढ चांगली झाली. रोग व किडीचा प्रादुर्भाव कमी जाणवला तसेच कांद्याचा रंग गडद झाला. कांद्यासोबतच लसणाचीही लागवड केली, लसणाचा आकार मध्यम राहिला. मात्र रंग व चवीने लसूण काही औरच होता.

## शेतीशाळा

सेंद्रिय शेती करण्याचा निर्धार केलेल्या शिंदे यांनी दोन वर्षापूर्वी कृषी

विभाग व आत्मा यंत्रणेच्या मार्गदर्शनाखाली २० शेतकऱ्यांना सोबत घेत गावात साई समर्थ सेंद्रिय शेती गटाची स्थापना केली. सेंद्रिय शेती या विषयावर जेऊरकुंभारीच्या गावशिवारात दर शुक्रवारी सेंद्रिय शेती शाळा भरते. गावातील सहभागी प्रत्येक शेतकऱ्याने एक एकर क्षेत्रावर सेंद्रिय शेती करण्याचा निर्णय कृतीत उतरविला. गटप्रवर्तक म्हणून श्री. शिंदे यांच्याकडे समन्वयाची जबाबदारी आहे. प्रत्येक शेतकऱ्यांकडे आठवड्यातून एक दिवस सेंद्रिय शेती शाळा भरते. शेतीवरच बायोडायनामिक, कंपोस्ट बनवणे, जीवामृत, गांडुळखत, दशपर्णी अर्क, व्हर्मीवॉश व बिजामृत तयार करण्याबाबत प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन केले जाते. कृषी विभागाच्या विविध चर्चासत्रांसह मार्गदर्शन मेळाव्यात सहभाग घेणारे शिंदे यांची शेतकरी मित्र, शेती संघटक म्हणून कृषी विभागाने निवड केली आहे.

## चळवळ विस्तारली

जेऊरकुंभारी गावात कृषी विभागाच्या मार्गदर्शनाने सेंद्रिय शेतीची चळवळ विस्तारली आहे. शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे पटवून दिल्यामुळे सेंद्रिय शेतीबाबत शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढू लागला. सुरुवातीला २० शेतकरी सदस्य संख्या असलेल्या गटात आज ५० शेतकऱ्यांचा सहभाग आहे. तसेच परंपरागत सेंद्रिय शेती या कृषी विभागाच्या योजनेत शेतकऱ्यांनी प्रमाणीकरणासाठी नोंदणी केली आहे. सेंद्रिय शेतीमुळे उत्पन्न न घटता प्रत सुधारते. योग्य व्यवस्थापन केले तर खर्चात मोठी बचत होत असल्याचा अनुभव शिंदे सांगतात. या कामी त्यांना उपविभागीय कृषी अधिकाऱ्यापासून कृषी सहायकापर्यंत सर्वांनीच मार्गदर्शन केले.

## शेतीचे अर्थकारण

- शिंदे यांच्याकडे एकूण १८ एकर शेती आहे. यात चिकू ४ एकर २० गुंठे आहेत. चिकूची साडेचार एकराची बाग एका व्यापाऱ्याला दोन लाख ६० हजार रुपयांना देण्यात आली आहे. दरवर्षी यामध्ये वीस हजार रूपयांची वाढ करण्यात येते.
- ऊस दीड एकर असून यामध्ये एकरी ६० टनापर्यंत तर दीड एकरातून ९० टनापर्यंत उत्पादन होते, खर्च वजा जाता दीड लाख रुपयापर्यंत नफा मिळतो.
- कांदा लागवड दोन एकर २० गुंठे आहे, यात खर्च कमी करण्याचा प्रयत्न केल्याचे शिंदे सांगतात. एकरी १५० क्विंटल कांद्याचे उत्पादन त्यांनी घेतले आहे.
- गव्हाचे एकरी २२ क्विंटल उत्पादन झाले असून खर्च वजा जाता २० हजार रूपये निव्वळ नफा राहतो. यासोबतच सोयाबीन, हरभरा व लसूण पिकांचेही उत्पादन घेतले जाते.
- वर्षाकाठी शेतीत पाच ते सहा लाख रुपयांची उलाढाल होत असल्याचे शिंदे सांगतात. सेंद्रिय शेतीमुळे उत्पादन वाढ झाली नसली तरी खर्चात बचत करण्यात यश आले असून तोच आपला नफा असल्याचेही शिंदे सांगतात.


## सेंद्रिय शेतीची उपयुक्तता

- आरोग्यासाठी उपयुक्त अन्नासोबतच जमिनीची प्रत टिकवता येते.
- पाण्याचा गरजेएवढाच वापर व आच्छादनामुळे पिकांचे संरक्षण होते.
- बाजारपेठ उपलब्धीसोबतच शेतकरी गटाद्वारे इंटरनेटवर नोंदणी करून शेतीवरच विक्रीचा प्रयत्न करता येतो.

## शेतीपूरक व्यवसाय फायदेशीर

शेतीसोबतच पशुपालन, गावरान कोंबडीपालन यावरही त्यांनी भर दिला आहे. पशुपालनात चार जर्सी गायी व तीन कारवडी तर ३५ गावरान कोंबडी आहेत. दुभत्या दोन गायीचे २० लीटर दूध डेअरीला जाते. त्यापासून ५६० रुपये दररोज मिळतात. गावरान कोंबडी साधारणत: २० ते २५ अंडी देतात. त्यामधून विक्री व कोंबडीपालनाच्या विस्ताराला मदत केली जाते. त्यातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळते आहे.

चारसूत्री पद्धतीने गहू लागवडीचा यशस्वी प्रयोग शिंदे यांनी केला. गव्हाच्या जोडओळीतील अंतर ६ व मधील अंतर १२ इंच अशा पद्धतीने



गव्हाची पेरणी केली. यामध्ये गव्हाचे एकरी २२ क्विंटल उत्पादन मिळाले. ऊसामध्ये पट्टा पद्धतीचा अवलंब केला असून ऊसाची लागवड साडेचार फुटावर केली, त्यात ठिबकचा वापर केला. ऊसामध्ये आंतरपीक म्हणून कांदा तसेच ताग लागवड केली. ताग फुलोऱ्यात आल्यावर ऊसामध्ये रोवले. ऊसाची तोडणी झाल्यानंतर खोडवा राखताना पाचट न जाळता पाचटाची कुट्टी केली जाते.

सेंद्रिय शेतीमुळे रासायनिक खते, औषधे यावर होणाऱ्या खर्चात बचत झाली आहे. शेतीसाठी लागणारी अन्नद्रव्ये उपलब्ध झाल्याने आरोग्य, पाणी आणि जमीन निरोगी राहण्यास मदत होते. शेतीत पेरणी करताना बीजप्रक्रिया केली जाते. वीस वर्षापूर्वी ४ एकर २० गुंठे क्षेत्रात चिकूची लागवड केली असून चिकूची बाग बहरात आली आहे. जीवामृत, गांडुळखत तसेच शेणखत देण्यात येते. चिकू बागेसाठी सेंद्रिय खताचा वापर करण्यात येत असल्याने चिकूची चव, रंगामुळे मागणी वाढली आहे.

**– गणेश फुंदे**
माहिती सहायक, उप माहिती कार्यालय, शिर्डी

## माझी कन्या भाग्यश्री योजना




मुलींचा जन्मदर वाढवणे, लिंग निवडीस प्रतिबंध करणे, मुलींचे शिक्षण आरोग्याचा दर्जा वाढवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी राबवण्यात येणारी माझी कन्या भाग्यश्री योजना १ ऑगस्ट २०१७ पासून सुधारित स्वरूपात राबवण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न १५ लाखांपर्यंत आहे अशा कुटुंबांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

राज्यात १ एप्रिल २०१६ पासून माझी कन्या भाग्यश्री योजना राबविण्यात येत आहे. आता सुधारित योजना १५ लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या सर्व घटकातील कुटुंबांना लागू असणार आहे. या योजनेंतर्गत एका मुलीनंतर माता किंवा पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर शासनाकडून मुलीच्या नावे ५० हजार रुपये, तर दोन मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर दोन्ही मुलींच्या नावे प्रत्येकी २५ हजार रुपये बँकेत मुदत ठेव योजनेत गुंतवण्यात येईल. या मुदत ठेवीवरील व्याज मुलीला वयाच्या सहाव्या आणि बाराव्या वर्षी काढता येईल. तसेच मुद्दल आणि व्याज दोन्ही रक्कम वयाच्या १८ व्या वर्षी काढता येईल. माता किंवा पिता यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतरच ठेवीची रक्कम मुलीच्या नावावर जमा करण्यात येईल. जमा केलेल्या रक्कमेवर त्या वेळी मुलीच्या वयानुसार देय असणारी व्याजाची रक्कम तिला प्राप्त होऊ शकेल.

कुटुंबात पहिले व दुसरे अपत्य मुलगी असल्यास योजनेचा लाभ घेता येईल. मात्र तिसरे अपत्य जन्मल्यास त्यास योजनेचा लाभ मिळू शकणार नाही आणि पहिल्या दोन्ही अपत्यांचेही लाभ बंद होतील. मात्र दुसऱ्या प्रसूतीच्या वेळी जुळ्या मुली झाल्या तर त्या योजनेस पात्र असतील. बालगृहातील अनाथ मुलींसाठी ही योजना लागू असणार आहे. लाभार्थी मुलीचे वडील महाराष्ट्राचे मूळ रहिवासी असणे आवश्यक असेल. योजनेचा लाभ घेण्यासाठी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण असणे आणि दहावीची परीक्षा उत्तीर्ण होण्यासह वयाच्या १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत ती अविवाहित असणे आवश्यक आहे. एका मुलीच्या जन्मानंतर एक वर्षाच्या आत तर दोन मुलीनंतर ६ महिन्याच्या आत माता किंवा पिता यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबांनाच या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

योजनेंतर्गत लाभार्थी मुलगी व तिची आई यांच्या नावे संयुक्त बचत खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात येईल. त्यामुळे दोघींना एक लाख रुपयांचा अपघात विमा व ५ हजार रुपये ओव्हरड्राफ्ट व इतर लाभ प्राप्त होतील.

## मनोधैर्य योजनेच्या निकषांमध्ये बदल



मनोधैर्य योजनेची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्यासाठी बलात्कार, ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांचे पुनर्वसन व त्यांना अर्थसाहाय्य करण्यासाठी या योजनेच्या अर्थसाहाय्याच्या निकषात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या राज्यामध्ये राबवण्यात येत असलेल्या या योजनेच्या निकषांनुसार पीडित महिला व बालकांना अर्थसाहाय्य देताना क्षेत्रीय स्तरावर काही अडचणी येत होत्या. त्यामुळे या योजनेच्या निकषांमध्ये बदल करण्याची वारंवार होणारी मागणी लक्षात घेऊन मनोधैर्य योजनेच्या निकषांमध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या नवीन निकषानुसार घटनेचा परिणाम म्हणून महिला किंवा बालकास कायमचे मतिमंदत्व अथवा अपंगत्व आल्यास तसेच सामूहिक बलात्कारांच्या प्रकरणात गंभीर इजा झाल्यास किंवा ॲसिड हल्ल्यामध्ये चेहरा विद्रूप झाल्यास १० लाख रुपयांचे अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापैकी ७५ टक्के रक्कम १० वर्षासाठी पीडितांच्या नावाने बँकेत मुदत ठेव म्हणून तर २५ टक्के रकमेचा धनादेश पीडितांना तत्काळ देण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी या योजनेच्या निकषानुसार कमाल ३ लाख रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येत होते.

या योजनेच्या सध्याच्या निकषानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हा क्षती साहाय्य व पुनर्वसन मंडळास अर्थसाहाय्य मंजूर करण्याचे अधिकार आहेत. यामध्ये सुधारणा करून हे अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर २००९ पासूनच्या पात्र प्रकरणांना पूर्वलक्षी प्रभावाने ही योजना लागू करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच महाराष्ट्रात बळी पडलेल्या व्यक्तींकरिता गृह विभागाची नुकसान भरपाई योजना २०१४ व महिला व बाल विकास विभागाची मनोधैर्य योजना यामध्ये समन्वय ठेऊन एकाच पीडितास दोन्ही योजनेंतर्गत अर्थसाहाय्य दिले जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना



शेतकऱ्यांना माफक दरात व त्यांच्या सोयीनुसार वीज पुरवठा उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पारंपरिक विजेची मोठ्या प्रमाणात बचत होऊन तिचा वापर इतर कामांसाठी करण्यात येऊ शकेल. यामुळे महावितरण कंपनीच्या महसुलात वाढ होण्यासह

नोंदी

औद्योगिक ग्राहकांसाठी विजेचा दर कमी राखण्यास हातभार लागेल.

अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिद्धी आणि यवतमाळ जिल्ह्यातील कोळंबी या दोन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर सौर कृषी वाहिनी योजना महानिर्मिती कंपनीमार्फत राबविण्यात येणार आहे.

राज्याच्या ग्रामीण भागातील गावठाण व कृषी वाहिनीचे विलगीकरण करण्यात आलेल्या ठिकाणी कृषी वाहिनीचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यात येणार आहे ही योजना खाजगी किंवा सहकारी संस्थांमार्फत राबवण्यात येईल. राज्यातील शेतीसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व उपसा सिंचन योजनांना सौर कृषी वाहिनी प्रकल्पाद्वारे वीज पुरवठा करण्यासाठी महानिर्मिती कंपनीकडून प्रयत्न करण्यात येतील. राज्यामध्ये उर्जेच्या एकूण वापरापैकी कृषिक्षेत्रासाठी सुमारे ३० टक्के ऊर्जेचा वापर होतो. प्रामुख्याने या विजेचा वापर कृषिपंपास वीज पुरवठा करण्यासाठी होत असून त्यामधून महावितरण कंपनीस तोटा सहन करावा लागतो. परंतु, अशा परिस्थितीतदेखील शेतकऱ्यांना माफक दरात वीज उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने त्यासाठी महावितरण कंपनीस दरवर्षी शासनाकडून मोठ्या प्रमाणात अनुदान देण्यात येते. कृषी ग्राहकांसाठी वीज दर माफक ठेवण्यासाठी महावितरण कंपनीकडून वाणिज्यिक वाहिनी औद्योगिक वीज ग्राहकांसाठी क्रॉस सबसिडीच्या रूपाने अधिक वीज दर आकारण्यात येतो. या नवीन योजनेमुळे शेतकऱ्यांना कमी दरात वीज उपलब्ध होण्याबरोबरच औद्योगिक वीज ग्राहकांवरील भार कमी होण्यास मदत होणार आहे.

## मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना

मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी प्रती वर्ष ५० कोटी इतका निधी देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत शेतीमालाचे मूल्यवर्धन, उत्पादित अन्न पदार्थांच्या गुणवत्तेत वाढ, शेतमालाच्या काढणीनंतरचे नुकसान कमी करणे,



बाजारपेठेची निर्मिती यास प्रोत्साहन देण्यात येईल. ऊर्जा बचतीसाठीच्या प्रकल्पांचे आधुनिकीकरण, प्रक्रिया केलेल्या उत्पादनाची निर्यात आणि ग्रामीण भागातील लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन आदी बाबीसुद्धा या योजनेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित फलोत्पादने आणि खाद्यान्न व तेलबिया इत्यादी शेतमालासाठी अन्न प्रक्रिया प्रकल्प स्थापन करता येतील. फळे व भाजीपाल्यासारख्या नाशवंत शेतमाल प्रक्रियेच्या प्रकल्पांना योजनेमध्ये प्राधान्य देण्यात येईल. ही योजना २०१७-१८ पासून पाच वर्षांसाठी राबवण्यात येणार असून त्यानंतर योजनेच्या मूल्यमापन अहवालाच्या आधारावर ती पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

या योजनेमध्ये कृषी व अन्न प्रक्रिया प्रकल्पाच्या उभारणीसह अस्तित्वातील प्रकल्पांची गुणवत्ता वाढ व आधुनिकीकरण आणि शीत साखळी योजना तसेच मनुष्यबळ निर्मिती व विकास योजना हे तीन मुख्य घटक राहणार आहेत. या नवीन योजनेसाठी फळे व भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया उत्पादने इत्यादीवर आधारित अन्न प्रक्रिया प्रकल्प चालविणारे किंवा अशा प्रकारचे प्रकल्प स्थापन करू इच्छिणारे शासकीय-सार्वजनिक उद्योग, सक्षम शेतकरी उत्पादक कंपनी-गट, महिला स्वयंसहायता गट, खाजगी उद्योग क्षेत्र, ग्रामीण बेरोजगार युवक, सहकारी संस्था पात्र ठरतील. कारखाना, यंत्रे आणि प्रक्रिया प्रकल्पासाठी करावे लागणारे बांधकाम यासाठी येणाऱ्या खर्चाच्या ३० टक्के अनुदान या योजनेंतर्गत देण्यात येईल. या अनुदानाची कमाल मर्यादा ५० लाख रुपये आहे. प्रकल्पाला मंजूर करण्यात येणाऱ्या रकमेपेक्षा कर्जाची रक्कम किमान दीडपट असणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे केंद्र व राज्य संस्थांकडून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीसाठी प्रशिक्षण शुल्काच्या ५० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

योजनेवर सनियंत्रण व देखरेखीसाठी कृषी व फलोत्पादन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ राहणार आहे. या योजनेंतर्गत प्राप्त प्रकल्पांची छाननी करून त्यास मंजुरी देण्यासाठी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आयुक्तस्तरीय प्रकल्प मंजुरी समिती राहणार आहे.

## ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणणार



आगामी दोन वर्षात राज्यातील ऊस पिकाखालील ३ लाख ५ हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याच्या योजनेस मंजुरी देण्यात आली. या योजनेनुसार शेतकऱ्यांना दोन टक्के व्याज दराने प्रतिहेक्टरी ८५ हजार ४०० रुपयांच्या मर्यादेत कर्ज देण्यात येणार आहे. नाबार्डकडून दीर्घ मुदत कर्ज योजनेंतर्गत कर्ज घेऊन त्याचे शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना राज्य सहकारी शिखर बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या कर्ज साखळीतून कर्जाचे वितरण करण्यात येईल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रतिहेक्टरी ८५ हजार ४०० रुपयांच्या मर्यादेत सवलतीच्या दराने या कर्जाचे वाटप होईल.

यासाठी नाबार्डकडून राज्य सहकारी शिखर बँकेला ५.५० टक्के दराने कर्ज देण्यात येईल. त्यानंतर राज्य शिखर बँक ६ टक्के दराने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला कर्ज देईल, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शेतकऱ्यांना ७.२५ टक्के दराने कर्ज देणार आहे. या योजनेत शेतकऱ्यांच्या कर्जावरील वार्षिक व्याज ७.२५ (सव्वा सात) टक्के असेल. कर्जाचा नियमित भरणा केल्यानंतर ४ टक्के व्याज राज्य शासन, १.२५ टक्के व्याज साखर कारखाने आणि २ टक्के व्याज शेतकरी याप्रमाणे विभागून भरण्यात येईल. शासनाने उचलावयाच्या नियमित वार्षिक ४ टक्के व्याजाच्या भारापोटी २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीसाठी सहकार विभागामार्फत आर्थिक तरतूद करण्यात येईल. सहकारी साखर कारखान्यांसाठी असलेले व्याजाचे सव्वा टक्के दायित्व बंधनकारक आहे. व्याजाचे दायित्व स्वीकारण्यास तयार असणाऱ्या साखर कारखान्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे.

ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याची योजना ही राज्यातील सहकारी साखर कारखान्यांबरोबर खासगी साखर कारखान्यांसाठी लागू राहणार आहे. या योजनेंतर्गत नाबार्डकडून दीर्घ मुदतीचे कर्ज घेऊन शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नाबार्डकडून पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकत नसल्यास समर्पित सूक्ष्म सिंचन निधीमधून (Dedicated Micro Irrigation Fund) सहकारी बँकांमार्फत कर्ज घेण्यात येईल. या निधीमधून उपलब्ध होणाऱ्या कर्जाच्या व्याजाचे दर ५.५ टक्क्यांपेक्षा जास्त असतील तर व्याजाचा अतिरिक्त भार राज्य शासनाकडून उचलण्यात येईल. व्याजाचे दर कमी असतील तर त्याप्रमाणात शासनाचे दायित्व कमी होईल.

या योजनेनुसार पहिल्या टप्प्यात विहिरी, नद्या, नाले याद्वारे सिंचित होणारे क्षेत्र आणि सामूहिक उपसा सिंचनाद्वारे सिंचित होणाऱ्या क्षेत्राचा समावेश आहे. त्यानुसार २०१७-१८ मध्ये १ लाख ५० हजार हेक्टर तर २०१८-१९ मध्ये १ लाख ५५ हजार हेक्टर असे एकूण ३ लाख ५ हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यात येणार आहे. ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठीची ही योजना राबवण्यात येणाऱ्या भागामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत 'प्रतिथेंब अधिक पीक' या घटकाखालील केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना केवळ ऊस पिकासाठी बंद करण्यास देखील मान्यता देण्यात आली.

ऊस हे बारमाही बागायती नगदी पीक असून उसाच्या पूर्ण वाढीच्या कालावधीत २५ हजार घनमीटर प्रतिहेक्टर इतक्या पाण्याची आवश्यकता असते. ठिबक सिंचनाच्या वापराने प्रतिहेक्टर सुमारे साडेसात हजार ते साडेबारा हजार घनमीटर पाणी बचत शक्य आहे. राज्यात ऊस पिकाखालील सर्वसाधारण क्षेत्र ९ लाख ४२ हजार हेक्टर इतके आहे. यापैकी सुमारे २ लाख २५ हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आहे. अद्याप ७ लाख १८ हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यास वाव आहे. राज्यातील उपलब्ध पाणी साठ्यापैकी सुमारे ६० ते ७० टक्के पाणी सिंचनासाठी वापरण्यात येते. कमीत कमी पाण्याचा वापर करून जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी सूक्ष्म सिंचनाचे तंत्रज्ञान उपयुक्त आहे. तसेच त्याद्वारे खत, औषधे यांच्या खर्चात बचत होऊन उत्पादनात वाढ होऊ शकते.

राज्यात टेंभू उपसा योजना, भिमा (उजनी), मुळा, निम्नमाना, हतनूर, उर्ध्वपूस, कान्होळी नाला (नागपूर) आणि आंबोली (सिंधुदुर्ग) या पथदर्शक प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रातील बारमाही पिकांना सिंचनासाठी ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा जून-२०१८ पर्यंत अवलंब करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याच्या अनुभवाच्या आधारे हे निर्बंध राज्यातील अन्य प्रकल्पांवर लावण्याचा देखील विचार आहे.

## गटशेती करण्यासाठी योजना

राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी गटशेतीला प्रोत्साहन देण्यासह तिचे सबलीकरण करण्यात येणार आहे. यासाठी आखलेल्या पथदर्शी योजनेची २०१७-१८ आणि २०१८-१९ या दोन्ही वित्तीय वर्षात अंमलबजावणी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. यंदाच्या अर्थसंकल्पात याबाबत घोषणा करण्यात आली होती.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अथवा कंपनी नोंदणी अधिनियम १९५६ च्या तरतुदी अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी म्हणून शेतकरी गटाची नोंदणी करणे आवश्यक राहणार आहे. दोन वर्षात या योजनेंतर्गत प्रत्येक गटास जास्तीत जास्त एक कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. प्रतिवर्षी २०० शेतकरी गटांना त्यासाठी पात्र ठरवण्यात येणार आहे. पीक पद्धती व शेतीचा



प्रकार विचारात घेऊन गटशेतीसाठी आदर्श नमुना प्रकल्प (मॉडेल) तयार करण्यास तसेच त्यात पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग व रेशीम उद्योग आदी विभागांच्या आदर्श नमुना प्रकल्पाचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेत शेती अवजारे बँकेचा समावेश करण्यात येणार आहे.

गटातील सदस्यांची संख्या वाढण्यासह या सदस्यांचे एकूण क्षेत्र १०० एकरच्या पटीत वाढले तर वाढीव प्रत्येकी १०० एकरांसाठी प्रत्येकी एक कोटी रुपयांचे वाढीव अनुदान देय राहणार आहे. या योजनेंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या व पुरस्कारास पात्र ठरलेल्या शेतकरी गटांना प्रथम (२५ लाख) द्वितीय (१५ लाख) तृतीय (५ लाख) याप्रमाणे पारितोषिके देण्यात येणार आहेत.

एका समूहातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शिवारातील संलग्न भौगोलिक क्षेत्रामध्ये सामूहिक शेती करणे, शेती उत्पादनावर

नोंदी

प्रक्रिया व मूल्यवर्धन करणे, एकत्रित विपणनासाठी सामूहिक स्वरूपाची व्यवस्था निर्माण करणे, या सर्व माध्यमातून आपल्या गट समुहाचा विकास घडवून आणणे म्हणजे गट अथवा समूह शेती होय. लोकसंख्या वाढीमुळे शेतजमिनीचे सातत्याने विभाजन होत असून तिची धारण क्षमता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. २०१०-११ च्या अहवालानुसार महाराष्ट्रात १९७०-७१ मध्ये असलेली ४.२८ हेक्टरची धारण क्षमता कमी होत जावून ती २०१०-११ मध्ये १.४४ हेक्टर प्रतिखातेदार इतकी कमी झाली आहे. काही ठिकाणी तर ती ११ ते १५ गुंठे इतक्या कमी प्रमाणात आहे. अशा परिस्थितीत एवढ्या छोट्या क्षेत्रावर शेती करणे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत नसल्याचे आढळून आले आहे. या समस्येवर समूह शेती हा प्रभावी उपाय आहे.

समूह शेतीमुळे उच्च तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणाचा अवलंब करून शेती व्यवसाय सुकर होण्यास मदत होणार आहे. सामूहिकरीत्या शेतीमालाची विक्री केल्याने उत्पादन व वाहतूक खर्चात बचत होऊन फायदा वाढणार आहे. काही कृषी मालावर काढणी पश्चात प्रक्रिया करणे शक्य होणार असल्याने शेतमालास योग्य भाव मिळणे शक्य होऊ शकेल. समूह शेतीतून मोठ्या प्रमाणावर भांडवल व उत्पादन होणार असल्याने शेतीमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करणे शक्य होणार आहे. सामूहिक शेतीमुळे पशुपालन, रेशीम व्यवसाय, मत्स्यव्यवसाय, दुग्ध व्यवसाय, रोपवाटिका, मधुमक्षिका पालन आदी शेतीपूरक जोडधंदे करणे शक्य होऊन शेतकऱ्यांचे उत्पादन वाढणार आहे.

## ठिबक, तुषार सिंचनासाठी अनुदान



अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणारी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना' आणि अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या आदिवासी क्षेत्रांतर्गत किंवा क्षेत्राबाहेरील उपयोजना याअंतर्गत ठिबक सिंचनासाठी ५० हजार आणि तुषार सिंचनासाठी २५ हजाराच्या मर्यादेत एकूण ९० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेसंदर्भात कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने घेतलेल्या निर्णयांना मान्यता देण्यात आली. त्यानुसार देण्यात येणाऱ्या अनुदानाची रक्कम प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानास पूरक अनुदान म्हणून देण्यात येणार आहे. अनुसूचित जाती, नवबौद्ध आणि अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना ९० टक्क्यांच्या मर्यादेत अनुदान दिले जाईल.

अनुसूचित जाती, नवबौद्ध आणि अनुसूचित जमाती शेतकऱ्यांची प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत निवड न झालेल्या शेतकऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना किंवा आदिवासी उपयोजनेंतर्गत सूक्ष्म सिंचनासाठी अर्ज केल्यास त्यांना एकूण खर्चाच्या ९० टक्के किंवा ठिबक सिंचनासाठी ५० हजार आणि तुषार सिंचनासाठी २५ हजार यापैकी कमी असलेल्या रकमेचे अनुदान देण्यात येईल. अनुसूचित जाती, जमातीच्या लाभार्थ्यांसाठी या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानास पूरक अनुदान देण्यासाठी अवलंबावयाची सविस्तर कार्यपद्धती कृषी आयुक्तालयाकडून निश्चित करण्यात येईल. कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत एकूण खर्चाच्या टक्केवारीवर आधारित अनुदानाची पद्धत कायम ठेवण्यात येईल.

## सरपंचांची थेट निवड

राज्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचांची निवड थेट जनतेतून करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम-१९५८ मधील विविध कलमांमध्ये सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली. राज्यात निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांमधून सरपंचाची निवड करण्यात येते.

गुजरात आणि मध्य प्रदेशसारख्या राज्यांत मात्र सरपंचांची निवड थेट जनतेमधून करण्यात येते. राज्यातही अशा पद्धतीने सरपंचांची थेट निवड करता येईल काय, या शक्यतेचा अभ्यास करण्यासाठी द्विसदस्यीय अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार या गटाने दोन्ही राज्यांमध्ये असलेल्या निवडणूक पद्धतीचा अभ्यास करून आपला अहवाल शासनास सादर केला. या अहवालानुसार संबंधित ग्रामपंचायत अधिनियमात दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.



या निर्णयानुसार ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील मतदारांमधून गुप्त मतदानाने सरपंचाची निवड करण्यात येणार असून सरपंच हा या पंचायतीचा अध्यक्ष असेल. सरपंच पदासाठी किमान सातवी उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आली आहे. मात्र, ही अर्हता १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या व्यक्तीस लागू राहणार आहे. या प्रक्रियेतून निवडण्यात येणारे सरपंच पद पाच वर्षांच्या मुदतीसाठी राहील.

त्याचप्रमाणे अधिनियमातील विविध कलमांत करण्यात आलेल्या सुधारणांनुसार सरपंच किंवा उपसरपंच म्हणून निवडून आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षेपर्यंत व ग्रामपंचायतीचा कार्यकाल संपण्याच्या अगोदर सहा महिने कोणताही अविश्वास ठराव आणता येणार नाही. तसेच यादरम्यानच्या काळात जर अविश्वास ठराव फेटाळला गेल्यास त्यानंतर पुढील दोन वर्षे असा अविश्वास ठराव आणता येणार नाही. त्याचप्रमाणे पंचायतीशी विचारविनिमय करून ग्रामसभा सरपंचांच्या

अध्यक्षतेखाली एक किंवा अधिक ग्रामविकास समित्यांची स्थापना करणार आहे.

## कुक्कुट पालनाच्या विकासासाठी 'स्वयम् प्रकल्प'



आदिवासी कुटुंबांसाठी स्वयंरोजगार निर्मिती करण्याच्या उद्देशाने पुढील दोन वर्षांसाठी 'स्वयम् प्रकल्प' राबवण्यात येणार आहे. या योजनेंर्तगत ग्रामीण भागात परसातील कुक्कुट पालनास प्रोत्साहन दिले जाईल, तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांतील मुलांच्या आहारात अंड्यांचा पुरवठा केला जाईल.

स्वयम् प्रकल्प हा राज्यातील ठाणे, पालघर व रायगड (कोकण विभाग), पुणे (पुणे विभाग), नाशिक, अहमदनगर, नंदुरबार, जळगाव, धुळे (नाशिक विभाग), अमरावती व यवतमाळ (अमरावती विभाग), नागपूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर (नागपूर विभाग), नांदेड (लातूर विभाग) या १६ जिल्ह्यात राबवण्यात येणार आहे. या जिल्ह्यातील एकूण १०४ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रात प्रत्येकी एक युनिट याप्रमाणे १०४ खासगी पक्षी संगोपन केंद्रे (मदर युनिट) स्थापन करण्यात येणार आहेत. प्रत्येक युनिटला ४१७ लाभधारकांना संलग्न करण्यात येणार असून या प्रकल्पांतर्गत एकूण ४३ हजार ३६८ कुटुंबांना लाभ देण्यात येणार आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांतील मुलांच्या आहारात अंड्यांचा पुरवठा करून कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न या प्रकल्पाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

हा प्रकल्प राबवण्यासाठी आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग, पशुसंवर्धन विभाग, ग्रामविकास विभाग (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून गाळ-रेती काढण्याचे धोरण

जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या पाटबंधारे विकास महामंडळामार्फत मोठ्या धरणातील गाळ, गाळमिश्रित वाळू अथवा रेती काढण्यात येणार आहे. त्यामधून मिळणारा महसूल सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापनेच्या कामासाठी वापरण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. महसूल व वन विभागाने ९ सप्टेंबर २०१४ रोजी काढलेल्या शासन निर्णयात या निर्णयाच्या अनुषंगाने धोरणात्मक बदल करण्यासही मान्यता देण्यात आली.



राज्यातील सर्वच प्रकल्पांमध्ये गाळ, गाळमिश्रित वाळू अथवा रेती काढण्याचे धोरण न राबविता प्रथम पाच मोठ्या प्रकल्पांची निवड करून या धोरणानुसार त्यातील गाळ काढण्यात येणार आहे. या प्रक्रियेचा अनुभव घेऊन राज्यातील उर्वरित प्रकल्पातील गाळमिश्रित वाळू अथवा रेती काढण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात येणार आहे. धरणातील गाळ व गाळयुक्त रेती काढण्याच्या बदल्यामध्ये कंत्राटदाराने उपसलेल्या गाळमिश्रित रेतीमधून वाळू व रेती वेगळी करण्यात येणार आहे. त्यानंतर वाळू व रेतीच्या परिणामाएवढे स्वामित्व शुल्क महसूल विभागाकडे प्रचलित दराने भरून कंत्राटदारांना विकण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रायोगिक निवड केलेल्या पाचही प्रकल्पांतून गाळ व गाळ मिश्रित वाळू काढण्यासाठी एकाचवेळी प्रकल्पनिहाय ई-निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे. ई-निविदेची कार्यपद्धती, कंत्राटाच्या अटी, शर्ती व आवश्यक मार्गदर्शक सूचना शासन मान्यतेने पाटबंधारे विकास महामंडळ स्तरावरून निश्चित करण्यात येणार आहे. यासंदर्भातील निविदेचा कालावधी १५ वर्षांचा असेल. मात्र, शेतकऱ्यांना स्वत:च्या शेतात गाळ टाकण्यासाठी कोणतेही स्वामित्व शुल्क भरावे लागणार नाही. त्यांना केवळ स्वखर्चाने गाळाची वाहतूक करावी लागणार आहे. शेतकऱ्यांना गाळ मोफत मिळाल्यामुळे पडीक जमिनी सुपीक होण्यास मदत होईल. त्यातून शेतीच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ शक्य होईल.

या धोरणामुळे शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. पाटबंधारे प्रकल्पात वर्षानुवर्षे साचलेला गाळ, गाळयुक्त रेती काढल्यामुळे पाणीसाठा व सिंचनक्षमता पुनर्स्थापित होणार आहे. तसेच या प्रक्रियेतून मिळणाऱ्या निधीमधून पाटबंधारे प्रकल्पांची दुरुस्ती करता येणार आहे.

## गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र योजना

मुंबई शहर व उपनगर वगळता इतर ३४ जिल्ह्यांमध्ये भाकड गाई व गोवंश संगोपनासाठी गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र या नवीन योजनेस मान्यता देण्यात आली आहे. या योजनेनुसार गोशाळा किंवा पांजरपोळ चालविण्याचा अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यांमध्ये त्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

मार्च २०१५ पासून महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ लागू करण्यात आला आहे. त्यानुसार संपूर्ण गोवंशीय जनावरांच्या कत्तलीवर प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामुळे अनुत्पादक (भाकड)



गोवंशीय पशुधनाच्या संख्येत वाढ होणार असून त्याचा सांभाळ करावा लागणार आहे. त्यादृष्टीने मार्च २०१६ मध्ये जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र सुरू करण्याची घोषणा केली होती. या योजनेसाठी प्रत्येक जिल्ह्यास एक कोटी या प्रमाणे ३४ कोटींचे अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

## १७१ पाणीपुरवठा प्रकल्पांचे ई-भूमिपूजन



राज्याच्या विविध भागात मंजूर करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजना, हवामान केंद्र, साठवण टाक्या, पाणी शुद्धीकरण संयंत्र, पाणी तपासणी प्रयोगशाळा अशा पाणीपुरवठाविषयक विविध १७१ प्रकल्पांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एकाच वेळी मुंबई येथून ई-भूमिपूजन करण्यात आले. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे वर्षा निवासस्थानातून श्री. फडणवीस यांनी या सर्व प्रकल्पांचे एकाच वेळी ई-भूमिपूजन करून या कामांचा शुभारंभ केला. पिण्याचे शुद्ध पाणी हा नागरिकांचा मुलभूत हक्क आहे. ग्रामीण भागाला पिण्याचे शुद्ध पाणी देण्यासाठी शासन प्रयत्न करीत असून मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून १००३ नळपुरवठा योजना तसेच ८३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या पुनरुज्जीवनाचे काम हाती घेण्यात आले आहे. भूजल पातळी राखण्यासाठी तसेच ती वाढवण्यासाठी ॲक्विफर मॅपिंगसुद्धा करण्यात येणार असल्यामुळे भूजल पातळीचे निरीक्षण करता येईल व त्यानुसार भूजल साठ्याच्या वापराचे नियोजन करणे शक्य होऊ शकेल. ई-भूमिपूजन करण्यात आलेल्या सर्व १७१ पाणीप्रकल्पांची कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावीत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## वॉलमार्ट इंडिया यांच्यात सामंजस्य करार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्य शासनाच्या उद्योग विभाग आणि वॉलमार्ट इंडिया यांच्यात सामंजस्य करार संपन्न झाला. या करारानुसार वॉलमार्ट इंडिया येत्या काळात राज्यात १५ अतिरिक्त 'मॉडर्न होलसेल कॅश ॲण्ड कॅरी स्टोअर्स' सुरू करणार आहे. यासाठी ९०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. यामुळे ३० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.

## कृषी अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात

शेतमालाचे बाजारभाव तसेच शासकीय योजनांचे लाभ थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या संपूर्ण माहितीचा मास्टर डाटाबेस पणन विभागामार्फत तयार करण्यात येत आहे. या प्रकल्पात अधिकाधिक शेतकऱ्यांनी आपल्या माहितीचा तपशील कृषी उत्पन्न बाजार समितीत ऑनलाइन पद्धतीने नोंदवावा, असे आवाहन पणनमंत्री सुभाष देशमुख यांनी केले. शेतकऱ्यांना योग्य प्रकारे कृषीविषयक मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, शेतमालाचा बाजारातील अद्ययावत भाव, प्रमाण या विषयीची माहिती व्हावी तसेच शासनामार्फत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाची रक्कम



थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून या प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांचे संपूर्ण नाव, पत्ता, लागवडीखालील क्षेत्र, आधार क्रमांक, बँक खात्याचा तपशील, संपर्क क्रमांक इ. माहितीचे संकलन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्तरावर करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून कापूस पणन महासंघाकडे पूर्वीपासूनच असलेल्या शेतकऱ्यांच्या माहितीच्या तपशीलात भर घातली जाणार आहे. प्राथमिक स्तरावर हा प्रकल्प किमान आधारभूत योजनेंतर्गत कापूस खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाद्वारे राबवण्यात येणार असून कालांतराने इतर शेतमाल खरेदीसाठी सुद्धा राबवण्याचा प्रयत्न शासनामार्फत करण्यात येणार आहे.

## हागणदारीमुक्तीसाठी ९ ते १५ ऑगस्ट जनजागृती सप्ताह

हागणदारीमुक्तीकडे महाराष्ट्राने यशस्वी वाटचाल केली आहे. हागणदारी मुक्ती संदर्भात अधिक व्यापक जनजागृती करण्यासाठी येत्या '९ ऑगस्ट क्रांतिदिन ते १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन या उघड्यावर शौचविधीपासून स्वातंत्र्य,' या जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर यांनी दिली. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ९ ते१५ ऑगस्ट या संपूर्ण सप्ताहादरम्यान, 'खुले मे शौचसे आझादी' ही हागणदारीमुक्तीसाठी मोठी मोहीम सर्वत्र' राबवावी असा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्या धर्तीवर महाराष्ट्रातही त्यादरम्यान, हा सप्ताह आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सध्या हागणदारीमुक्त राज्यांमध्ये देशात पहिल्या क्रमांकावर आहे. मोठ्या प्रमाणावर जनजागृतीचा हा परिणाम असून लवकरच महाराष्ट्र पूर्णतः हागणदारी मुक्त होणार आहे. जनजागृती अधिक व्यापक स्वरूपात व्हावी, यासाठी या सप्ताहाचे



आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात रॅली, मानवी साखळी, विविध कार्यक्रम राबवले जाणार आहेत. उघड्यावर शौच टाळून शौचालयांचा वापर करण्यासाठी ग्रामस्थ, नागरिकांना प्रेरित केले जाणार आहे. संपूर्ण राज्यभर कार्यक्रमांचे आयोजन करून स्थानिक पातळ्यांवरही ख्यातनाम व्यक्तींना या मोहीमेत सहभागी करून मोठ्या प्रमाणावरील जनजागृती केली जाणार आहे. सर्वांनी या मोहिमेत सहभागी होऊन महाराष्ट्र हागणदारीमुक्त करण्यास योगदान द्यावे, असे आवाहन मंत्री श्री. लोणीकर यांनी केले आहे.

## चंद्रपुरात 'फोन'वर जिल्हाप्रशासन सोडवणार तक्रारी!

एक मोबाइल कॉल करा. प्रशासनातील अडचणीबाबतची तक्रारीची नोंदणी करा.. ३० दिवसात कोणतीही समस्या सुटेल. अन्यथा जिल्हाधिकारी आणि गरजेनुसार पालकमंत्री हस्तक्षेप करेल, अशी अभिनव, महाराष्ट्रातील पहिली हेल्पलाईन चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने सुरू केली आहे. राज्याचे वित्त, नियोजन, वनेमंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही सेवा चंद्रपूर जिल्ह्याला बहाल केली.

'हॅलो चांदा' असे या 'पालकमंत्री तक्रार निवारण यंत्रणेचे' नामकरण करण्यात आले आहे. अभिनव योजनांसाठी प्रसिद्ध असणारे वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हा पहिला प्रयोग त्यांचा गृह जिल्हा असणाऱ्या चंद्रपूरमध्ये केला आहे. या यंत्रणेवर १८००-२६६-४४०१ या टोल फ्री नंबरवर सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत तक्रार नोंदवता येणार आहेत. त्याचप्रमाणे www.hellochanda.in या पोर्टलवरही समस्या नोंदवता येणार आहेत.

## महाराष्ट्राला भारतीय कृषी संशोधन परिषदेचे पुरस्कार

परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यातील मनोली येथील प्रगतशील महिला शेतकरी सुनंदाबाई शिंदे आणि पालघर जिल्हयातील डहाणू येथील गोखले शिक्षण संस्थेच्या कृषी विज्ञान केंद्राला केंद्रीय कृषिमंत्री राधामोहन सिंह यांच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय कृषी विज्ञान संस्थेच्या ए.पी.शिंदे



सभागृहात भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या ८९ व्या वर्धापन दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या देशभरातील व्यक्ती व संस्थांना गौरवण्यात आले. वैयक्तिक गटात परभणी सुनंदाबाई शिंदे यांना 'जगजीवनराम अभिनव किसान पुरस्कार २०१६' प्रदान करण्यात आला. श्रीमती शिंदे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रयोग करून सोयाबीन, कपाशी आणि ज्वारी पिकांचे विक्रमी उत्पादन घेतले. श्रीमती शिंदे यांनी पाण्याची प्रभावीपणे साठवण करून जलसंधारण क्षेत्रातही उल्लेखनीय काम केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र आणि ५० हजार रूपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या वेळी देशभरातून विविध ११ विभागातील कृषी विज्ञान केंद्रांना उल्लेखनीय योगदानासाठी सन्मानित करण्यात आले. विभाग-८ मधून पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील गोखले शिक्षण संस्थेच्या कृषी विज्ञान केंद्राला कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी 'पं. दीनदयाल उपाध्याय राष्ट्रीय कृषी विज्ञान पुरस्कार २०१६-१७' ने सन्मानित करण्यात आले. गोखले शिक्षण संस्थेचे सचिव सर डॉ.एम.एस.गोसावी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.संभाजीराव नालकर आणि शास्त्रज्ञ विलास जाधव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सन्मानपत्र आणि २.२५ लाख रूपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी

शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आणि शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या मुलांना शिक्षणाची पुन्हा संधी मिळावी यासाठी महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या मंडळाकडून बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी पाचवी, आठवी, दहावी व इयत्ता १२ वी या वर्गासाठी परीक्षा घेण्यात येतील. यापूर्वी १० व १२ वी परीक्षा उत्तीर्ण न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांनाही मुक्त विद्यालयाचा लाभ होईल. या निर्णयामुळे अंदाजे पाच लाख मुलांची शिक्षणातून होणारी गळती थांबवण्यास साहाय्य होईल. राज्य मंडळाकडून गेली कित्येक वर्षे बहि:स्थ विद्यार्थी योजना म्हणजेच खासगी विद्यार्थी थेट परीक्षा योजना राबवण्यात येत आहे. या



योजनेत १७ क्रमांकाचा अर्ज भरून बाहेरील मुले १० वी परीक्षेस दाखल होतात. हे प्रमाण प्रतीवर्षी जवळपास एक ते दीड लाख विद्यार्थी इतके आहे. मात्र, विद्यार्थी अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण या योजनेत जास्त आहे. त्याचे कारण म्हणजे नियमित विद्यार्थ्यांसाठी जे विषय, अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके आहेत तीच बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी वापरण्यात येतात.

औपचारिक शिक्षणाला पूरक आणि समांतर अशी शिक्षण पद्धती सुरू करणे, शालेय शिक्षणातील गळती आणि नापासाचे प्रमाण कमी करणे, प्रौढ कामगार, प्रौढ आदिवासी, गिरिजन, गृहिणी या सर्वांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, जीवनाला उपयुक्त असे व्यवसायाभिमुख शिक्षण देणे, सुशिक्षित आणि जागरूक नागरिक बनवणे, स्थानिक स्तरावर शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे ही उद्दिष्टे ठेवून मुक्त विद्यालय मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थी सोयीनुसार अध्ययन करू शकतील. त्यांना लवचिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध होतील. ज्यामुळे विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यांकन होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

## ऊर्जा संवर्धन धोरणातून उत्पन्नवाढीसह रोजगार निर्मिती

ऊर्जा बचत, संवर्धन आणि ऊर्जा क्षेत्रात कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर ही मुख्य उद्दिष्टे ठेवून तयार करण्यात आलेले राज्य ऊर्जा संवर्धन धोरण - २०१७ राबवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. पुढील ५ वर्षात विविध क्षेत्रात हे धोरण राबवून ६ हजार ९७९ दशलक्ष युनिटस् म्हणजेच सुमारे १ हजार मेगावॅट ऊर्जेची बचत होणार आहे. राज्यासाठी स्वतंत्र ऊर्जा संवर्धन धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शासनाला कर स्वरूपात सुमारे १ हजार २०० कोटींचे उत्पन्न अपेक्षित असून विविध



क्षेत्रात नवीन रोजगाराच्या सुमारे ८ हजार संधी निर्माण होणार आहेत. राज्याच्या वाढत्या विकासाबरोबर ऊर्जेच्या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. ऊर्जा निर्मिती, वापर करतानाच पर्यावरण रक्षण व्हावे, ऊर्जा बचत व संवर्धनासाठी कार्यक्षम तंत्रज्ञानाचा उपयोग व्हावा, ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ ची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी इत्यादी उद्दिष्टे निश्चित करून महाराष्ट्र राज्य ऊर्जा संवर्धन धोरण २०१७ तयार करण्यात आले आहे.

## धानाच्या भरडाईसाठी प्रतिक्विंटल ३० रुपयांची वाढ

आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप व रब्बी पणन हंगामामधील (२०१६-१७) खरेदी केलेल्या धानाची भरडाई करण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रतिक्विंटल दहा रुपये भरडाई दराव्यतिरिक्त राज्य शासनाकडून तीस रुपये वाढीव भरडाई दर देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार धानाच्या भरडाईसाठी मिलर्सना क्विंटलमागे ४० रुपये मिळणार आहेत.

आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासन विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करते. शेतकऱ्यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने धान्य विकावे लागू नये यासाठी शासन धान्याची आधारभूत किंमतीने खरेदी करते. या योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धानाची भरडाई मिलर्सकडून करून घेऊन मिळणारा तांदूळ भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यात येत होता. चालू हंगामापासून हा सीएमआर गिरणीमालकांमार्फत शासकीय गोदामात जमा करण्यात येत आहे. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेसाठी येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनातर्फे भारतीय अन्न महामंडळाच्या मार्फत करण्यात येते. धान भरडाईकरिता कच्च्या तांदळासाठी दहा रुपये व उकडा तांदळासाठी वीस रुपये प्रति क्विंटल असा दर देण्यात येत आहे. केंद्र शासनाने या दरात २००५-०६ पासून सुधारणा केलेली नाही. त्यामुळे गेल्या वर्षीच्या खरीप पणन हंगामाकरिता (२०१५-१६) केंद्र शासनाकडून निश्चित केलेल्या दहा रुपये प्रति क्विंटल दराव्यतिरिक्त राज्य शासनाकडून भरडाई दरात प्रति क्विंटल तीस रुपये वाढ करण्यात आली होती. भरडाई दर वाढविल्याने त्यावर्षी एकूण धान खरेदीच्या ९६.६७ टक्के धानाची भरडाई



झाली आहे. भरडाईविना शिल्लक राहत असलेल्या धानाची भरडाई पूर्ण होणे गरजेचे असल्यामुळे भरडाईचे वाढीव दर निश्चित करणे गरजेचे होते. भरडाईअभावी धानाची नासाडी टाळणे, तसेच दीर्घकाळ साठवणुकीच्या खर्चाचा भार टाळण्यासाठी राज्य शासनाने यावर्षीच्या हंगामासाठीही केंद्र शासनाच्या मंजूर दराव्यतिरिक्त तीस रुपये प्रतिक्विंटल असा वाढीव दर जाहीर केला आहे.

# स्ट्रॉबेरी पंडित





गणपत पारटे आणि त्यांची स्ट्रॉबेरी बाग

महाबळेश्वरला गेलेल्या पर्यटकाने स्ट्रॉबेरी चाखली नाही हे अपवादानेच घडते. वाईचा घाट ओलांडून पाचगणीच्या जवळपास आल्यास जून जुलैमध्ये ढगांच्या करामती आणि हिरवाईने भरून गेलेल्या दऱ्या, झिंगलेल्या माणसाची झोप उडवणाऱ्या आणि नवचैतन्य पेरणाऱ्या ठरतात. मोठमोठी पॉली हाऊस लक्ष वेधून घेतात. मागील पाच एक वर्षापासून शासनाच्या मदतीने स्ट्रॉबेरीच्या रोपांसाठी हे पॉली हाऊस शेतकऱ्यांनी उभी केली आहेत. एका पॉली हाऊससाठी कृषी विभागाकडून २ लाख १० हजार एवढे अनुदान प्राप्त झाले असून, आता पणन मंडळाच्या मदतीने परदेशातून रोपांची निर्यात केली जाते.

एकेकाळी प्रचंड थंडीमुळे या रोपांची वाढ खाली वाई परिसरात करावी लागायची. ती रोपे वाढली की त्यांची वाहतूक करून शेतात लावावी लागायची. यात वाया जाणारे मानवी तास, रोजगार आणि मनस्ताप मोठ्या प्रमाणावर व्हायचा. हे सगळे या पॉलीहाऊसमुळे वाचल्याचे भिलार गावचे गणपत पारटे सांगतात. गणपत पारटे हे उच्च शिक्षित शेतकरी असून या भागातील स्ट्रॉबेरी लागवडीला चळवळीच रूप देणाऱ्या आणि वेगवेगळे प्रयोग करून स्ट्रॉबेरीची शेती प्रचंड फायद्यात आणणाऱ्या शेतकऱ्यांपैकी ते एक आहेत. म्हणून त्यांना नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासनाचा उद्यान पंडित हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे.

### नवीन प्रयोग

सन १९९०-९२ मध्ये गोदरेज कंपनीने स्ट्रॉबेरीचे देशी रोपे या भागात विक्रीसाठी आणले होते. त्याची किंमत प्रती रोप १७.५० रुपये होती. त्यावेळी परदेशी कंपन्यांच्या रोपांची किंमत २४.५० रुपये होती. गोदरेज कंपनीची देशी रोपटे स्वस्त असूनही कुणी घेतली नाही. त्याला श्री. पारटे हे अपवाद ठरले. त्यांनी मात्र गोदरेज कंपनीची रोपटे घेतली. ही रोपटे घेऊन त्यांनी शेतीत काही प्रयोग करायला सुरुवात केली. त्यातून त्यांचे दहापटीने उत्पन्न वाढले.

कृषी विभागाच्या प्रयत्नातून १०० टक्के ड्रीप झाल्याने पाण्याचे नियोजनबद्ध वितरण झाले. त्यातून उत्पन्नवाढीला चालना मिळाली. पूर्वी एकरी फक्त दोन टनावर होणारे उत्पन्न आता सहा टनापर्यंत गेल्याचे श्री. पारटे सांगतात. स्ट्रॉबेरीचे दर कोणताही आडत्या किंवा दलाल ठरवत नाही तर शेतकरी ठरवतो. पहिल्या आणि दुसऱ्या प्रतवारीची स्ट्रॉबेरी मार्केटला जाते तर तिसऱ्या प्रतवारीची स्ट्रॉबेरी फळ प्रक्रिया करणाऱ्या कंपन्या शेतात येऊन ठरवलेल्या भावात घेऊन जातात. हे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर कुठलाही आविर्भाव नव्हता. आम्ही उत्पादक आहोत, आमच्या उत्पादनाचा भाव काय राहावा हे आम्हीच ठरवायला हवे. लेकरागत त्याची काळजी घेऊन आम्ही एक-एक रोप वाढवतो, रोपटे बघून आम्हाला त्याला पालाश कमी आहे की अजून कुठले सत्त्व हे कळते. त्या प्रमाणे अगदी ग्रॅमने मोजून आम्ही ते अन्नद्रव्य रोपांना देतो. त्यामुळे त्याचे सर्व प्रकारचे स्वामित्व आमचेच असायला हवे. आम्ही एकमेकांना मदत करून उभे राहिलो आहोत. आता आम्ही ६० शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेतीचा गट तयार केला असून पूर्ण सेंद्रीय उत्पन्न आम्ही काढायला सुरुवात केली आहे. स्थानिक मार्केटचीच गरज आम्ही पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे परदेशात निर्यात करण्याचा प्रश्नच नाही हे ते मोठ्या आत्मविश्वासाने सांगतात.

राज्यातील शेतकऱ्यांनी नवनवे प्रयोग करून भौगोलिक स्थितीनुसार नियोजनबद्ध शेती करावी त्यातून चांगले दिवस येऊ शकतात; हे अनुभवाचे बोल ते सांगतात. स्ट्रॉबेरी लागवड आणि उत्पादनाचे आता ते देशभरातील या क्षेत्रातील तज्ज्ञांचे, विद्यार्थ्यांचे ट्यूटर झाले आहेत. पुस्तकाचे गाव भिलार ही नवी ओळख झालेल्या गावात हे स्ट्रॉबेरीवर प्रेम करणारे गणपतराव पारटेराहतात. उत्सुकता म्हणून या व्यक्तीला भेटल्यास स्ट्रॉबेरीचा फ्लेवर लक्षात येईल . !!

**- युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

# वाटा प्रगतीच्या...



**सामाजिक न्याय विभागांतर्गत दारिद्र्यरेषेखालील मातंग समाजातील नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत विविध योजना राबवण्यात येतात. या महामंडळाची स्थापना ११ जुलै १९८५ रोजी झाली आहे.**

मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी साहाय्य करणे व तंतु कामाच्या व्यवसायात गुंतलेल्या समाजाला आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मातंग समाजाच्या फायद्यासाठी व कल्याणासाठी लघुउद्योग, इमारत बांधकाम, वाहतूक आणि (वैद्यकीय, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र इत्यादीसारखा) इतर धंदा, व्यवसाय, व्यापार किंवा कार्य चालू करण्यासाठी भांडवल, कर्ज मिळण्याचे साधन, साधनसामग्री आणि तांत्रिक व्यवस्थापकीय साहाय्य देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

## विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य योजना

प्रकल्प मर्यादा रुपये ५०,००० पर्यंत गुंतवणूक असलेल्या प्रकरणांमध्ये महामंडळाकडून अनुदान देण्यात येते. प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा रुपये १०,००० यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येते. अनुदान वगळून बाकीची सर्व रक्कम बँकेकडून कर्जातून उपलब्ध करता येते. कर्जाच्या रक्कमेवर दराप्रमाणे व्याज आकारणी होते. कर्ज फेड ३६ ते ६० मासिक हप्त्यात बँकेकडे करावी लागते. प्रशिक्षण योजनेंतर्गत तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या खासगी, शासनमान्य संस्थांना प्रशिक्षणार्थी शुल्क व फी व्यतिरिक्त विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणाचा कालावधी सहा ते बारा महिन्यांचा असतो.

## बीजभांडवल योजना

प्रकल्प मर्यादा रुपये ५०,००१ ते ५,००,००० पर्यंतच्या मंजूर कर्ज प्रकरणांमध्ये रुपये १०,००० अनुदान वगळता उर्वरित कर्जामध्ये ५ टक्के अर्जदाराचा सहभाग आवश्यक असून महामंडळातर्फे २० टक्के कर्ज (रुपये १०,००० अनुदानासह) दिले जाते व उर्वरित ७५ टक्के कर्ज बँकेचे असते. महामंडळाचे कर्ज द.सा.द.शे. ४ टक्के व्याजासह महामंडळाकडे परतफेड करावयाचे असते.

## अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना

मातंग समाजातील इ.१० वी, १२ वी, पदवी व पदविका, अभियांत्रिकी व वैद्यकीय परीक्षेत कमीत कमी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी व विद्यार्थीनी यांची जिल्हानिहाय गुणवत्तेनुसार निवड केली जाते व उपलब्ध निधीच्या मर्यादेत शिष्यवृत्ती एकदाच प्रोत्साहनपर दिली जाते. १० वीसाठी रुपये १०००, १२ वीसाठी रुपये १५००/-, पदवी व पदविकासाठी रुपये २०००/-, अभियांत्रिकी व वैद्यकीयसाठी रुपये २५००/- शिष्यवृत्ती दिली जाते.

## राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळ (एनएसएफडीसी)

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळ मर्यादित, दिल्ली यांच्यामार्फत मुदत कर्ज योजना, महिला किसान योजना, लघुऋण वित्त योजना, महिला समृद्धी योजना तसेच शैक्षणिक कर्ज योजनादेखील राबवली जाते. अर्जदारास कर्जफेडीपूर्वी मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास कर्जाच्या परतफेडीची हमी म्हणून उतरवण्यात येणारा विमा पॉलिसी हप्ता, परदेशात शिक्षण घेताना येणारा प्रवास खर्च व शिक्षणाच्या कालावधीसाठी येणाऱ्या खर्चाची तरतूदही या कर्जामध्ये केली जाते. व्यावसायिक / तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांना देशातील व परदेशातील शासनमान्य व अधिकृत संस्थामार्फत शिक्षण घेण्यास कर्ज दिले जाते. **अभ्यासक्रम:** देश - रक्कम रु. ७.५० लाख, परदेश - रक्कम रु.१५.०० लाख, एनएसएफडीसीमार्फत देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी एकूण शैक्षणिक फीच्या ९० टक्के प्रतिवर्षी व परदेशातील अभ्यासक्रमासाठी रक्कम रु.३.७५ लाख प्रतिवर्षी प्रमाणे सरासरी ४ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी एनएसएफडीसीतर्फे कर्ज दिले जाते. या कर्ज रकमेवर ५ टक्के व महिलांना ४ टक्के व्याजदर आकारण्यात येतो.

## प्रमुख अटी

महाराष्ट्र रहिवासी, वय १८ वर्षे पूर्ण, मातंग समाजाच्या १२ पोटजातीपैकी एक, कुटुंबाचे उत्पन्न रु.१,००,००० पेक्षा जास्त नसावे. निवडलेल्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव, कोणत्याही शासकीय उपक्रमाकडून आर्थिक लाभ घेतलेला नसावा. **अधिक माहितीसाठी संकेतस्थळ :** https://sjsa.maharashtra.gov.in

**संकलन: भारती वाघ**
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# असे वापरा ॲप्स

सायबर महागुरू

**आजच्या धावपळीच्या युगामध्ये प्रत्येकाच्या हाती स्मार्ट फोन असतो. या फोनमध्ये असणारे विविध ॲप्स वापरताना काळजी घेणे आवश्यक ठरते. कोणते ॲप आपल्या फोनमध्ये असावे याची माहिती करून घेणे उपयुक्त ठरू शकते. फोनच्या सुरक्षिततेसाठी असणारे ॲन्टीव्हायरस ॲप असणे जास्त गरजेचे आहे.**

मोबाइल वापरणाऱ्यांची संख्या जशी वाढत आहे तसेच त्यात साठवला जाणारा डेटाही वाढत आहे. प्रत्येक सेकंदाला तयार होणारा डेटा आणि त्याची होणारी देवाणघेवाण, ह्याला सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी ही सर्वस्वी आपली आहे. तसं पहिले तर आपण नेहमीच इलेक्ट्रोनिक साधने, उपकरणांनी घेरलेले असतो. तंत्रज्ञान आपला वेळ वाचवतो आणि क्लिष्ट गोष्टी सोप्या करतो म्हणूनच तंत्रज्ञानाचा वापर हा रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. आपल्या जवळ सतत आणि सर्वात जास्त बाळगले जाणारे उपकरण म्हणजे मोबाइल. मोबाइल हा एक लहान संगणक आहे. आपला संगणक करू शकेल अशा सर्व बाबी मोबाइल फोन करतो. जसे संगणक सॉफ्टवेअर असतात तसेच मोबाइल मध्ये आपण ॲप्लीकेशन वापरतो. विविध प्रकारच्या ॲप्लीकेशनचा दररोज आपण वापर करत असतो, पण ही ॲप्लिकेशन आपल्या मोबाइलसाठी, त्यातील महत्त्वाच्या डेटासाठी सुरक्षित आहेत का याचा विचार तुम्ही करता का?



नवनवीन ॲप्लिकेशन दररोज तयार होत असतात. आपण युजर विचार न करता डाउनलोड करत असतो. बरीचशी ॲप अशी असतात ज्यांना वापरताना आपण आपल्या नावाचा, ईमेल आय.डी.चा आपल्या फोटोचा आणि वैयक्तिक माहितीचा वापर करत असतो, उदा. बँकिंग ॲप, गेमिंग ॲप, जी.पी.एस. ॲप इत्यादी. सरसकट सर्व ॲप हे असुरक्षित असतात अस म्हणण चुकीचे ठरेल. ॲंटीव्हायरससारखे ॲप आपल्या मोबाइलमध्ये असणे गरजेचे असते. माझ्या मते हल्ली ७५ टक्के डेटा हा युजरच्या मोबाइल मध्ये असतो त्यामुळे नक्की कुठले ॲप डाउनलोड करावे आणि कुठले करू नये याबाबत आता विचार करण्याची वेळ आली आहे.

### तीन प्रकार

मोबाइल ॲप्लीकेशन मुख्यत: तीन प्रकारात मोडतात, ते खालील प्रमाणे आहेत,

**नेटिव्ह ॲप** – या प्रकारातील मोबाइल ॲप हे एकाच कुठल्यातरी मोबाइल ऑपरेटिंग सिस्टमसाठी तयार केली जाते. उदा. विंडोज ऑपरेटिंग सिस्टमसाठी तयार केलेले ॲप हे एंड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमवर वापरू शकत नाही.

**हायब्रीड ॲप** – यातील ॲप ही वेब तंत्रज्ञानाचा वापर करून बनवले जातात. हे हायब्रीड ॲप खरे तर नेटिव्ह ॲपच्या बुरख्याआडची वेब ॲप्लिकेशन असतात.

**वेब ॲप** – ही सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन असतात जी बेब ॲप्लिकेशनसारखी मोबाइलवर उपलब्ध असतात.

पुढे ॲपचे वर्गीकरण गेमिंग ॲप, बिजनेस ॲप, शैक्षणिक ॲप, लाइफस्टाइल ॲप, युटिलिटी ॲप, ट्रॅव्हल ॲप, एंटरटेनमेंट ॲप अशा प्रकारात होते. विविध पर्यायांचे ॲप मोबाइल युजरसाठी उपलब्ध असतात. सर्वात जास्त गेमिंग ॲपचे डाउनलोड केले जाते. मुळातच ॲप ही आपल्या सोयीसाठी केलेली असतात. आपण सुविधेसाठी जी ॲप असतात ती डाउनलोड केली पाहिजे पण तसे न होता युजरचा कल हा मनोरंजनात्मक आणि गेमिंग ॲप डाउनलोड करण्यात असतो. हे खरे आहे की प्रत्येकाच्या गरजेनुसार आणि आवडीनुसार तुम्ही कुठलेही ॲप डाउनलोड करू शकता. परंतु आपल्या डेटाच्या दृष्टीने ते किती सुरक्षित आहे याचाही विचार व्हायला पाहिजे.

### ॲप डाउनलोड करताना अशी काळजी घ्या...

- एखादे ॲप शोधल्यानंतर त्याचे अनेक पर्याय दिले जातात,

निवडलेल्या ॲपचा सोर्स चेक करूनच तो डाउनलोड करावा.

- सततचे सायबर फ्रॉड होत असतात, ते कुठल्याही माध्यमातून होतात कारण त्यांचे ध्येय पैसे लाटणे किंवा आपली गोपनीय माहिती लाटणे यापैकी काहीही असू शकते.त्यामुळे मोबाइल बँकिंग सारखे ॲप डाउनलोड करताना ते अचूक सोर्सकडून असल्याची खात्री करून घ्यावी. शक्यतो मोबाइल बँकिंग करू नये.
- ॲप डाउनलोड करताना ते आपल्याला आपला डेटा अथवा अन्य काही गोष्टी जसे फोटो , व्हिडिओ हे वापरण्याची परवानगी मागतात. आपण न विचार करता एक क्लिक करून मान्यता देतो, मान्यता देण्याआधी त्या परवानगी कशाबद्दल आहे हे तपासून पहा.
- आपल्या फोन मधील डेटा हा महत्त्वपूर्ण असतो त्यात आपल्याबरोबर इतरांची नावे, फोटो, संपर्क क्रमांक आदीची माहिती असते, त्यामुळे चुकीचे ॲप डाउनलोड केले तर, आपल्याबरोबर इतरांचीही माहिती लीक होण्याची शक्यता असते.
- प्रत्येक एक ॲप फक्त आपला डेटा चोरण्यासाठी असतो असे नाही, काहींचा उद्देश हा मोफत जाहिरात पाठवणे तसेच काही उपद्रवी लिंक अथवा व्हायरस पाठवण्याचाही असतो
- कधी कधी एखादा ॲप डाउनलोड केल्यानंतर अचानकपणे मोबाइल मधील दुसऱ्या एखाद्या डाउनलोड केलेल्या ॲप मध्ये किंवा मोबाइलच्या सेटिंग्जमध्ये नकळत बदल होतात किंवा निकामी होतात. हा चुकीचा ॲप डाउनलोड केल्याचा परिणाम असू शकतो.
- कुठलेही ॲप आपण सुरक्षित असल्याची खात्री देऊ शकत नाही त्यामुळे कुठल्या ॲपची किती गरज आहे याचा निर्णय आपणच घेतला पाहिजे. मला विचाराल तर कुठलीही नवीन गोष्ट तुमच्या मोबाइलमध्ये घालत असाल तर त्याच्या परिणामांची तयारी ठेवा.
- जर ॲप वापरण्याचा आनंद घ्यायचा असेल तर थोडी काळजी घेऊन आपण त्याचा आनंद घेऊ शकतो, जसे कुठलेही मालवेअर अथवा व्हायरस जुनी ऑपरेटिंग सिस्टम असेल तर अधिक सशक्तपणे हल्ला किंवा उपद्रव करू शकतो त्यामुळे आपली मोबाइलची ऑपरेटिंग सिस्टम नेहमी अपडेटेड ठेवावी.
- मोबाइल ॲप १००% कधी सुरक्षित नसल्यामुळे आपण एखादे ॲप वापरून जर त्याचा त्रास वा उपद्रव अनुभवला असेल तर त्याचा तसा रिपोर्ट त्या ॲपला देऊ शकतो किंवा युजर फोरमवरही अभिप्राय देऊ शकतो.
- आपल्या मोबाइल फोनच्या डेटाचा बॅकअप नेहमी घेऊन ठेवावा, मुख्यकरून वैयक्तिक फोटो आणि व्हिडीओ मोबाइल डेटा ठेवू नये.
- आपल्या मोबाइलमध्ये ॲप्लिकेशन असतील तर रात्री झोपताना किंवा मोबाइलचा वापर करत नसताना इंटरनेटचे डेटा कनेक्शन बंद करून ठेवावे.
- ॲप्लिकेशनचा वापर जरूर करावा परंतु वरील गोष्टींची काळजी घेऊन.

**- ॲड. प्रशांत माळी**
सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ

## शोधनिबंधासाठी आवाहन

भारतीय राज्य घटनेतील ७३ व ७४ व्या दुरुस्तीला २५ वर्षे होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. ही परिषद १४ ते १६ सप्टेंबर २०१७ या कालावधीत होईल. त्यासाठी संशोधकांनी १५ ऑगस्ट २०१७ पर्यंत शोधनिबंध पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. **निबंधाचे विषय –** *भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे विकासाच्या दृष्टीने मार्गक्रमण, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात प्रश्न, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची वैशिष्ट्ये, आदर्श शहरे आणि गावांच्या यशोगाथा, भारतातील आणि परदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या अनुभवांची देवाण-घेवाण, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचा सहभाग, आदर्श गाव, शहर व त्यांच्या यशोगाथा, प्रसारमाध्यमे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका.* मूळ शोधनिबंधच पाठवणे आवश्यक. **शब्दमर्यादा:** ८ हजार शब्द, त्यात शीर्षक, सारांश, कळीचे शब्द (Keywords) ई-मेल आयडीसह लेखकांचे संपूर्ण नाव आवश्यक. सॉफ्टकॉपी ए-फोर आकारात व मांडणी २१ बाय २९.७ सेंटीमीटर्स असावी. **कालमर्यादा:** १५ ऑगस्ट २०१७. **पत्ता:** conferenceseptember2017@gmail.com **संपर्क:** www.localdemocracy2017.com

**- जगदीश मोरे**
जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग

## वार्षिक वर्गणी

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, **नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२** या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्च अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी**
http://dgipr.maharashtra.gov.in

## प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२**

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# यशाचा मास्टरस्ट्रोक



**डॉ. विजय राठोड**
भा.प्र.से. (२०१४, रँक ८४)

**आपल्या क्षमतांना कुठल्या क्षेत्रात अधिक न्याय देऊ शकतो याचा सतत विचार करायला हवा. यातूनच अधिकारी मन घडत जाते. आपल्या कामातून जर मोठ्या प्रमाणावर लोकांच्या जीवनमानावर चांगला परिणाम व्हावा असे वाटत असेल तर प्रशासकीय सेवेसारखा दुसरा मार्ग नाही. हाच मार्ग डॉ. विजय राठोड यांनीदेखील निवडला. एमबीबीएसनंतर वैद्यकीय श्रेत्रात चांगली संधी असताना त्यांनी प्रशासकीय सेवेत येण्याचा निर्णय घेतला आणि तो सिद्धही करून दाखवला. वैद्यकीय सेवा करत वेळेचे नियोजन करून त्यांनी यूपीएससीची परीक्षा दिली. पहिल्याच प्रयत्नात मुलाखतीपर्यंत मजल मारली. दोन प्रयत्नात अपयश आले तरी चुकांतून शिकत त्यांनी तिसऱ्या प्रयत्नात ८४ रँकसह यशाला गवसणी घातली. ते सध्या मेळघाटात धारणी येथे प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. अपयशाकडून यशाकडची त्यांची वाटचाल इतरांसाठी प्रेरणादायी आहे...**

संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी अभ्यासक्रमाची व्याप्ती खूप मोठी असते. त्यामुळे या परीक्षेत यशस्वी होण्याचे प्रमाण खूप कमी आहे. परंतु परिश्रम घेण्याची तयारी आणि 'मी संबंधित परीक्षा का देत आहे' या प्रश्नाचे उत्तर आपणाकडे असेल तर या परीक्षेत यशस्वी होणे सहज शक्य आहे. प्रेरक व तयारीसाठी पेटून उठवणारी भाषणे कितीही ऐकली तरी त्यांचा प्रभाव आपल्यावर अधिक काळ राहत नाही. त्यामुळे या परीक्षेची तयारी करत असताना स्वयंप्रेरित असणे आवश्यक असते. प्रामाणिकपणे परिश्रम घेऊन आणि वेळेचे नियोजन करत सूत्रबद्ध अभ्यास केल्यास यश मिळवणे सोपे जाते. अभ्यासक्रमाची व्याप्ती लक्षात घेऊन त्याप्रमाणे अभ्यास करायला हवा.

## टर्निंग पॉइंट

माझे मूळ गाव ठाकरवाडी तांडा (ता. गेवराई, जि. बीड). वडील पोलीस कॉन्स्टेबल. जनसामान्यांप्रमाणे आपल्याही मुलाने डॉक्टर व्हावे अशी त्यांची इच्छा. त्याप्रमाणे पुणे येथील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी प्रवेश मिळाला. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर इंटर्नशिपदरम्यान मैत्री संस्था व महाविद्यालयांतर्गत आयोजित मेळघाटातील १० दिवसांच्या आरोग्य शिबिरात वैद्यकीय सेवा देण्याची संधी मला मिळाली. मेळघाटसारख्या दुर्गम भागात नागरिकांना आरोग्यासोबतच इतरही अनेक अडचणींचा सामना कसा करावा लागतो याचा साक्षात्कार मला त्या १० दिवसांत झाला. तेव्हा जाणवले की यांच्या समस्यांचा विचार करता आपण केवळ वैद्यकीय सेवेपुरतेच मर्यादित आहोत. अशा भागात सुधारणा करायची असेल तर गरज आहे चांगल्या प्रशासकाची. मागासलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासन हा महत्त्वपूर्ण दुवा असल्याचे पटले. शिवाय वडलांच्या सान्निध्यामुळे अधिकारी कसे काम करतात, त्यांचे निर्णय, कार्यामुळे सामान्यांच्या जीवनात कसा प्रत्यक्ष फरक पडतो याची मला थोडी माहिती होती. प्रशासकीय सेवेबद्दल जिज्ञासा व आकर्षण लहानपणापासूनच होते. त्यामुळे वैद्यकीय सेवेपेक्षा आपण आपल्या क्षमतांचा वापर प्रशासकीय अधिकारी होऊन वंचितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी करावा अशी खूणगाठ मी या दहा दिवसात बांधली. प्रशासनात येण्याचा निर्धार केला. इंटर्नशिप सुरू असताना मार्च २०११ पासून यूपीएससी परीक्षेच्या तयारीला जोमाने सुरुवात केली.

## अपयशातून शिकलो

इंटर्नशिपदरम्यान वेळेचे नियोजन करत यूपीएससीची तयारी केली. इंटर्नशिप संपल्यानंतर लगेच परीक्षा दिली. पहिल्याच प्रयत्नात पूर्व त्यानंतर मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी निवड झाली. परंतु अपयश पदरी पडले. पहिल्याच प्रयत्नात येथपर्यंत आलो हेही थोडके नव्हते. परंतु अपयशाची सल मनात होतीच. दरम्यान पुण्यातील ससून रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा दिली. काम व परीक्षेच्या तयारीसाठी पुन्हा वेळेचे नियोजन केले. जोमाने तयारीला लागलो. परंतु दुसऱ्या प्रयत्नातही यशाला गवसणी घालण्यात यश आले नाही. पूर्व आणि मुख्य परीक्षेदरम्यान वेळेच्या नियोजनामुळे किमान सहा महिने वैद्यकीय सेवा देता आली. तिसरा प्रयत्न आपला मास्टरस्ट्रोक असायला हवा असा मी चंग मनाशी बांधला. पुन्हा त्याच जोमाने तयारीला लागलो. याआधी काय चुका झाल्या असतील त्याचे चिंतन-मनन केले. त्या पुन्हा होणार नाही याची खात्री केली. नियोजबद्ध परिश्रम घेऊन तयारी केली. त्याचाच परिपाक २०१३ च्या मुख्य परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालो. २०१४ मध्ये आलेल्या या परीक्षेच्या निकालात ८४ व्या रँकसह माझी निवड झाली. स्वप्न सत्यात उतरले. त्यामुळे मला वाटते आपण पाहिलेले प्रत्येक स्वप्न पूर्ण होते, फक्त गरज असते ती त्याला जिद्द आणि चिकाटीसह परीश्रमाची जोड देण्याची.

## यशाची सूत्रे

- **स्वत:शी प्रामाणिक राहा.**
- **कुणीतरी करतंय म्हणून नव्हे तर 'मी ही परीक्षा का देत आहे' या प्रश्नाचे उत्तर आपल्याकडे असेल तरच पुढे जा.**
- **भाषणांनी प्रेरित नव्हे तर स्वयंप्रेरित राहा.**
- **प्रामाणिकपणे अभ्यास करा.**
- **नकारात्मक विचार सदैव दूर ठेवा.**
- **ग्रामीण भागाचा बाऊ अथवा इंग्रजीचा न्यूनगंड बाळगू नका.**
- **वेळेचे काटेकोर नियोजन करा.**
- **स्वत:शी प्रामाणिक राहा**
- **भ्रमात कधीच राहू नका.**
- **दोन-तीन प्रयत्न देऊन झाल्यानंतर यश हुलकावणी देत असल्यास 'प्लॅन बी'ची तयारी ठेवा.**
- **परीक्षेत यश मिळाले नाही तर निराश होऊ नका. नव्या जोमाने तयारीला लागा.**

### तयारी

या परीक्षेची तयारी पुण्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील वाचनालयात केली. अक्षय शिंदेसारख्या मित्राची सोबत होती. त्याचीही आयपीएस म्हणून निवड झाली आहे. दुसऱ्या प्रयत्नातदेखील यश न मिळाल्याने काहीसा हताश झालो होतो. परंतु कुटुंबाचा भावनिक आधार माझ्या पाठीशी होता. आई-वडील आणि भावांनी डॉक्टरकी सोडून या वेगळ्या क्षेत्राचा अवलंब करण्याच्या माझ्या निर्णयाचे स्वागत केले. माझ्या मनावर ताण येऊ दिला नाही. तसेच प्रबोधिनी आणि काही वरिष्ठांचे मिळालेले मार्गदर्शन मला उपयोगात पडले. मी या परीक्षेसाठी कुठल्याही शिकवण्या लावल्या नाहीत. कदाचित असे मार्गदर्शन घेतले असते तर लवकर यश मिळाले असते. त्यामुळे उमेदवारांनी किमान ६ महिने मार्गदर्शन घेतल्यास अभ्यासाची दिशा निश्चित होते.

### मुलाखत

पहिल्या मुलाखतीमध्ये स्वाभाविकच माझ्याही मनावर दडपण होते. त्यामुळे प्रभावीपणे स्वत:ला सादर करू शकलो नाही. मात्र मुलाखतीचे स्वरूप व आवाका लक्षात आला. दुसऱ्यावेळी मात्र तयारीत कसूर सोडली नाही. येथे महत्त्वाचे सांगावेसे वाटते की पहिल्या आणि दुसऱ्या मुलाखतीमधील प्रश्न जवळपास सारखेच होते. वैद्यकीय क्षेत्रातून आल्यामुळे साहजिकच त्यांनी मला वैद्यकीय नैतिकतेबद्दल संदर्भात प्रश्न विचारले. इतर विचारलेले प्रश्नदेखील बायोडाटासंबंधी होते. आपण परीक्षा फॉर्ममध्ये माहिती भरत असताना ती काळजीपूर्वक भरायला हवी. जसे की एखादी आवड असेल तरच ती लिहावी अन्यथा लिहू नये. अनेक जण रकान्यात काहीतरी लिहायचे म्हणून लिहून टाकतात. मात्र त्यासंबंधी प्रश्न विचारला की अडचण होते. त्याचबरोबर आपल्याला आपल्या जमेच्या बाजू माहीत पाहिजेत. या जमेच्या बाजूंवर मुलाखतीत चांगला प्रभाव पाडून यश मिळवता येऊ शकते.



इंटर्नशिप करत असताना ज्या दुर्गम भागातील समस्या पाहून मी प्रशासनात येण्याचा निर्णय घेतला तेथेच मला काम करण्याची संधी मिळाल्याने मला खूप आनंद झाला. मेळघाटात धारणी येथे आदिवासी विभागांतर्गत प्रकल्प अधिकारी म्हणून काम करताना खूप मोठे कार्य समाधान मिळत आहे. येथे नियुक्ती होण्यापूर्वी दर्यापूर येथील प्रशिक्षण काळातील अनुभवदेखील महत्त्वपूर्ण होता. या आत्महत्याग्रस्त भागात 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत विक्रमी ७०० शेततळी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात यश आले.

### माहितीचा मेळ घालणे

या परीक्षेची तयारी करत असताना पहिल्या-दुसऱ्या प्रयत्नात अपयश आले तरी चालेल पण या प्रयत्नांमध्ये ज्या चुका होतात. त्या ओळखता आल्या पाहिजे. या परीक्षेसाठी एनसीईआरटीची मुलभूत पुस्तके, अर्थशास्त्र, भूगोल, सामान्यज्ञान, सामान्य गोष्टींचे आकलन अशी आपली किमान प्राथमिक तयारी असावी. शिवाय वाचलेल्या माहितीचा मेळ सध्याच्या प्रश्नांशी घालण्याची सवयदेखील लावावी. तरच प्रश्नांची उत्तरे मिळतील. कारण या परीक्षेसाठीची उत्तरे रेडिमेड' नसतात. मुलाखतीतही याचा फायदा होतो.

**शब्दांकन : राजाराम देवकर**
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय




**आजच्या युगात व्यवस्थापन क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. आपणांस कुठलेही ध्येय गाठायचे असेल तर वेळेचे व्यवस्थापन अचूक असले पाहिजे. विशेषत: स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्थापन कला शिकणे महत्त्वाचे असते. अभ्यास करताना ही कला आत्मसात केल्यास पुढे अधिकारी झाल्यावर त्याचा जीवनभर उपयोग होऊ शकतो. अलीकडे या विषयावर अनेक अभ्यासक्रमही सुरू झाले आहेत. त्या आधारावर व्यवस्थापन क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होतात. आपण जे व्यवस्थापन पाहणार आहोत ते आहे वेळेचे व्यवस्थापन!**

# वेळेचा सदुपयोग

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात जो व्यवस्थितरित्या अभ्यासाचे नियोजन करेल तोच पुढे जाऊ शकेल. म्हणून या परीक्षा देताना वेळेचे व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. कारण नियोजन हा यशाचा गाभा आहे. त्याचबरोबर अभ्यासाचा प्रभावीपणा ठरवणारा आहे. जोपर्यंत वेळेचे नियोजन, वेळापत्रक बनविणे, कामाचे प्राधान्य ठरविणे जमणार नाही तोपर्यंत अभ्यास प्रभावी होणार नाही.

स्पर्धा परीक्षा प्रामुख्याने तीन टप्प्यात घेतली जाते. त्यामध्ये पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तीन टप्प्यांचा समावेश असतो. या तीनही टप्प्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन केल्यास यश मिळू शकते.

स्पर्धा परीक्षेचे वेळापत्रक तयार करताना परीक्षेचा पूर्व आणि मुख्य या दोन टप्प्याचा अभ्यासक्रम माहीत असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर मागील काही वर्षांच्या प्रश्नपत्रिका अभ्यासून त्यातील प्रत्येक घटकाला देण्यात आलेले गुण याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्याला कोणत्या घटकाला किती गुण आहेत, कोणता घटक ज्ञात आहे व कोणता घटक अधिक गुण मिळवून देऊ शकतो, व कोणत्या घटकाला आपल्याला अधिक वेळ देण्याची गरज आहे या सर्व बाबींचा अंदाज येऊ शकतो. अभ्यासाचे वेळापत्रक व्यवस्थितरीत्या ठरवायला हवे व त्या वेळापत्रकानुसार अभ्यासाचे नियोजन करायला हवे. नियोजन केले की, प्रत्येक घटकाला लागणारा खरा वेळ लक्षात येतो. एखादी गोष्ट करण्याकरिता आपण काही तास पुरेसे ठरवत असतो. पण प्रत्यक्षात दिवस लागू शकतात. आजचे काम उद्यावर ढकलण्याची प्रवृत्ती नियोजनामुळे कमी होते. एकदा नियोजन केले की, पुढच्या घटकाला सुयोग्य वेळ देता येतो. नियोजनात व्यवस्थितपणा असला तर येते. शक्तीस्थाने आणि कच्चे दुवे याची पुरेशी जाण येते. त्यामुळे नियोजनाने केलेला अभ्यास जास्त प्रभावी ठरतो. एखादे वेळी जर जास्त वेळखाऊ नियोजन केले व अधिक गतीची गरज पडू शकते. तेव्हा नियोजनात योग्य तो बदल करून अभ्यासाची पद्धती बदलू शकतो. नीट नियोजन केलेला विद्यार्थीच आपल्या दिनमानात असे बदल लवकर घडून आणू शकतो. नियोजन हे नेहमी लक्ष्याला समोर ठेऊन केले जाते.

## वेळापत्रकाची आवश्यकता

कुठल्याही परीक्षेचा अभ्यास करताना वेळापत्रक ठरवून अभ्यास केल्यास त्याचा खूप फायदा होतो. काही विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून वेळापत्रकानुसार अभ्यास करायची सवय असते. ते विद्यार्थी निश्चितच पुढे जाऊ शकतात. वेळापत्रकामुळे दिवसभराच्या वेळेचा कसा व कुठल्या विषयासाठी वापर करायचा हे निश्चित होते. त्यामुळे त्या वेळेत तो अभ्यासक्रम पूर्ण करता येऊ शकतो. बरेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षेचा ८ ते १२ तास अभ्यास करतात काही विद्यार्थी ३ ते ४ तास अभ्यास करूनही यशस्वी होतात. कारण प्रत्येक विद्यार्थ्याची अभ्यासाची क्षमता वेगवेगळी असते. त्यांच्या



अभ्यासाच्या वेळाही वेगवेगळ्या असतात. काही विद्यार्थ्यांचा दिवसा चांगला अभ्यास होतो. काही विद्यार्थी रात्रीची वेळ निवडतात. काही जण पहाटे प्रसन्न वातावरणात अभ्यासाला बसतात. ज्याच्या त्याच्या योग्य वेळेनुसार अभ्यासक्रमाचे वेळापत्रक बनवायला हवे.

या वेळापत्रकात ध्यान, चहासाठी विश्रांती, संगीत ऐकणे, थोडे फिरायला जाऊन पाय मोकळे करणे, भोजन, विश्रांती याचा समावेश करावा. मात्र यासाठी अधिक वेळ खर्ची करू नये. वेळापत्रकात आपणास कुठल्या विषयाला अधिक महत्त्व आहे. त्याला अधिक वेळ द्यावा. ज्या विषयाचा सराव करावयाचा आहे, त्यासाठीही पुरेसा वेळ राखून ठेवावा. वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे विश्रांती व अन्य अनुषंगिक आवश्यक गोष्टींचा आवर्जुन अंतर्भाव करावा. वेळापत्रक हे जीवनात शिस्तीसाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे त्याचे काटेकोर पालन करून अभ्यासाचे नियोजन करावे. वेळापत्रक हे परीक्षेतील यशासाठी महत्त्वाचा घटक आहे.

वेळेत अभ्यास करताना काही महत्त्वाच्या गोष्टी आपणांस लक्षात येतात. त्या नीट निरीक्षण करून नोंदवून ठेवायला हव्यात. आपला दिवसभरातला किती वेळ जेवण, झोप, इतर कामे यासाठी खर्च झाला त्याचबरोबर अभ्यासाव्यतिरिक्त छंद, वर्ग, मनोरंजन यासाठी किती वेळ दिला हे निरीक्षणातून लक्षात येऊ शकते. त्यानुसार आपणास आपल्या वेळापत्रकात कसे बदल करायचे हे लक्षात येते. तसा बदल केल्यास त्याचा फायदा होतो.

### वेळ दवडू नका...

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. यशस्वी झालेले अनेकजण सांगतात की, मी नातेवाईक, लग्न समारंभ, इतर सामाजिक धार्मिक कार्यक्रम अभ्यास करताना जाणीवपूर्वक टाळले. यामुळेच मी माझे ध्येय गाठू शकलो. जर ध्येय गाठायचे असेल तर अभ्यास करताना कमीत कमी एक-दोन वर्षे या नमुद केलेल्या बाबी टाळायला हव्यात. अवास्तव, अवांतर बाबी कटाक्षाने टाळायला हव्यात. जर ट्रॅफिक, रांगेत, फोनवर वेळ जात असेल तर हा अकार्यक्षम वेळ आहे. त्यावेळेस विचार, मननाची दिवसभरात न जमणारी जी कामे आटोपता येतील ती करावीत. आपल्याकडे असलेल्या स्मार्ट फोनवर ध्वनीमुद्रणाची सुविधा असते अशा फावल्या वेळेत पाठांतरासाठी किंवा समजण्यासाठी कठीण वाटणारा भाग तुम्ही फोनमध्ये रेकॉर्ड करून ऐकू शकता. फावल्या वेळेचा उपयोग असा करता येऊ शकतो.

**डॉ. बबन जोगदंड**
संशोधन अधिकारी, यशदा, पुणे

## अभ्यासक्रमाचे वेळापत्रक व व्यवस्थापन



स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना नेहमी अभ्यासाचे वेळापत्रक व त्याचे व्यवस्थापन कसे करावे हा प्रश्न पडतो. आपण जर स्पर्धा परिक्षेच्या वेळापत्रकाचा विचार केला तर पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा असे तीन टप्पे पार करण्यासाठी कमीत कमी एक ते दोन वर्ष द्यावे लागतात. परंतु सुरुवातीला एक वर्षाचे नियोजन करावे. व त्यानुसार वेळापत्रक बनवावे. सुरुवातीला मुख्य परीक्षेचा अभ्यास हाती घ्यावा. कारण मुख्य परीक्षेच्या अभ्यासातूनच पूर्वपरीक्षेचीही बरीच तयारी होऊ शकते. सुरुवातीचे सहा महिने हे पूर्व परीक्षेच्या तयारीसाठी द्यावेत. त्यामध्ये किमान सात तास अभ्यास व तीन तास उजळणी किंवा सराव यासाठी द्यायला हवेत. त्यानंतर सहा महिने पूर्व परीक्षेचा अभ्यास हाती घ्यावा. यासाठीही दररोज पाच ते सात तास अभ्यासासाठी द्यायला हवेत. या परीक्षांचे वेळापत्रक तयार करताना गणित, बुद्धिमत्ता चाचणी, सीसॅट याच्या सरावासाठी अधिकचा वेळ द्यावा. त्याचबरोबर सामान्य अध्ययन यासाठी वृत्तपत्रे, मासिके आणि नियतकालिके नियमित वाचावीत. व आकाशवाणीवरील बातम्या ऐकाव्यात. दूरचित्रवाहिन्यावरील ताज्या घडामोडींवरील चर्चा पाहव्यात. याचाही परीक्षेसाठी उपयोग होतो. वेळापत्रकामध्ये विविध प्रश्नांच्या सरावासाठीही व्यवस्थित वेळ राखून ठेवावा. कारण स्पर्धा परीक्षेसाठी सराव अत्यंत उपयुक्त ठरतो. शक्यतो आठवड्याचे सहा दिवस अभ्यासासाठी खर्ची घालावेत. यामध्ये सोमवार ते शनिवार या दिवसात रोज किमान दोन तास सामान्य अध्ययनासाठी द्यावेत.

तीन तास वैकल्पिक विषयासाठी द्यावेत. दोन तास सीसॅट व बुद्धिमत्ता चाचणी व एक तास नोटस् काढणे असे दररोज किमान सात तासाचे नियोजन करावे. व उर्वरित काही वेळ सरावासाठी द्यावा. सुटीचा रविवारचा अर्धा दिवस हा वृत्तपत्रे वाचणे, मासिके वाचणे, वृत्तपत्रांची कात्रणे काढणे यासाठी द्यावा व उर्वरित अर्धा दिवस हा आपल्या स्वत:साठी द्यावा. विशेषत: अभ्यासक्रमाच्या नियोजनात गटचर्चा यालाही फार महत्त्व आहे. याचाही समावेश वेळापत्रकात करायला हवा. मागील यशस्वी विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता त्यांनी स्पर्धा परीक्षेत गटचर्चेचा सर्वाधिक फायदा झाल्याचे सांगितले. या गटचर्चेमधून मुलाखतीलाही खूप फायदा होऊ शकतो. अभ्यासक्रमाचे वेळापत्रक ठरविल्यानंतर त्याचे काटेकोरपणे व्यवस्थापन होणे गरजेचे आहे.

**प्रत्येक गर्भवती स्त्रीला निरोगी बालक आणि सशक्त गर्भधारणेची अपेक्षा असते. परंतु कुपोषणामुळे आई व बाळाच्या आरोग्यावर घातक परिणाम होतो. देशात दररोज सुमारे १५०० महिला आणि किशोरवयीन मुली गर्भधारणा आणि बाळाच्या जन्माशी संबंधित समस्येने मरण पावतात. कुपोषणाच्या समस्येमुळे दरवर्षी सुमारे १० दशलक्ष महिला आणि किशोरवयीन मुलींना गर्भधारणेदरम्यान अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. बऱ्याचदा बाळांना संसर्ग होतो. अपंगत्व येते. त्यामुळे गर्भधारणेदरम्यान आई व गर्भाची विशेष काळजी घेणे आवश्यक ठरते. यासाठी राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन अंतर्गत विशेष प्रयत्न केले जात आहेत. याविषयी सांगताहेत मिशनच्या संचालक सुप्रभा अग्रवाल...**



# सुदृढ आणि सुरक्षित

आईची महती एवढी मोठी आहे की 'स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी' अशा शब्दात तिचे वर्णन करूनही समाधान होत नाही. त्यामुळे कुणी तिला देवाच्या तर कुणी गुरूच्या रुपात पाहतो. कुणी मायेचा अथांग सागर म्हणून तिचे वर्णन करतो. तर 'देव सर्वत्र असू शकत नाही म्हणूनच त्याने आई निर्माण केली' हे ज्युंचे सुभाषित आईची महती व्यक्त करण्याचा प्रयत्न करते. आई, मदर, माँ, मॉम, बा आदी शब्द दिसायला व उच्चारायला अगदी छोटे. मात्र त्यामध्ये सर्व जगाचा समावेश होतो. प्रत्येक धर्मात, भाषेत आई या शब्दाला अगाध प्रेमाचा अर्थ आहे. बाळाला जन्म दिल्यानंतर स्त्रीचादेखील आई म्हणून जन्म होतो. अशा आईची काळजी घेणे तेवढेच महत्त्वाचे असते. ती सुदृढ राहिली तर बाळाचीही सुदृढ व निरोगी वाढ होते. त्यामुळे माता व बाळाच्या सुदृढ आरोग्याचा वसा जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशनने घेतला आहे.

गरोदर महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. गरोदर मातांच्या अशक्तपणामुळे जगभरात दरवर्षी सुमारे ३० लाख मृत बाळांचा जन्म होतो. तर ३७ लाख नवजात बालकांचा मृत्यू जन्मानंतर लगेच अथवा महिनाभरात होतो. गरोदर मातेच्या आरोग्याची काळजी न घेतल्यामुळे किंवा तिला काही आजार झाला असल्यास त्यादरम्यान आरोग्याविषयी विशेष खबरदारी न घेतल्यामुळे बाळ मृत जन्माला येणे किंवा महिनाभरात ते मरण पावणे, कमी वजनाचे बाळ जन्माला येणे आदी समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. शिवाय बाळ सुदृढ व निरोगी जन्माला न आल्यास भविष्यातही त्याला आरोग्याविषयी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

## सुरक्षित मातृत्त्वाच्या दृष्टीने महत्त्वाचे

१) महिला गर्भवती होण्यापूर्वी तिचे आरोग्य निरोगी व सुदृढ राहील, याची काळजी घ्यावी.

२) प्रत्येक गर्भधारणेदरम्यान किमान चार वेळा प्रशिक्षित आरोग्य अधिकारी-कर्मचाऱ्याकडून प्रसुतीविषयी काळजी घेतली जाणे आवश्यक आहे. तपासण्या वेळेवर होणे गरजेचे आहे.

३) डॉक्टर, नर्स तसेच प्रशिक्षित साहाय्यकाच्या देखरेखीखाली बाळाचा जन्म व्हावा.

४) बाळ जन्मण्याबाबत गुंतागुंत असल्यास गरोदर माता आणि तिच्या बाळाची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

५) बाळाला जन्म दिल्यानंतर माता व बाळाची आठवडाभर किमान दर २४ तासाला नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर जन्मानंतर सहा महिन्यांनी अशी तपासणी आवश्यक आहे.

## एचआयव्ही चाचणी

गर्भवती महिला आणि तिचा जोडीदार यांनी एचआयव्ही चाचण्या वेळेत करून घ्याव्यात. त्या पॉझिटिव्ह आल्यास बाळाची विशेष काळजी घेणे आवश्यक ठरते. गर्भावस्था, जन्म आणि बाळाला दूध

पाजताना बाळाला हा संसर्ग होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्यामुळे मनात शंका असो अथवा नसो या चाचण्या करून प्रशिक्षित समुपदेशकाचे (आरोग्य कर्मचाऱ्याचे) मार्गदर्शन घ्यावे.

## सुरक्षित मातृत्वाची त्रिसूत्री

सर्व गरोदर महिलांना निरोगी आणि सुरक्षित बाळंतपणाची खात्री देणे म्हणजेच सुरक्षित मातृत्व म्हणता येईल. निरोगी प्रजननासाठी सुरक्षित मातृत्व महत्त्वाचा घटक ठरतो. सुरक्षित मातृत्व म्हणजेच निरोगी गर्भधारणा आणि बाळाचा सुरक्षित जन्म देण्याची आईची क्षमता. याची सुरुवात गर्भधारणेपूर्वीपासून सुरू होते. गर्भधारणेपूर्वी मातेचे पोषण आणि निरोगी-सुदृढ जीवनशैली, बाळ जन्मन्यापूर्वी घेतलेली योग्य काळजी, शक्य होईल तेथे आरोग्याविषयी उद्भवलेल्या समस्यांवर वेळीच योग्य उपचार व प्रतिबंध ही सुरक्षित मातृत्वाची त्रिसूत्री म्हणता येईल.



## कुपोषणमुक्तीसाठी योजना

गरिबी, दुर्गम भाग अथवा अज्ञानामुळे महिला चांगल्या आरोग्य सेवांपासून वंचित राहतात. परंतु राज्य शासन महिलांसाठी अनेक योजना राबवत असल्याने महिलांना प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरच्या सर्व आरोग्य सुविधा मिळत आहेत.

राज्यात राष्ट्रीय आरोग्य मिशन आणि इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिस अंतर्गत राबवण्यात येत असलेल्या एमआयवायसीएन (मॅटरनल, इन्फंट अँण्ड यंग चाइल्ड न्यूट्रिशन) या कार्यक्रमांतर्गत लहान मुलांचा मृत्यूदर मोठ्या प्रमाणावर घटला आहे. शिवाय शासनामार्फत गरोदर मातांसाठी जननी सुरक्षा योजना व जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम राबवण्यात येत आहे.

जगभरातील ३० टक्के प्रजननक्षम आणि ४२ टक्के गरोदर मातांना लोह कमतरतेमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासन ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबवत आहे. अंगणवाडी सेविकांमार्फत आदिवासी भागात गरोदर मातांना पोषण आहार दिला जात आहे.



## जागतिक आरोग्य संघटनेचा पुढाकार

सुरक्षित मातृत्व कार्यक्रमाची सुरुवात १९८७ मध्ये जागतिक आरोग्य संघटना (डब्लूएचओ) आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांनी केली. विकसनशील देशांमधील गरोदरपणातील अडचणी आणि प्रसूतीदरम्यान होणारा मृत्यूचा दर कमी करण्याचा याचा मुख्य उद्देश आहे. विकसनशील देशांमध्ये गर्भधारणेपूर्वी, जन्मपूर्व आणि जन्मोत्तर माता व बालकाला आवश्यक सेवा मिळत असल्याची खात्री व पर्यवेक्षण या कार्यकमांतर्गत केले जाते.

सुरक्षित मातृत्वाच्या दृष्टीने महिलांना चांगली आरोग्य सेवा मिळावी म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने सार्वजनिक आरोग्य केंद्रांना काही सूचनावजा शिफारशी केल्या आहेत. त्या अशा

**कुटुंब नियोजन:** गर्भधारणेचे नियोजन कसे करावे, दोन गर्भधारणेत किती अंतर असावे, गरोदर मातेचे वय आदींविषयी माहिती जोडप्यांना दिली जाईल याची खात्री करणे.

**प्रसूतीपूर्व काळजी:** गर्भाची वाढ व्यवस्थित होत आहे का, काही वैद्यकीय गुंतागुंत होणार असल्यास त्याची खबरदारी घेऊन वेळीच योग्य उपचार करणे.

**स्वच्छता:** प्रसूतीदरम्यान आणि प्रसूतीपश्चात माता व बाळाच्या देखभालीसाठी प्रशिक्षित व कौशल्ययुक्त मदतनीस असावे. त्यांना उपकरणांचे ज्ञान असावे. सुरक्षित प्रसूतीची खात्री करायला हवी.

**प्राथमिक काळजी:** संवेनशील आणि अधिक धोक्याच्या गर्भधारणेसाठी आवश्यक असणारी सर्व काळजी घ्यावी आणि योग्य वेळी निदान करण्यात यावे.

निरोगी मातांची मुले बालपण आनंदाने जगतात, उत्साहाने शाळेत जातात. निरोगी जीवन जगून सर्व गोष्टींमध्ये आघाडीवर असतात. गर्भधारणेपूर्वी आणि प्रसूतीपूर्व काळात मातेच्या आरोग्याची विशेष काळजी घेतल्यास अर्भक अथवा नवजात बाळ शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ राहण्यास मदत होते. हे बाळाच्या दीर्घायुष्याच्या वाटचालीसाठी महत्त्वाचेदेखील असते.

**शब्दांकन : प्रा. गणेश तारे**




**देशात अथवा राज्यात झालेला क्रीडा क्षेत्राचा विकास हा त्या देश-राज्याच्या प्रगतीचा एक टप्पा मानला जातो. त्यामुळे खेळ व खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असते. त्या धोरणाच्या माध्यमातून विविध योजना, उपक्रम शासन राबवत असते. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र शासन नावीन्यपूर्ण योजना, उपक्रम राबवत असून त्या माध्यमातून राज्यात क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले जात आहे.**

राज्यात क्रीडा क्षेत्राचा विकास आणि क्रीडा क्षेत्रात झालेले बदल लक्षात घेऊन व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेते खेळाडू तयार करण्यासाठी २०१२ मध्ये क्रीडा धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणांची अंमलबजावणी राज्य व जिल्हास्तरावरून विविध योजनांच्या माध्यमातून केली जात आहे.

## तालीम-कुस्ती केंद्राचा विकास

कुस्तीच्या तंत्रात झालेले बदल लक्षात घेऊन आखाडा-तालमीचे आधुनिकीकरण केले जात आहे. जुन्या तालमींची दुरुस्ती/नुतनीकरण करण्यास अंदाजित खर्चाचा ७५ टक्के किंवा कमाल रुपये ७ लक्ष इतके अर्थसाहाय्य दिले जाते.

## क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिर

तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानात भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रात होणारे बदल त्यांना अवगत व्हावे आणि राज्यातील शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना योग्य क्रीडा प्रशिक्षण मिळावे, यासाठी क्रीडा शिक्षकांचे अद्यायावत प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. याकरिता १० दिवसांचे राज्यस्तरावर मास्टर्स ट्रेनर व जिल्हास्तरीय शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

## क्रीडा प्रशिक्षण शिबिरे

प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी पुरुष व महिला गटातील संबंधित अधिकृत संघटनेचे खेळाडू तसेच शालेय १७ व १९ या गटातील मुले व मुली खेळाडूंना प्रशिक्षण दिले जाते.

## क्रीडा प्रशिक्षण केंद्रे

प्रत्येक तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करून क्रीडापटूंच्या क्रीडा गुणांना वाव देण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षणाच्या सुविधा देणे, क्रीडा शिक्षक-प्रशिक्षक-मार्गदर्शकांसाठी चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळांचे या केंद्रामार्फत आयोजन केले जाते.

## क्रीडा सुविधानिर्मितीसाठी आर्थिक साहाय्य

खासगी अथवा शासकीय मान्यताप्राप्त शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये, विविध नोंदणीकृत सामाजिक संस्था,व्यायाम संस्था, क्रीडा, युवक मंडळे आदींना क्रीडा सुविधा निर्मिती अथवा क्रीडा साहित्यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. राज्यातील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरीकरिता तंत्रशुद्ध प्रशिक्षण, खेळाडूंच्या दर्जात सुधारणा, पायाभूत सुविध आदींसाठी खेळाडूंना आर्थिक साहाय्य दिले जाते.

## जिल्हा व विभागीय क्रीडासंकुले

खुले प्रेक्षागृह, जलतरण तलाव, विविध खेळांची मैदाने आदींनी सुसज्ज विभागीय व जिल्हा क्रीडासंकुल योजना कार्यान्वित आहे. सर्व मूलभूत क्रीडा सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करण्यासाठी तालुका क्रीडा संकुल उभारण्यात येते.

## महाराष्ट्र क्रीडा परिषद अनुदान योजना

महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून संचालनालयाने मान्यता

दिलेली क्रीडा मंडळे/ संघटना/स्थानिक स्तरावरील संस्था/जिल्हा क्रीडा परिषदांना निर्वाह, क्रीडा साहित्य खरेदी, अधिकृत राज्य/ राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन व क्रीडांगण देखभाल दुरुस्ती याबाबींकरिता अनुदान दिले जाते. **अनिवासी क्रीडा प्रबोधिनी:** ८ ते १४ वयोगटातील काही विद्यार्थी शाळा सोडून येण्यास तयार नसल्याने या प्रबोधिनीची संकल्पना राबवण्यात येत आहे.

## इतर

- राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण.
- अत्युच्च गुणवत्ताधारक अपंग खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती
- शासकीय खेळाडू कर्मचाऱ्यांना खेळाच्या सरावासाठी कार्यालय लवकर सोडण्यास परवानगी देण्यासंबंधातील धोरण

**– वर्षा फडके-आंधळे**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# खेळणाऱ्यांसाठी...

## भारतीय खेळ प्राधिकरण (SAI)

विविध खेळांचे संवर्धन व प्रोत्साहन देण्यासोबत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्कृष्ठ खेळाडू घडवण्याच्या उद्देशाने १९८४ साली भारतीय खेळ प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.

- देशात विविध खेळांचे संवर्धन व खेळांना प्रोत्साहन देणे.
- खेळ प्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना व कार्यक्रम राबवणे.
- क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली तसेच राज्य शासन व क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था यांच्यात मध्यस्थ म्हणून समन्वयाची भूमिका पार पाडणे.
- उत्कृष्ठ खेळाडू, प्रशिक्षण तथा शारीरिक शिक्षक तयार करण्यासाठी संस्थांची स्थापना, व्यवस्थापन व नियोजन तथा संचालन करणे.
- देशात खेळांच्या नवीन सुविधा निर्माण करून या सुविधांची देखरेख करणे. आदी प्रमुख बाबी क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी राबवल्या जातात.

## राष्ट्रीय खेळ प्रतिभा प्रतियोगिता योजना

ही योजना शालेय विद्यार्थ्यांसाठी आहे. ८ ते १४ वर्षे वयोगटातील गुणवंत विद्यार्थ्यांमधील खेळाची आवड ओळखून त्यांना संबधित खेळाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यासाठी १९८५ पासून संबंधित योजना राबवली जाते.

## स्वदेशी खेळ व मार्शल आर्ट योजना

ग्रामीण भागासोबतच छोट्या शहरातील शाळांमध्ये स्वदेशी खेळ तथा मार्शल आर्टचे संवर्धन करून या खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना २००१ साली सुरू करण्यात आली. हे प्रशिक्षण शाळांमधील ८ ते १४ वर्ष वयोगटातील खेळाडूंना दिले जाते.

## सेना बाल खेळ कंपनी योजना

भारतीय खेळ प्राधिकरण व भारतीय सेनेच्या संयुक्त विद्यमाने ही योजना राबवली जाते. युवा खेळाडूंना खेळात प्रावीण्य मिळवण्यासाठी चांगले प्रशिक्षण मिळावे, सैन्यदलाच्या शिस्तीच्या वातावरणाचा खेळाडूंना उपयोग व्हावा हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. सैन्यदलाच्या शिस्तीत खेळाचे प्रशिक्षण घेणाऱ्या युवकांना त्यांच्या वयाच्या साडेसतरा वर्षानंतर सैन्यदलात सेवेचे प्रस्ताव दिले जातात.

## 'साई' प्रशिक्षण केंद्र योजना

१२ ते १८ वर्ष वयोगटातील खेळाडूंची प्रतिभा ओळखून त्यांना चांगले प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी हे प्रशिक्षण केंद्र राबवले जाते. साईच्या वतीने राज्यांमध्ये केंद्र सुरू केले जाते. या ठिकाणी २७ खेळांचा समावेश असून मुंबई येथे साईचे प्रशिक्षण केंद्र आहे. या केंद्रात महाराष्ट्रासह गोवा, दमण व दीव तथा दादरा, नगर हवेलीचाही अंतर्भाव आहे.

## विशेष क्षेत्र खेळ योजना

दुर्गम भागातील १२ ते १८ वर्ष वयोगटातील प्रतिभावान खेळाडूंना खेळाच्या आधुनिक सुविधांसह चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण या योजनेंतर्गत उपलब्ध करून दिले जाते. काही भौगोलिक स्थितीतील युवक विशिष्ट खेळात प्रवीण असतात, आनुवांशिकतेमुळे काही खेळाडू एखाद्या खेळात प्रतिभावान असतो. या खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळासाठी तयार करण्याचे महत्त्वपूर्ण काम ही योजना करते. देशी व मार्शल आर्टच्या २६ खेळांचा यात समावेश आहे.

## राष्ट्रीय क्रीडा संघटना साहाय्य योजना


या योजनेंतर्गत राष्ट्रीय चॅम्पियनशिप तथा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन, विदेशातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन, क्रीडा साहित्याची खरेदी, विदेशी प्रशिक्षकांच्या नियुक्तीसाठी राष्ट्रीय क्रीडा संघटनांना साहाय्य दिले जाते.

**संकलन : मंगेश वरकड**
साहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# येथे कर माझे जुळती...

**सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात १ ऑगस्ट रोजी अण्णा भाऊ साठे आणि ३ ऑगस्ट रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी केली जाते, त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती...**

## अण्णा भाऊ साठे



कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवास वर्णन अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारांतील लेखन केलेले ख्यातनाम मराठी साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊ सिधोजी साठे, तर आईचे नाव वालबाई होते. त्यांचे मूळ नाव तुकाराम होते.

१९३२ मध्ये वडिलांसोबत ते मुंबईला आले. चरितार्थासाठी मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले.१९३६ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले. तथापि वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलत भावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. पुढे १९४२ च्या चळवळीत सहभागी झाल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर अटक वॉरंट काढले. पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले. मुंबईत लोकशाहीर म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहिरांबरोबर अण्णांचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लाल बावटा' कलापथक स्थापन केले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, गीते, लोकनाटये आदींचा समावेश होता. 'महाराष्ट्राची परंपरा' ( १९५० ) या नावाने त्यांनी या चळवळीसाठी पोवाडा लिहिला ; त्याचप्रमाणे मुंबई कुणाची? या लोकनाट्याचे महाराष्ट्रभर प्रयोग केले. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, शेटजींचे इलेक्शन, बेकायदेशीर, पुढारी मिळाला, लोकमंत्र्यांचा दौरा ही त्यांची अन्य काही लोकनाटये. जिवंत काडतूस, आबी, खुळंवाडी, बरबाद्याकंजारी, चिरानगरची भुतं, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह ; त्यांनी पस्तीस कादंबऱ्या लिहिल्या. फकिरा, वारणेचा वाघ, चिखलातील कमळ यांसारख्या कादंबऱ्यांचा यात समावेश आहे. त्यांच्या फकिरा या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. 'जग बदल घालुनी घाव।
सांगूनि गेले मज भीमराव।।'
हे त्यांचे गीत खूप गाजले. गोरेगाव (मुंबई) येथे त्यांचे निधन झाले.

## क्रांतिसिंह नाना पाटील



महाराष्ट्रातील एक देशभक्त. झुंझार नेते आणि क्रांतिसिंह म्हणून ते ओळखले जातात. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील येडे मचिंद्र या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात ३ ऑगस्ट १९०० रोजी झाला. नानांचे प्राथमिक शिक्षण गावी झाले आणि ते मुलकीपरीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना तलाठ्याची नोकरी मिळाली. पुढे सत्यशोधक चळवळीकडे ते आकृष्ट झाले. त्यांनी ग्रामीण भागातून दौरे काढून तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा, हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथा व चालीरीती यांविरुद्ध लोकमत जागृत केले. अनेक अनिष्ट चालीरितींविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. १९३० साली म. गांधींनी सुरू केलेल्या असहकारच्या चळवळीत ते सहभागी झाले. पुढे महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीवर ते निवडून आले. १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनात भूमिगत राहून कार्य करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यानुसार सातारा जिल्ह्यात काही सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी प्रतिसरकार स्थापन केले व ब्रिटिश शासन बंद पाडण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला. सरकारी बँका, पोस्ट व तारखाते, पोलीस ठाणी यांवर छापे घातले. सरकारतर्फे हेरगिरी करणाऱ्यास तसेच जबरीने सारा वसूल करणाऱ्या पाटील-तलाठ्यांस पायांवर काठीचे तडाके मारण्यात येत आणि पत्रेही ठोकण्यात येत. यावरून त्यांच्या या प्रतिसरकारला पत्रीसरकार हे नाव रूढ झाले होते.

या आंदोलनकाळातच नानांनी ग्रामराज्याची स्थापना करण्याचे कार्य हाती घेतले. खेड्यातील परकी सत्ता नामशेष करून त्यांना स्वयंपूर्ण बनवावे व त्यांचा सर्व कारभार ग्रामस्थांच्या हाती द्यावा, अशी त्यांची ग्रामराज्याची कल्पना होती. कराड, वाळवे, तासगाव इ. ठिकाणी पंचसभा स्थापन झाल्या. न्यायदान समित्याही स्थापन करण्यात आल्या. कोरेगाव, पाटण, सातारा इ, गावी, वर्षानुवर्षे बेकायदेशीरपणे गाळली जाणारी हातभट्टीची दारू चार महिन्यांत क्रांतिकारकांनी बंद केली. कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर (१९४६) त्यांच्यावरील पकड वॉरंट रद्द करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी कॉंग्रेस पक्ष सोडला व ते शेतकरी कामगार पक्षात गेले. अखेरच्या दिवसांत त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. ते दोन वेळा लोकसभेवर निवडून आले.

**(संदर्भ : मराठी विश्वकोश)**

**संकलन: गजानन पाटील**

राष्ट्र कर बाजारपेठ

# वस्तू व सेवा कर पध्दतीमध्ये

# बीजक (Invoice) देणे अतिशय सुलभ



- रू. २०० पेक्षा जास्त पुरवठ्यासाठी कर बीजक/देयक (Tax Invoice/Bill)
- रू. २०० पेक्षा कमी पुरवठ्यासाठी मागणी केल्यास कर बीजक/देयक (Tax Invoice/Bill)
- करपात्र वस्तू किंवा सेवेच्या पुरवठ्यासाठी कर बीजक (Tax Invoice)
- करमुक्त वस्तू किंवा सेवेचा पुरवठा तसेच आपसमेळ योजनेखालील पुरवठा यासाठी पुरवठयाचे बीजक देयक (Bill of supply)
- नियम ४६ व ४९ मधील खाली नमुद आवश्यक बाबींचा उल्लेख केल्यास बीजक (Invoice) नमुना ठरविण्याचे स्वातंत्र्य

- पुरवठादाराचे नाव, पत्ता व GSTIN
- एक सलग अनुक्रमांक
- निर्गमित दिनांक
- प्राप्तकर्त्याचे नाव, पत्ता व GSTIN/UIN
- डिलिव्हरीचा पत्ता, राज्य त्याचे कोडसह
- HSN/SAC कोड
- वस्तू / सेवांचे वर्णन
- वस्तू / सेवांचे प्रमाण (Quantity)
- वस्तू /सेवा यांच्या पुरवठ्याचे एकूण मूल्य
- वस्तू /सेवा यांचे करपात्र मूल्य
- कराचा दर (SGST, CGST, IGST, etc)
- कर आकारणी
- पुरवठ्याचे ठिकाण राज्याच्या नावासह
- पुरवठ्याचा पत्ता पुरवठ्याचे ठिकाणाहून वेगळा असल्यास
- प्रत्यावर्ती आकाराच्या आधारे (Reverse charge) कर देय आहे काय
- स्वाक्षरी

- वार्षिक उलाढाल १.५ कोटीपेक्षा कमी असल्यास HSN/SAC कोड देणे अनिवार्य नाही
- मालाची वाहतुक ही पुरवठ्यासाठी नसल्यास कर बीजकां/देयकांशिवाय (Tax Invoice/Bill) मालाच्या पोचवणीच्या चलनावर (Delivery Challan) माल वाहतुक शक्य

OUR TAXES FOR OUR NATION

अधिक माहितीसाठी नजीकच्या महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागाच्या कार्यालयातील जीएसटी सेवा केंद्रास भेट द्या किंवा १८०० २२५ ९०० या क्रमांकावर संपर्क साधा किंवा www.mahavat.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th August 2017
Date of Publication : 10th of every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / **From**

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल / २०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह